# काशीयात्रा.

हें पुस्तक

हरी गणेश पटवर्धन

यांणीं

तयार केलें

पुणें येथें

बाळाजी कृष्ण गोखले यांच्या

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

ता० १ माहे नोवेंबर सन १८७[illegible]

333

वे. शा. रा. रा. कृष्णशास्त्री चिपळुणकर,

रिपोर्टर आन दी नेटिव प्रेस

फेलो आफ दी बांबे यूनिवर्सिटी.

यांस

हें लहानसें पुस्तक

ग्रंथ कर्त्यानें

परम प्रीतीनें, आदरानें, व मित्रत्व बुद्धीनें

नजर केलें आहे.

Presented to "THE PRIVATE
FREE LIBRARY-Dharmapuri, Wai"
by K. V. Pandit. in memory of his
uncle the late Mr. Bapusaheb Pandit.

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा. क्र.
15072
296.535
वाई जि. सातारा

333

SAKHARAM MAHADEV
WAI DIST. SATARA.
* PANDIT. *

# प्रस्तावना.

मी जेव्हां यात्रेस निघालों त्या वेळीं ती संबंधीं हकीकत लिहिण्याची कल्पना सुद्धां माझे मनांत नव्हती. परंतु प्रवासास आरंभ केल्यावर ज्या गोष्टी मला घडल्या व माझ्या पाहण्यांत आल्या त्यांपैकीं कांहींची हकीकत लिहून वर्तमानपत्रांत छापविली असतां त्याचे वाचणारास क्षणभर करमणूक होईल. अशा समजुतीनें मीं एक दोन पत्रें ज्ञानप्रकाशास पाठविलीं व तीं पत्रें त्या पत्राच्या कर्त्यानें साद्यंत छापलीं व त्यांचे उतारेही दुसऱ्या वर्तमानपत्रांनीं घेतलेले माझ्या पाहण्यांत आले. त्यावरून हीं पत्रें वाचणारांस कांहींशीं रुचतात असा ग्रह होऊन मीं तसाच क्रम पुढें चालविला. व हिंदुस्थानांत मथुरा, वृंदावन, गोकूळ, आग्रा, अमृतसर, लाहोर, मुलतान वगैरे जीं नामांकित मोठ मोठीं शहरें पाहण्यांत आलीं त्यांचें अल्प स्वल्प वर्णन करून तें ज्ञानप्रकाशास पाठवीत गेलों. पुढें पुण्यास आल्यावर कितीएक माझ्या मित्रांचें सांगणें पडलें कीं, हीं पत्रें एकत्र करून त्यांचा ग्रंथ केल्यास तो बराच करमणुकीचा होईल. व वर सांगितलेल्या जुन्या शहरांची माहिती लोकांत प्रसृत होण्यास कारण होईल. ही कल्पना मलाही पसंत वाटून हा लहानसा ग्रंथ सुज्ञ वाचकजनास विनयपूर्वक सादर केला आहे तर त्यांतील गुणलेश ग्रहण करून दोषांकडे दुर्लक्ष करतील अशी आशा आहे.

पुणें ता० १ नोवेंबर सन १८७२.

ग्रंथकर्ता.

Presented to "THE PRIVATE FREE LIBRARY-Dharmapuri, Wai" by K. V. Pandit from library of his uncle the late Mr. Bapusaheb Pandit.
333

# काशीयात्रा.

## पुण्याहून प्रयाग—तेथील यात्रा.

---

ज्ञानप्रकाशकर्ते महाराज—

वि० वि. आम्ही २०।२५ असामी तारीख ३१ आक्टोबर रोजीं सकाळीं श्री काशी यात्रेस निघालों तों प्रथमतः पुण्याच्या स्टेशनावर आमच्या कांहीं नौकर लोकांस थर्ड क्लास टिकिटें घेण्याचा प्रसंग आला, तेव्हां त्यांनीं तीन चार कल्याणचीं टिकिटें घेण्याकरितां पैसे दिले आणि सुमारें घटका दीड घटका रात्र होती म्हणून घाईनें टिकिटें न तपासतां ते गाडींत बसले. नंतर नऊ वाजण्याच्या सुमारास गाडी कर्जतच्या स्टेशनावर आली, तेव्हां आम्ही सदहू इसम कोठें बसले आहेत व त्यांनीं टिकिटास किती पैसे खर्च केले ह्याची चौकशी केली. तेव्हां एक असामीस कल्याणचें टिकिट आणि बाकीच्यांस बदलापुरचीं टिकिटें मिळालीं असें कळलें. तेव्हां कदाचित हस्तदोषानें टिकिटें देणारानें ही चुकी केली असेल असें समजून प्रत्येकानें भाड्याचे पैसे काय दिले ह्याची चौकशी केली तों पुण्यापासून कल्याणचे टिकिटास भाडें रु० २ साडे दहा आणे प्रमाणें एकेकानें दिले असें आढळलें. सदर भाड्याचा आकार दर टिकिटाचा म्हटला म्हणजे दोन रुपये पावणेआठ आणे होतो असें असून येथेंही पुनः नजर चुकीनेंच त्या गरिबांस ज्यास्त भाडें पडलें. तर एडिटर महाराज, क्षणोक्षणीं स्टेशनावरील लोक अशा चुका करतील तर गरीब लोकांची फार बुडवणूक होणार आहे. पहा, एकादा गरिब कंगाल भिक्षा मागून कांहीं पैसे जमा करून एकाद्या गांवीं रेल्वेनें जाईल आणि जर त्यास अपुरें टिकिट स्टेशनावरून मिळेल तर उतरण्याचे वेळीं त्याचें टिकीट अपुरें सबब त्यास रेल्वे कंपनीच्या कायद्याप्रमाणें

शिक्षा मिळेल; कारण त्यानें थोडे पैसे देऊन ज्यास्त लांब सदर कंपनीस फसवून जाण्याचा गुन्हा केला असें होईल. बरें कदाचित मेहेरबानी करून रेल्वेकडील लोकांनीं त्यास गुन्ह्यांत न धरितां सोडिलें तरी जवळ ज्यास्त भाडें देण्यास पैसा नसल्यामुळेंही अटकेंत बसण्याचा प्रसंग त्याजवर गुदरणारच. ह्याकरितां माझी त्यांस अशी विनंती आहे कीं, बाबाहो तुम्ही अशा चुका करूं नका आणि परमुलखांत गरीबाच्या गळ्यास रसायन लावूं नका.

नंतर आम्ही सर्व मंडळी कल्याणास उतरलों. आणि मुंबईहून जी गाडी १० वाजतां जबलपुरास जाण्याकरितां निघते तींत सुमारें १२ वाजतां बसलों. नंतर ५ वाजण्याच्या सुमारास नाशिकास आलों, तों तेथें प्रयागाकडे जाण्याऱ्या लोकांची गर्दी बरीच होती. ती इतकी कीं, तेथें बिलकूल नवीन पासेंजर घालण्यास अवकाश नव्हता, तरी मेहेरबान गार्ड साहेबानीं एकेक गाडींत बुटांच्या लातांचा प्रहार करून सुमारें नेटिव बकरीं सत्तर सत्तर कोंडलीं आणि जेव्हां त्यांसच कंटाळा आला तेव्हां उरलेल्या प्यासेंजरास जावें म्हणून सांगितलें. तेव्हां काय विचारतां, एडिटर साहेब बायकांच्या गाडींत एकच हलकल्होळ उठलं; कारण गार्ड साहेबानीं स्टेशनावर टिकिटें घेऊन आलेल्या एकंदर बायकांस पहिल्यानेंच कोंडिलें होतें, आणि मग जेव्हां पुरुष मंडळी पैकीं कांहींस गाडींत कोंडून बाकीच्यांस तुम जाव म्हणून आज्ञा केली तेव्हां त्यांत कोणाचे नवरे, कोणाचे भाऊ, कोणाचे बाप असे होते. अशा ज्या सर्व बायका होत्या त्यांनीं गार्ड साहेबांस विनंती केली कीं, आम्ही पुढें जात नाहीं. आम्हास बाहेर काढा, तेव्हां त्यांस जबाब मिळाला कीं, नै. आतां अशा कृतीनें त्यांची काय अवस्था आणि दुर्दशा झाली असेल ह्याचा विचार वाचकानींच करावा.

नंतर आमची गाडी पुढें हाकली आणि सुमारें मध्यरात्रीच्या समयास भोंसावळेस आली. तेथें तिसऱ्या क्लासाच्या प्यासेंजराच्या गाड्यांत जागा नव्हती, सबब ज्यानीं तिसऱ्या क्लासाचीं टिकिटें

घेतलीं होतीं त्यांस सेकंड क्लासांत घातलें. परंतु महाराज काय विचारतां त्या लोकांस ज्यांत नेटिव सेकंड क्लास प्यासेंजर होते त्यांत मात्र भरलें आणि आम्ही जरी सगळा दिवस लांबून प्रवास केला होता तरी आम्हास रात्रीही विश्रांतीस जागा नाहींशी झाली. आमची स्थिति चौथे क्लासच्या लोकांप्रमाणें झाली. आम्ही रेल्वे-कडील लोकांस पुष्कळ सांगितलें कीं, आम्हास दुसऱ्या सेकंड क्लासांत बसवा आणि मग आमच्या गार्डीत तिसऱ्या क्लासचे प्यासेंजर भरा पण पडलें नेटिव तेव्हां आमचें ऐकतो कोण! आमच्या फजितीस पारावार नाहींसा झाला. रुपयांपरी रुपयेही गेले आणि शेवटीं चौथ्या क्लासच्या प्यासेंजराची दशा प्राप्त झाली. नंतर आम्ही सकाळीं हर्द्यास उतरलों तेव्हां सुमारें सहा वाजले होते. तेव्हां गाडींतून बाहेर पडण्याची मुष्किल पडली व स्टेशनमास्तर धक्के मारूं लागले. तेव्हां आम्ही त्यांस विचारलें कीं, असें करण्याचें कारण काय? तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं, "This is the way in which native passangers should be treated." आम्ही बरें म्हणून मुकाट्यानें गांवांत चालते झालों. नंतर दुसऱ्या दिवशीं आम्ही जबलपुरास आलों.

बऱ्हाणपुराच्या पुढें आपल्या तिकडील रीती भाती सर्व पालटतात. इकडे हिंदुस्थानीची झांक दिसूं लागते. माळवा, नेमाड आणि गोंद्रवण हे प्रांत लागतात. तापी, तवा आणि नर्मदा ह्या मोठ्या नद्या वाटेनें लागतात. बऱ्हाणपुरापासून सातपुड्याचा डोंगर लागतो. ह्या प्रांतांत आगगाडीचा रस्ता तयार करण्याच्या कामांत इंजनेरी कामाची खूपच अक्कल लढविलेली आहे असें स्पष्ट दिसतें. सगळ्या सातपुड्यांत फक्त एके ठिकाणीं मात्र बोगदा पाडावा लागला आहे. बाकी एकंदर रस्ता सपाट मैदानांतून नेला आहे. इकडे लोक पाहिले तों उर्दू भाषा बोलतात. इकडे यंदा दक्षिणे-पेक्षां पाऊस बरा झाला आहे. धारण स्वस्त आहे. गव्हाच्या शेतांचीं पटांगणें कोसोगणित आढळतात.

ईस्ट इंडियन रेल्वे जबलपुरापासून सुरू होते. त्यांत पहिला दुसरा, इंटर मिडियेट, आणि तिसरा असे क्लास आहेत. ह्यांत इंटर मिडियेट आणि तिसऱ्या क्लासाच्या गाड्यांचे भाग रिजर्व मिळतात. येणेंकरून उतारू लोकांची फार सोय होते. प्रयागचें स्टेशन फार चांगलें बांधलेलें आहे. इकडील मातीच्या विटा फारच चांगल्या होतात. तशा दक्षिणेंत होत नाहींत. मुंबईंत जसे तांबडे कुजे मिळतात तसे इकडच्या मातीचे कुजे फार चांगले बनतात. प्रयागांत पाहण्यासारिख्या जागा हायकोर्ट, कौन्सिल हाल, रेविन्यु बोर्ड कचेरी, चीफ इंजनेरचें हपीस, पादशाई बाग, आणि यमुनेचा रेल्वेचा पूल हे आहेत. प्रयागास यात्रा म्हटली म्हणजे त्रिवेणीचें स्थान, तत्प्रयुक्त श्राद्ध, वेणीनाद आणि

त्रिवेणिं माधवं सोमं भारद्वाजंच वासुकिं ॥
वंदे अक्षय वटं शेषं प्रयागं तीर्थ नायकं ॥ १ ॥

ह्या श्लोकाप्रमाणें देवदर्शन इतकीं आहेत. येथें गौरीचे लाखेचे दागिने चमत्कारिक मिळतात व त्याप्रमाणें सुती गालीचे सफेत रंगाचे फार नामी मिळतात. लोभ करावा हे विनंती.

मुक्काम प्रयाग, तारीख ९ नवंबर १८७१.

एडिटराचा स्नेही.

---

## मथुरा, वृंदावन, गोकूळ.

**ज्ञानप्रकाशकर्ते यांस.**

वि० वि०. आपणाकडे श्रीमथुरा क्षेत्राच्या यात्रेची हकीकत लिहून पाठवितों, तिजला कृपा करून आपण आपल्या सुंदर पत्रीं जागा द्याल अशी आशा बाळगतों.

महाराज, अलाहाबादेस आम्ही रेल गाडींत स्वार झालों तों हात्रोज रस्त्याच्या स्टेशनावर (त्या स्टेशनास नेटिव लोक मेंढूचें

स्टेशन म्हणतात) उतरलों. ह्याचें भाडें तिसऱ्या क्लासाचें ४ रुपये ९ आणे ३ पै पडतें. तेथून हात्रोज गांव ६ मैल आहे व तेथून मथुरा २३ मैल आहे. इकडे सर्व रांगड्या लोकांची वस्ती व ते सर्व वृज भाषा बोलतात. हिंदूचे पेराव पुरुषाचे मुसलमान पुरुषाच्या पेरावासारखेच आहेत. फक्त बायकांच्या पेरावांत, हिंदूच्या बायका घागरा नेसतात व काचोळी घालितात आणि आंगावरून चादर अगर छिटाची पासोडी पांघरतात आणि मुसलमाननी पायजमा घालून आंगांत कफणी घालतात आणि वरून एक लुंगी पांघरतात. हा काय तो फरक आहे.

बायकांच्या वेण्या बिलकूल घालीत नाहींत म्हटलें तरी चालेल. ह्या मुलखांत आम्हास हात्रोजेपासून तों तहत मथुरे पर्यंत एकसारखी पांढरी माती लागली. देश अगदीं सपाट मैदान आहे. एकंदर २९ मैलाच्या प्रदेशांत फक्त दोन मोऱ्यांस मात्र पूल बांधलेले आढळले. बाकी रस्ता सपाट. देश फार सुपीक असून इकडे स्वस्ताईही बरीच आहे. हात्रोजेपासून मथुरेस जाण्यास बैल गाड्या, घोड्याचे शिग्राम वगैरे चांगले सोईवार मिळतात. मथुरेस जाण्यास ३ रुपये एका शिग्रामास भाडें पडतें. मथुरेस यमुना नदी आहे तिला नावेचा पूल आहे. तो उतरून गांवांत जावें लागतें. पुलावरून माणसास जाण्यास एक पैसा हशील पडतें.

मथुरा क्षेत्र फार रमणीय आम्हास वाटलें. हें विशेषें करून दक्षिणोत्तर यमुनेच्या तटाकीं वसलें आहे. येथें इमारती फारच चांगल्या आहेत. त्याप्रमाणें दक्षिणेंत कोठेंही इमारती आढळत नाहींत. येथें सर्व इमारती दगडी असून कोरीव काम फार. हवेल्या चार चार मजले उंच व माहिरपदार कामें करण्याचा प्रचार फार. येथें यमद्वितीयेच्या दिवशीं विश्रांती घाटावर स्नान करण्याकरितां लाखो मनुष्यांचा मेळा जमतो. इकडे कृष्णभक्त लोक फार आहेत. सर्व गुजराथेंतील, मारवाडांतील, काठेवाडांतील वगैरे आसमंतांतील

प्रदेशांतले लोक येथें दरसाल यात्रेस येतात. येथें मुख्य ब्राम्हण यमुनेचा तीर्थसंबंधी विधी करविण्याकरितां म्हटले म्हणजे चौबे म्हणजे चौहूवदी हे आहेत. त्यांचेंच काय तें मुख्य प्राबल्य. हे सुमारें चार हजार आहेत. एकंदर वस्ती सुमारें सवालाख पासून दीड लाख आहे. त्यांत मोठा भरणा मारवाड्यांचाच आहे. हे लोक कोट्याधीश सावकार आहेत. येथें सुमारें २५ देवळें एकेकास दहा पासून वीस लक्ष रुपये खर्च झालेले अशा प्रकारचीं आहेत. येथें लक्ष्मीचंद म्हणून एक मोठा सावकार होऊन गेला. त्यानें येथें कोट्यावधी रुपये खर्च केले आहेत. व धर्मशाळा आणि देवालयें बांधलेलीं आहेत. हल्लीं ह्याचा मुलगा आहे. त्याची ही पेढी मोठी आहे. दानधर्म मोठा आहे. येथील ज्या इमारती बांधलेल्या आहेत त्या सर्वांस धोंडे भरतपूर आणि जयपूर ह्या प्रांतांतून आणिलेले आहेत. हे धोंडे कुरंदाच्या जातीचे असून कोरीव काम करण्यास फार मऊ लांकडापेक्षां ह्या धोंड्यावर येथें कोरीव काम फार सफेदार होतें. संगमरवरी दगडाचीं कामेंही इकडे पाहण्यासारखीं आहेत.

येथून तीन कोसावर उत्तरेस वृंदावन आहे. तें राधेचें सासर होतें. तेथें श्रीकृष्ण विहारास गोकुळांतून जात होते. वृंदावनास सुमारें हजार पंधराशें देवळें आहेत. त्या सर्वांची तऱ्हा मथुरेच्या देवळाप्रमाणेंच आहे. येथें मथुरेंतील लक्ष्मीचंदानीं एक देवालय बांधिलें आहे. त्यास सुमोर पन्नास लाख रुपये लागले असावे असें वाटतें. त्याप्रमाणेंच बाबूलाल बिहारी म्हणून एक बंगाली बाबू आहेत. त्यांनीं सुमोरें चाळीस लाख रुपये खर्च करून एक संगमरवरी दगडाचें कृष्ण मंदीर बांधिलें आहे. हें पाहण्यासारिखें आहे. ह्या देवालयांतून मोठ मोठाले बगीचे फार चांगले आहेत. व तलावही मोठे आहेत. आंत नावेंतून विहार करितां येतो. हीं मंदिरें पाहून चित्तास जो आनंद होतो त्याचें कथन अनिर्वाच्य आहे. मुंबईकडील व पुण्याकडील हवेल्या ह्यापुढें तृणप्राय आहेत.

येथें जयाजीराव शिंदे अलीजा बहादूर ग्वाल्हेर ह्यानीं एक कृष्ण मंदीर बांधण्याचें काम चालविलें आहे. त्यास हल्लीं दहा लाख रूपये खर्च झाले आहेत. त्या शिवाय येथें पुष्कळ मंदिरें व इमारती भरतपूरचे राजाच्या, झिंदचे राजाच्या, नाभाचे राजाच्या वगैरे पुष्कळ आहेत.

वृंदावनास कृष्णाच्या वेळचें कुंजवन आहे. तसेंच निधिवन आहे. जेथें कृष्णानीं गोपीचें वस्त्र हरण केलें तो चीरघांट आहे. व त्यावर कदंब वृक्ष आहे. केशी दानवाचा वध केला तो केशी-घांट आहे. राधा गुप्त झाली तें ठिकाण आहे. अशीं जुनीं अनेक ठिकाणें आहेत. मथुरेस ज्या ठिकाणीं कंसाचा वाडा होता तें ठिकाण आहे. श्री कृष्णानीं कंस वध करून विसावा घेतला आहे त्या स्थलास विश्रांतघांट म्हणतात. तेथें पादुका आहेत व वर देवालय आहे.

गोकूळ मथुरेपासून दक्षिणेस तीन कोस आहे तेंही यमुना तटाकीं आहे. गोकुळ हा गांव पुजाऱ्यास जहागीर आहे. येथें मांकडांचा सुकाळ आहे. गोकुळांत नंदाच्या वाड्याची जागा आहे. रमण रेती आहे. कृष्णानीं बाळलीला केल्यपैकीं पुष्कळ जागा आहेत. गोकुळापासून अर्ध कोसावर महावन आहे. तेथेंही कृष्ण लीलेचीं पुष्कळ स्थलें आहेत.

इकडे लोक साधारणतः गरीब आहेत. इंग्रजी अमलास फार भितात. परंतु अमलामध्यें बरीच अंदाधुंदी आढळते. मथुरेच्या पेढ्याचा मोठा लौकिक आहे. येथें पितळेचीं भांडीं तऱ्हे तऱ्हे-चीं मिळतात त्यांत पितळेच्या गाई फार सुबक होतात.

एडिटराचा मित्र फिरस्ता.

# दिल्ली.

**ज्ञानप्रकाशकर्ते यासः—**

वि० वि०. गेल्या पत्रीं आपणाकडे श्री मथुरा क्षेत्राची हकीकत लिहून पाठविली त्या वेळींच तिकडील पोलिसाची वगैरे व्यवस्था कोणत्या प्रकारची आहे याबद्दल पुढें लिहूं म्हणून लिहिलें होतें, परंतु त्याजबद्दल एकंदर हकीकत पुढें लिहून कळवीन. आतां आपणाकडे दिल्ली शहरची हकीकत लिहून पाठवितों ती कृपा करून छापाल अशी आशा आहे.

दिल्ली शहरांत आम्ही ईस्ट इंडिया रेल्वेच्या स्टेशनावर किल्यांत उतरलों. हें स्टेशन फार मोठें आहे. इकडील स्टेशनाप्रमाणें स्टेशनें मुंबई इलाक्यांत नाहींत. विटेबंदी काम असून स्टेशनें उंच उंच बांधिलेलीं आहेत. व सगळ्याकडे कमानीदार दरवाजे व खुल्या मोठमोठाल्या कमानी आढळतात. रेल्वे स्टेशनाजवळच एक मोठी धर्मशाळा आहे. तिला मुरची सराई म्हणतात. ह्या सराईंत मुशाफर लोकांस उतरण्याची सोय चांगली आहे. खालच्या मजल्यांत ज्या कोठड्या आहेत त्यांत उतरल्यास दर माणसीं एक पैसा दररोजचें भाडें पडतें व वरील मजल्याच्या कोठडींत उतरलें तर दर कोठडीस दररोज आठ आणे भाडें पडतें. ह्या धर्मशाळेंत एक कुवा आहे त्याचें पाणी फारच चांगलें आहे. धर्म शाळेच्या मागच्या अंगास यमुनेचा नहर बांधून आणिलेला आहे. ह्याप्रमाणें मुशाफराच्या सोयी फार चांगल्या आहेत.

हें शहर दिल्लीच्या पादशहाच्या वेळीं फारच नांदतें असावें असें अनुमान होतें. हल्लीं तें अगदीं मोडकळीस आलें आहे तरी मुंबईच्या जवळ जवळ बरोबरीचें आहे. आम्ही सुमारें सहा रस्ते मोठ मोठाले दक्षिणोत्तर व तितकेच पूर्व पश्चिम फिरलों. तितक्यांतून दुमजला तीन मजला अशा हवेल्या आढळल्या. व तितक्या हवेल्यांतून दुकानें व बिढाडें गच्च भरलेलीं आढळलीं.

दिल्ली पासून सुमारें सहा मैलांवर मनसूरशा वजीर ह्याची कबर आहे. तिचें काम फार सुरेख आहे. चोंहो बाजूंनीं चार हौद सुमारें १२५ फूट लांब आणि ३० फूट रुंद असे असून आंत कारंजीं आहेत. व भोंवताली मोठा बगीच्या आहे. मधील इमारतीस चारीकडून चार मोठे सोपे आहेत व मध्यें मनसूरची कबर आहे. कबरेचा जो हाल आहे ह्यांत सर्व काम संगमरवरी दगडाचें नक्षीदार असून रंगामेजी आहे. मधील कबरेचा चबुत्रा सुमारें तीन मजला एक गज रुंद आणि पाऊण गज उंचीचा आहे. ह्या चबुत्र्याचें काम फारच नक्षीदार छांदार आहे. ह्या कबरेपासून पुढें सुमारें सहा मैलांवर कुतुबुदीन पादशहानें बांधिलेला मनोरा (लाट) आहे. ह्याचा घेर ५२ गज आहे आणि त्यास एकेक फूट उंचीच्या ३७९ पायऱ्या आहेत. ह्यास पांच मजले आहेत व पायऱ्या वर्तुळाकार जिन्याप्रमाणें बांधिल्या आहेत. हें काम दगडी आहे. ही लाट पूर्वी पृथु राजाची इमारत होती त्या जाग्यांत बांधलेली आहे. येथें पृथु राजाच्या वेळची इमारत जी मोडून राहिली आहे तीही दगडाची असून कोरीव आहे. येथें जवळच योगमायेचें स्थान आहे. तेथें हिंदु लोक दर्शनास जातात. कुतुबाच्या वंशजांच्या कबरी इकडे जवळ आसपास आहेत.

मनसूरच्या कबरेपासून सुमारें ३ मैलांवर हुमेयूनची कबर आहे. तिचें काम सगळें संगमरवरी दगडाचें नक्षीदार आहे. ह्याचे कबरे समोंवती मोठा सुंदर बाग आहे व तळ मजल्याला चोहीं बाजूनीं सुमारें २५ फूट रुंद आणि दर एक अंगानें २०० फूट लांब ओटा दगडी फरसबंदीचा आहे. मध्यें तीन मजली संगमरवरीची जाळीदार काम केलेली कबरेची इमारत आहे.

ह्या कबरेपासून दिल्लीकडे परत येतांना वाटेवर एक मैलाच्या अंतरावर बेबरच्या वंशजांच्या कबरा आहेत. ह्यांतील कामें पाहून अक्कल गुंग होते. त्याचें वर्णन आतां मी फारसें करीत नाहीं. इतकेंच कळवितों कीं, जसा हस्तिदंत कोरून बारीक नक्षीदार

काम सांवतवाडीकडे लोक करतात त्याप्रमाणें संगमरवरी दगड कोरून मोठ मोठाले दरवाजे, खिडक्या, भिंती वगैरेचीं कामें केलीं आहेत. अशा मोठ मोठाल्या कबरी ह्या ठिकाणीं दहा वीस आहेत. येथें कोट्यावधी रुपये खर्च झाला आहे.

दिल्ली शहरांत जुम्मा महजीद म्हणून एक मोठी इमारत तांबड्या कुरुंदाच्या दगडाची बांधलेली आहे. ह्या महाजिदीस तीन अंगानीं मुंबईतील टाऊनहॉलाला बांधलेल्या पायऱ्याप्रमाणें पायऱ्या आहेत. ह्याप्रमाणें येथें प्राचीन इमारती पाहण्यासारख्या आहेत. हल्लीं सरकारानीं शहरांत एक म्युझियम केलें आहे. त्यांत वाघ, चित्ते वगैरे चमत्कारिक पशु पक्षि पाहण्यासारखे आहेत.

येथें अत्तरें व सुगंधी तेलें स्वस्तीं मिळून उंच्या प्रतीचीं मिळतात. ह्याप्रमाणेंच कलाबतूच्या कामाच्या टोप्या व जोडे फार चांगले मिळतात. येथें पांढरीं पागोटीं चंदेरी तऱ्हेचीं उंच्या प्रतीचीं लाखो रुपयांचीं होतात आणि तीं दक्षिणेंत आणि गुजराथेंत विकण्यास जातात.

येथील हवा आपल्या तिकडील देशाप्रमाणेंच आहे. आतां मला झोंप येते म्हणून पुरें करतों हीच विनंती.

एडिटराचा मित्र
एक फिरस्ता.

---

## मायापुरी अथवा हरिद्वार.

ता० १७ दिसेंबर १८७१.
मुक्काम० श्री क्षेत्र वाराणसी.

**ज्ञानप्रकाशकर्ते महाराजः—**

वि० वि०. गेल्या पत्रीं आपणास श्री क्षेत्र मथुरा व शहर दिल्ली येथील माहिती लिहून पाठविली ती आपण आपल्या सुंदर पत्रीं छापून प्रसिद्ध केली, हें पाहून मला पुढें आणखी वायव्येकडील

प्रांतांतील शहरांची व पंजाबांतील शहरांची माहिती लिहून पाठविण्यास उमेद आली आहे. ती यथामती लिहितों. तिला कृपा करून आपल्या येत्या अंकीं जागा द्यावी.

हरिद्वार हें गांव म्हटलें म्हणजे लहान आहे खरें, परंतु येथेंही इमारती मोठ मोठाल्या आहेत. हें गंगेच्या काठीं वसलेलें आहे. हें सुमारें २ मैल लांब असून एक मैल रुंद आहे. येथें मोठ मोठ्या राजे रजवाड्यांनीं लाखो रुपये खर्चून धर्मशाळा बांधिल्या आहेत. येथें हरिद्वार म्हणजे बद्रिनारायणास जाण्याची वाट अथवा हरिद्वार म्हणजे बद्रिकेदारास जाण्याची वाट अथवा गंगाद्वार म्हणजे गंगोत्रीस जाण्याची वाट अथवा मोक्षद्वार म्हणजे ह्या मार्गानें पांडवांनीं स्वर्गारोहण केलें म्हणजे स्वर्गास जाण्याची वाट अशी ह्या गांवास वेगळालीं नांवें आहेत.

येथें आम्ही हिवाळ्यांतच आलों म्हणून थंडी आम्हास बरीच लागली. काय सांगावें एडिटरराव, आम्ही बर्फ पुष्कळ वेळां खाल्लें आहे व तें अतिशय थंड असतें खरें, परंतु लंवडीचें तें पानचट लागतें आणि येथील गंगोदक त्यापेक्षांही गार असून अत्यंत रुचकर आणि पाचक असें आमच्या अनुभवास आलें. येथून तीन मैलांवर सप्तश्रोत म्हणजे सात ऋषींनीं अनुष्ठान केलें ती जागा गंगेच्या काठींच आहे. तेथें गंगेचे पाट काढण्याकरितां इंग्रजांनीं पहिलें धरण बांधिलें आहे. त्या नंतर दुसरा बंधारा हरिद्वारास बांधिला आहे. येथून सुमारें २५ मैल पश्चिमेस रुडकी म्हणून एक मोठें शहर आहे. तेथें गंगेच्या पाटांत चक्रें लाविलीं आहेत आणि त्यावरून हजारों यांत्रिक कारखाने सुरू ठेविले आहेत. गंगेचे शेंकडो कालवे काढिले आहेत. त्यास जेथें जेथें मोठा गांव किंवा शहर लागलें म्हणजे चांगले घाट बांधिले आहेत व त्यावरून पूलही केले आहेत. सारांश सांगावयाचा इतकाच कीं, प्रतिगंगौघ करून प्रांतांतील लोकांस गंगास्नान व पान ह्याचा लाभ इंग्रज सरकारानीं दिला आहे असें म्हटलें तरी चालेल.

काय एडिटर साहेब सांगावयाचें. सदरील जो फायदा मी सांगितला तो हिंदुधर्म दृष्टीनें पाहून सांगितला, परंतु ह्या कालव्या-पासून देशांत बागाइताची गर्दी झाली आणि पिकाची सुबत्ता होत चालली आहे. भात, वरण, पांढरी पोळी, एक भाजी, ताकाची कढी अगर दही आणि तूप, साकर इतकें नित्य खाणारास इकडे दरमहा रुपये ३ बस होतात. इतकी तर स्वस्ताई ह्या कालव्यामुळें झाली आहे.

हरिद्वार हें गांव पूर्वी गुजर राजाच्या ताब्यांत होतें. त्याची राजधानी मंगलोर हें शहर होतें. तें येथून दहा कोसांवर आहे. हल्लीं त्या राजाचा नष्टांश झाल्यामुळें एकंदर अम्मल इंग्रजी झाला आहे.

येथें एकानें बंडाच्या सालची अशी गोष्ट सांगितली कीं, हिमा-लयाच्या पायथ्याशीं एका नबाबाचें राज्य होतें. तो बंडाच्या सालीं बदलला आणि त्याला बदमाष लोकही पुष्कळ मिळाले. तेव्हां सुमारें पांच हजार हत्यारबंद शिपाई घेऊन तो नबाब हरिद्वारावरून पुढें जाण्यास निघाला. तेव्हां प्रथमतः मुळचा जो गंगेचा ओघ आहे, तेथें वाळवंट बंधाऱ्यानें मोठें झाल्यामुळें त्यानें तळ दिला. तेव्हां बंधाऱ्याच्या देखरेखीवरचा एक इंजिनेर व पन्नास शिपाई स्टेशनावर होते. त्यांनीं बंधाऱ्याच्या फळ्या काढून टाकिल्या आणि स्वस्थ बसले. तों सुमारें २५ मिनिटांत पांच हजार लोक वाहून गेले आणि त्या इंजिनेराची मोठी शिफारस झाली. ह्यावरून पहा मुख्य प्रसंगाच्या कामांत हिंदू लोक किती वेडे आहेत ते. तर माझा त्यांस उपदेश आहे कीं, बाबानो आतां पहिल्यानें शहाणे व्हा, आणि मग योग्य वाटेल तर दुसरा विचार करा. अस्तु विषयांत-राची माफी असावी.

हरिद्वारीं ब्रम्हघाटीं मुख्य स्नान करावें लागतें मग कुशावर्ती स्नान व श्राद्ध होतें. तेथून ३ मैलांवर कनखळ गांव आहे तेथें गंगेस एका घाटीं "कङ्खळ" असें नांव आहे. ह्याचा

अर्थ असा कीं, असा कोण खळ आहे कीं, जो येथें स्नान केल्यास मुक्त होणार नाहीं. "कुशावर्त" ह्याची कथा अशी सांगतात कीं, श्री दत्तात्रय समाधी लावून तपश्चर्येस बसले असतां भगीरथानें भागीरथी आणिली. ती वाटेनें येतांना दत्तात्रय बसल्या ठिकाणीं आली आणि त्यांनीं जे कुश ठेविले होते ते विस्तृत केले आणि दत्ताची समाधी भंग केली. तेव्हां त्यांनीं डोळे उघडले आणि पाहिलें तों गंगोदकानें सर्व व्यापिलें. त्यावर उभयतांचा मोठा संवाद झाल्याचें मोठें पुराणच आहे, परंतु शेवटीं दत्तानीं त्या जाग्यास असा वर दिला कीं, येथें जो श्राद्ध करून पिंड देईल त्याचे पितर मुक्तीस जातील.

काय एडिटर साहेब त्रिंबकाजवळचें उष्ट्या पत्रावळीचें खङ्खळ आणि तेथील कुशावर्त कधीं कसें झालें तें कोणीं कृपा करून कळवील तर बरें होईल.

हरिद्वार ही पुण्यभूमी पडली म्हणून स्त्री संभोगादि पातकें तेथें घडूं नयेत याकरितां येथें रात्री कोणीं राहात नाहीं. किरकोळ दुकानदार, व यात्रेकरी मात्र राहतात. कुंभास येथें फार मोठा मेळा जमतो असें सांगतात. गेल्या कुंभास बारा लक्ष मनुष्यें जमलीं होतीं व तीस हजार लोक सरकारानें बंदोबस्ताकरितां आणिले होते. येथें वर सांगितलेले कङ्खळ गांवीं ब्राम्हण लोक राहतात व दुसरे ज्वालापूर म्हणून मोठें गांव २ कोसांवर आहे तेथें राहतात.

येथून बद्रिकेदार १५० कोस आहे, परंतु रस्ता पहाडांतून सबब तेथ पर्यंत पोंहोचण्यास सुमारें १ महिना लागतो. तेथून ३० कोस पुढें पहाडांत बद्रिनारायण आहे. त्यास जाण्यास १५ दिवस लागतात. त्याच्या पुढें गंगोत्री ३० कोस आहे. तिकडे जाण्यासही दहा, बारा दिवस लागतात. ही यात्रा लोक वैशाख शुद्ध ३ पासून कार्तिक शुद्ध १च्या आंत करितात. नंतर सहा महिने सर्व मार्ग बर्फानें आच्छादिले जातात. येथें पाहाडांतून जाण्यास बसण्याकरितां 'झंपान' म्हणजे एका बाजल्यास दोहों

अंगांनीं वेळूंची तिकटी बांधून त्यामध्यें बास अडकविलेला असतो आणि त्यास दोन भोई उचलतात. अशा डोल्या मिळतात, परंतु रुपये ७५ पडतात, म्हणून गरीबांस अवघड पडतें. बद्रिनारायणा पलीकडे ब्रम्हकपाट स्थान आहे. तेथें पिंडदान केलें म्हणजे करणारा पुढें श्राधें करण्याच्या खटपटींतून मुक्त होतो. हारद्विरास गंगा येण्या पूर्वी तिला मंदाकिनी आणि अलकनंदा ह्या दोन नद्या मिळाल्या आहेत. ह्यापैकीं एकीचा संगम गंगेशीं झाला आहे तेथें देवप्रयाग आहे.

कुंभाच्या मेळ्यास येथें ५।६ लक्ष गोसांवी नंगे व कौपीनधारी असे जमतात. इकडे दक्षणी लोकांपेक्षां पंजाबी लोक फार यात्रेस येतात. आतां पुरे करितों. पुढें लिहीन.

एडिटराचा मित्र
एक फिरस्ता.

---

## कुरुक्षेत्र.

मुक्काम श्री० क्षेत्र वाराणशी.
ता० १८ दिसेंबर १८७१.

**ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—**

वि० वि०. गेल्या पत्रीं आपणाकडे हरिद्वाराची माहिती थोडी-शी लिहिली. आज कुरुक्षेत्र अथवा ठाणेश्वर (स्थानेश्वर) ची माहिती लिहितों. स्थानेश्वरास जाण्याकरितां रुडकीवरून सारणपुरास जावें लागतें. सारणपूर हें मोठें शहर आहे. येथें जिल्हा स्टेशन आहे. येथें एक ऑंग्लोव्हर्न्याक्युलर स्कूल आहे. तेथें फी दर मुलास महिना २ आणे आहे. शाळा बरी आहे. येथें लांकडी काम पेट्या वगैरे नक्षीदार पहिल्या प्रतीचें बनतें. येथून आगगाडींत बसून अंबाळ्यास जावें. अंबाळा हेंही जिल्हा स्टेशन आहे. येथून स्थानेश्वर १८ कोस आहे. तेथें पाय मार्गानें एक्यांतून जाण्यास ६ तास लागतात.

कुरुक्षेत्र ही पूर्वी कौरव आणि पांडव ह्यांच्यामध्यें युद्ध झालेली जागा आहे. येथें सरस्वती नदी आहे. येथें पूर्वी जिल्हा स्टेशन होतें, परंतु हल्लीं रेल्वेमुळें तें तेथून काढून अंबाल्यास नेलें आहे. ह्या गांवीं ब्राम्हण लोकांची वस्ती दाट आहे. येथून हस्तनापूर ८ कोस आहे. तें आतां लहानसें खेडें आहे. कुरुक्षेत्राचें क्षेत्र ८४ कोसांचें आहे. येथें स्थानेश्वर महादेवाचें प्राचीन स्थान सरस्वती कुंडाच्या काठीं आहे. तेथें दोन प्रहरीं स्नानाचें फल आहे. येथें लक्ष्मी कुंड म्हणून एक मोठें तळें २ कोस लांबीचें आहे. ह्यांत काय तें मुख्य स्नान. भारतांतील युद्धाच्या सर्व जागा येथें अबालवृद्धांस माहीत आहेत. मला वाटतें कीं, पुराणिकानें भारत चांगलें सांगतां यावें म्हणून येथें येऊन सर्व स्थानें पाहून जावीं. त्याप्रमाणेंच भागवतांतील कृष्ण लीला चांगली सांगावयास पाहिजे तर मथुरा वृंदावन आणि गोकूळ येथील सर्व स्थानें पाहावीं.

येथें कर्णाळ म्हणून एक मोठें गांव २३ मैलांवर आहे. ती अंगदेशाची राजधानी. राजा कर्णाचें मुख्य रहावयाचें ठिकाण होतें. ह्या कुरुक्षेत्रांत भीष्मानीं युद्ध करून ते शरपंजरीं पडले ती सर्व जागा व बाणगंगा हीं स्थळें, त्याप्रमाणेंच समसप्तकची जागा व चक्रव्यूह आणि शकटव्यूह व कर्णाच्या फौजेची वगैरे सर्व जागा दृष्टीस पडतात. कर्णानें आपल्या फौजेनिशीं जेथें तळ दिला होता त्यास राजा कर्णका खेडा म्हणतात. तेथें कर्ण मोठा दाता सबब त्यानें धर्मादाय केला, तो इतका कीं, ब्राम्हणांनीं सुवर्ण मुद्रांनीं भरलेल्या गोण्याच्या गोण्या नको म्हणून टाकून गेले. त्या मुद्रा पांच पन्नास त्या जागीं दरसाल पावसाळ्यांत लोकांस सांपडतात व त्या मुद्रा लोक प्रसादिक म्हणून ज्यास्त दाम देऊन घेतात, असें येथें पुष्कळ लोक सांगतात. गदा युद्ध झालेली जागा व अश्वत्याम्यानें पांडवाचे लोक निजलेल्या ठिकाणीं मारले ती जागा, अशा सर्व जागा येथें आहेत. सूर्य ग्रहणांत

त्याणू तीर्थी स्नानाचें मोठें पुण्य आहे. यंदाच्या सूर्य ग्रहणांत सुमारें पांच सहा लक्ष यात्रा तेथें जमेल असा अंदाज होता.

इकडील मुलखांत लोकांस शिकण्याची चाढ आमच्या तिकडच्य सारखी फारच कमी आहे. त्यांची अज्ञानानेंही पाठ घेतली आहे. ज्याप्रमाणें आपल्या तिकडें भारतीय युद्धांत चार चाकी, २ चाकी रथ काढितात त्याप्रमाणें रथ गाड्या करण्याची इकडे सध्यां वहिवाट आहे. लोभ असो देणें हे विनंती.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

---

ता० १९ डिसेंबर १८७१.

मुक्काम श्री क्षेत्र वाराणशी.

ज्ञानप्रकाशकर्ते महाराज:—

वि० वि०. म्यां गेल्या पत्रीं तुम्हास कुरु क्षेत्राची थोडी माहिती लिहून पाठविली. हल्लीं अमरसर, लाहोर, मुलतानची लिहितों.

कुरुक्षेत्राहून अमरसरास जाण्याचें असलें तर अंबाळ्यावरून जाणारी रेल्वे नजीक पडते. अंबाळा हें स्टेशन सिमल्यास जाण्यास जवळ आहे. इकडे हिमालय पर्वतास पहाड म्हणण्याचा सांप्रदाय आहे. काय सांगूं एडिटरराव हा हिमालय जेव्हां म्यां पाहिल्यानें हरिद्वारच्या वाटेनें रुडकीस पाहिला त्या वेळची माझ्या मनाची स्थिति! ह्या पर्वताच्या मध्य प्रदेशास जो पहाड आहे तो सर्व निरंतर श्वेत, चकचकणारा आणि गगन चुंबित दिसला. आम्हा दाक्षिणी लोकांस हा बर्फाचा डोंगर हजारों कोस पसरलेला पहाणें म्हणजे एक अद्भुत चमत्कार वाटतो. तुम्हास सारांश इतकाच सांगतों कीं, मी तर अल्प मतीच आहे, परंतु थोरथोरांनीं जें त्याचें वर्णन लिहून ठेविलें आहे तें वाचून देखील त्याचे यथार्थ ज्ञानाचा लेशाही होणें मुष्कील आहे. तें काय आहे तें सांगतांच येत नाहीं. अस्तु.

आम्ही अंबाळ्याहून निघालों तों रेल्वेचा सतलज नदीवरील

प्रचंड पूल उतरलों तेव्हां त्या पुलाचें काम पाहून आम्हास परमाश्चर्य वाटलें. येवढा मोठा पूल हिंदुस्थानांत दुसरा विरळाच असेल. ह्याच सतलज नदीच्या काठीं आटक हें खेडें आहे व तेथ पावेतों हिंदू लोकांनीं जावें अशी मर्यादा पूर्वीच्या राज्यकर्त्यांनीं केलेली होती. येथून थोडया कोसांवर पानपत खेडें आहे. त्याच्या जवळच पेशव्यांच्या फौजेची कत्तल उडाली.

आम्ही अमरसरीं पोहोंचल्यावर शहर पाहिलें तों आम्हास फारच चांगलें भासलें. ह्या शहरांत लोकरीचा, रेशमाचा, आणि कलाबतूचा कशिदा काढणारे लोक पुष्कळ आहेत. येथें शालजोडया वगैरे लोकरीचे जिन्नस नाना तऱ्हेचे चमत्कारिक मिळतात. ह्याच गांवीं गुरु नानक जो शीख लोकांचा धर्मस्थापक होऊन गेला त्याची समाधी आहे. ती पाहण्यास सर्व विद्याचारसंपन्न हिंदूनीं जाण्याचा यत्न करावा. काय सांगूं! जेथें कबर आहे त्या जाग्याचें वर्णन एडिटर बावा इतक्या दिवस अरेबियन नाईट मधील वर्णन मला गप्पासारखें वाटत होतें, परंतु आतां ती भ्रांती उरली नाहीं. खरोखरीच तें वर्णन यथार्थ आहे; कारण नानकच्या समाधिच्या इमारतीचें काम त्या वर्णनाप्रमाणें आहे. आंतील संगमरवरी दगडाच्या इमारतीला "दरबार" ही संज्ञा आहे व सतलज, बीहा, रावी वगैरे नद्या फारच मोठ्या असल्यानें त्यांस भिठ्ठा दरयाव ह्मणण्याची चाल आहे.

नानकाचें दरबार अमृत सरोवराच्या मध्यें आहे. त्याला एका बाजूनें पायवाट संगमरवरी दगडांची बांधलेली आहे. त्या वाटेवर जे उजेडाकरितां कंदील दुतर्फा लाविले आहेत त्यांच्या फ्रेमी सर्व सोनें आणि चांदीच्या गिलिटाच्या आहेत. दरबारची सर्व इमारत तीन मजले पावेतों संगमरवरी दगडाची आहे, आणि छताला चोहोंकडे आरसे गालिच्याच्या बुटासारखे बसाविलेले असून मध्यें जो वेल काढिला आहे तो सोन्याच्या आणि चांदीच्या

शाईचा आहे. सोनें आणि चांदी येथें लोखंडाप्रमाणें खर्च केली आहे. छताच्या कामाची पतलावण बेहद्द कारेगिरीची आहे.

येथील बगीचे म्यां पाहिले तेव्हां मला असें वाटलें कीं, धन्य आहेत हे लोक. आम्हा लोकांस बगीच्या अगोदर नको आणि तशांत कांहीं नाद असला तर त्याचें ज्ञान नाहीं असें म्हटले तरी चालेल. अस्तु. येथें मुख्य महात्म म्हटलें ह्मणजे अमृत सरोवरीं स्नान करण्याचें आणि गुरु नानकाच्या समाधीचें दर्शन घेण्याचें आहे. इकडे मेवा मिठाईची गर्दी हो. आतां झोंप येते सबब पुरे करितों. लोभ असावा हे विनंती.

---

मुक्काम वाराणशी. ता० २० डिसेंबर १८७१.

**ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—**

वि० वि०. काय सांगूं अमरसरच्या गुरु नानकाच्या मंदिराची शोभा. या मंदिरास दरबार म्हणतात, हें मीं पूर्वींच्या पत्रीं लिहून कळविलेंच आहे. आतां ह्या मंदिरास पांच मोठाले कळस आहेत. ते आपल्या पर्वतीच्या देवालयाच्या कळसापेक्षां प्रत्येकीं तिपट मोठे असून त्यावर सोनें चढविलें आहे. सारांश सोनें रुपें येथें कांहींच पदार्थ नाहीं, असें त्या कालीं होतें असें मानणें भाग आहे.

ह्या मंदिराचें अद्यापि काम चाललें आहे. तटाच्या दोन बाजूंनीं संगमरवरी दगडाचा कटा आहे. बाकी दोन बाजूचें काम सुरू आहे. ह्याप्रमाणें स्थिति आहे.

अमरसरापासून दक्षिणेस ३२ मैलांवर लाहोर आहे. हें शहर बारा कोस घेराचें आहे. ह्याच्या सभोंवती जे बगीचे आहेत ते अवर्णनीय आहेत. कित्येक बगीच्यांतून ६ ऋतूंत जे वेगवेगळाले मेवे उत्पन्न होतात ते पिकतात. वसंताचा वाफा वेगळा. ग्रीष्म ऋतूचा वेगळा. ह्याप्रमाणें सर्व काळचे वाफे दहा बिघ्यांचे केलेले आहेत. काय सांगावें एके ठिकाणीं तर असा चमत्कार दृष्टीस पडला कीं, पलं-

गावर बिछाना घालून तोंडानें झाडाचीं नाना तऱ्हेचीं फळें खावीं, अशी कांहीं चमत्कारिक योजना केलेली आहे. सर्व कांहीं विलक्षण आहे. लाहोर हें रावी नदीच्या कांठीं आहे. ह्या नदीचे जे कालवे काढलेले आहेत ते प्रत्येकीं नदीच्या बरोबरीचे आहेत असें म्हटलें तरी चालेल.

लाहोरांत पाहण्यासारख्या इमारती म्हटल्या म्हणजे वजीरखानाची महजीद, बारद्वारी, जाहांगीरचा मुकरबा इत्यादि आहेत. वजीरखानाच्या महजिदींत सोनेरी शाईनें सर्व कुरान लिहिलें आहे. बारद्वारीचें काम सगळें संगमरवराचें आहे. ह्या इमारती पाहिल्या म्हणजे चित्तास फारच आनंद होतो.

पंजाबाच्या सरहद्दीवर मुलतान प्रांत लागतो. त्यांत मुलतान हें गांव पाहण्यासारखें आहे. येथें नरसिंह अवतार झाला. जेथें नरसिंह खांबांतून निघाला तें स्थान व प्रल्हादपुरी ह्या जागा हिंदु लोकांस पाहण्यासारख्या आहेत. इकडे आज पावेतों बैराग्यांवांचून कोणी यात्रेस आले नाहींत अशी खबर मिळते.

मुलतानांत शाशमततबरेल नामक मठी आहे, ती पाहण्यासारखी आहे. ह्याप्रमाणेंच अकबराची महजीद वगैरे पाहण्यासारखी आहे. पत्रविस्तार भयास्तव पुरे करतों. लोभ असावा हे विनंती.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

---

## शीख लोकांचे धर्म.

पंजाबामध्यें जे शीख लोक आहेत त्यांचे नानकशाही, उदासी, गंजभक्षी, रामराई, सुथ्राशाही, गोविंदसिंही, निर्मळ, आणि नाग, असे अनेक पंथ आहेत. हे सर्व पंथ नानाकशाही पंथाचेच वेगवेगळाले अनेक मठ होऊन त्या मठाधिपतींच्या मताभिमानानें भिन्नत्व पावले आहेत. हिंदु धर्मामध्यें आजपावेतों अनेक आचार्यांच्या मतभेदाप्रमाणें अनेक पंथ उत्पन्न झाले

आहेत त्याप्रमाणेंच हा शीख लोकांचा नानकशाही पंथही उत्पन्न झाला आहे. प्रथमतः नानकशहानें धर्माच्या बाबतींत आपल्या बुद्धीस जें योग्य वाटलें तें घेऊन जें त्याज्य वाटलें तें टाकिलें आणि अशा प्रकारचा एक धर्मग्रंथ बनविला आणि आपण त्याप्रमाणें लोकांस उपदेश करूं लागला. असे उपादेष्ट झालेले जे लोक ते शीख होत. आरंभीं हा पंथ फारसा बलाढ्य नव्हता तरी मुसलमान लोकांच्या छळणुकीमुळें आणि त्या पंथांतील अग्रसर लोकांच्या महत्वाकांक्षीपणामुळें उत्तरोत्तर त्यास पुष्कळ बळकटी आली. औरंगजेब पादशहानें हिंदु धर्माच्या सर्व पंथांचा उच्छेद करण्याबद्दल होईल तितकी पराकाष्ठा केली ही गोष्ट सर्वांस महशूर आहे. त्या पादशहाच्या वेळीं शीख लोकांचा मुख्य धर्माध्यक्ष गोविंद सिंह म्हणून होता. हा मनुष्य अत्यंत महत्वाकांक्षी होता. ह्यानें आपल्या बुद्धि कौशल्यानें नानकशहानें केलेलीं जीं शांतिपर सूत्रें तीं सर्व युद्धपर लावून त्याप्रमाणें लोकांस उपदेश करून सर्व शीख लोक मोठे शिपाई करून टाकिले. आतां आपण वेगवेगळ्या पंथाचा विचार करूं.

---

## उदासी.

शीख लोकांपैकीं जे लोक उदासी पंथास अवलंबून आहेत ते सर्व नानकशाही पंथाचे खरे शिष्य आहेत असें मानण्यास चिंता नाहीं. हे लोक इहलौकिक अवस्थांतराविषयीं फार औदासिन्य दाखवितात. हे लोक फार विरक्त असतात आणि आपला सर्व काळ ईश्वराचें ध्यान आणि भजन करण्यांत घालवितात. त्यांचा जो मठ असतो त्याला संगत असें म्हणतात. हे लोक पुष्कळ एकत्र जमून यात्रा करीत फिरतात. हिंदुस्थानांतील मोठमोठया शहरांतून एकाद दुसरा उदासी शीख

कोणीं श्रीमानाच्या आश्रयानें राहिलेला आढळतो. हे लोक जरी विरक्तपणाचा बाणा बाळगितात तरी मलीन वस्त्रें अगर चिंध्या परिधान करीत नाहींत. त्यांचे कपडे चांगल्या प्रकारचे असतात. ते दाढी मिशा राखितात. आणि संभावित व खपसुरत असतात. आम्ही गरीब आहोंत असें जरी ते सांगतात तरी ते कधीं भिक्षा मागत नाहींत. त्यांच्या धर्मांत लग्न करूं नये असें जरी सांगितलें आहे तथापि जे शीख भागीरथीच्या किनाऱ्यावरील प्रदेशांत राहिले आहेत त्यांनीं हा नियम पाळल्याचें आढळत नाहीं. हे लोक नेहमीं आपल्या शिष्यांस आदि ग्रंथ व दशपादशहाका ग्रंथ ह्यांतील धर्मपंथाचा उपदेश करीत असतात. हे ग्रंथ नानकशहा आणि गोविंद सिंह यांणीं केलेले ग्रंथ एका ठिकाणीं करून रचलेले आहेत. ह्या ग्रंथावरून जेव्हां पुराण चाललेलें असतें तेव्हां मधून मधून कबीर, मिराबाई, आणि सुरदास ह्यांचीं पदें व रेखते मोठया प्रेमानें श्रोते वक्त्यासह म्हणतात. पुराण समाप्तीच्या वेळीं श्रोते ग्रंथापुढें यथाशक्ती दक्षिणा ठेवतात. नंतर उदासी गुरूजी त्यांस प्रसाद व मिठाई देतात. काशी क्षेत्रीं कांहीं उदासी लोकांचे मठ आहेत. तेथें रात्रौ पुष्कळ वेळ पुराण चालतें. ह्या उदास्यामध्यें कित्येक वेदांत शास्त्र चांगले जाणणारे असतात. नानकशहानें केलेले ग्रंथ वेदांतास अनुसरून आहेत. धर्मचंद म्हणून नानकशहाचा नातू होता त्यानें उदासी पंथ स्थापित केला. त्याच्या वंशजांस नानक पुत्र असें म्हणतात व पंजाबांत त्यास शीख लोक मोठा मान देतात.

नानकोपदिष्ट धर्म कबिराच्या धर्म पंथापासून फार भिन्न आहे असें नाहीं व साधारणत: हिंदुधर्मापासून तर बिलकुलच सुटत नाहीं. त्या धर्मांत हिंदूचीं सर्व पुराणें व त्यांतील पुरूष हे खरे मानले आहेत. परंतु मुख्य कटाक्ष मनुष्यानें जन्मास आल्यावर आपल्या जी-

याची मुक्तता मयेच्या पाशापासून कोणत्या प्रकारें करावी त्यावर आहे. नानक आणि कबीर ह्यांच्या मतें सर्व एकच आहेत व धर्म संबंधीं कामामध्यें हिंदूनीं आणि मुसलमानांनीं आपणास वेगळे आहोंत असें मानावें हें बरोबर नाहीं. ते उभयतां हिंदूस व मुसलमानास असा उपदेश करीत कीं, दोन्ही धर्मांच्या मुख्य गोष्टी एकच आहेत. फक्त मध्यंतरीं ज्या आगंतुक चाली मध्यें शिरून परस्परांचे निरर्थक वैपरित्य आलें आहे तितकें काढून टाकणें अवश्य आहे.

---

## गंजभक्षी.

ह्या लोकांची माहिती विशेष मिळत नाहीं. फक्त हें नांव त्या पंथाच्या लोकांस त्याच्या मूळ आचार्यावरून पडलें आहे इतकेंच कळतें.

---

## रामराई.

रामराय म्हणून हरीरायाचा नातू अगर पणतू होता. त्याचा आणि हरी कृष्ण हा हारिरामाचा मुलगा होता. त्याच्या बरोबर मठाधिपत्याविषयीं तंटा झाला. तेव्हां जे शीख लोक रामरायाच्या पक्षाचे होते ते त्यांचा मोड झाला तरी त्यांच्याकडे तसेच राहिले आणि त्यानें स्थापिलेल्या धर्माचे अनुयाई झाले. रामरायाचा हक्क मठाधिपत्याविषयीं खरा आहे व तो पुण्य पुरुष होता म्हणून त्यानें पुष्कळ. अनुभविक कृत्यें केलीं. ह्याबद्दल रामराई लोकांमध्यें मोठे ग्रंथ आहेत. हा पंथ १६६० मध्यें उद्भवला. ह्या पंथाचे लोक हिंदुस्थानांत फारसे नाहींत.

---

## सुथ्राशाही.

वर सांगितलेल्या दोन पंथांच्या लोकांपेक्षां सुथ्राशाही पंथाचे लोक चोंहीकडे पुष्कळ आढळतात. ह्यांच्यामधील धर्मोपदेशक आपल्या कपाळास उभी काळी रेघ लावितात आणि हातांत एक हात लांबीच्या दोन टिपऱ्या घेऊन त्या तालावर वाजवून गाणीं गातात आणि भिक्षा मागतात. हे लोक आपलें अयुष्य असद् मार्गानें घालवितात. ह्या लोकांत प्रतिष्ठा नाहीं व ते हमेशा जुवा खेळतात, दारू पितात आणि चोऱ्या करितात. गुरुगोविंदाचा बाप तें घर बहादूर हा आपल्या धर्म पंथाचा उपदेष्टा असें ते मानितात.

-----

## गोविंदसिंही.

पंजाबामध्यें जे शीख लोक आहेत व ज्यांचें वर्चस्व राष्ट्राच्या गणनेंत आज पावेतों होत आलें आहे. ह्याच्या पैकीं बारा आणे लोक ह्या पंथाचे आहेत. जरी नानकोपदिष्ट धर्म हे मानितात व नानकास मोठा मान देतात तरी त्यानें जी शांती धरावी, क्षमा करावी, दया बाळगावी इत्यादि नियम सांगितले आहेत ते सर्व ह्यांनीं एकीकडे गुंडाळून ठेविले आहेत आणि समशेर बहादर होण्याकरितां हे तरवारीची भक्ति करूं लागले आहेत. ह्या पंथाची स्थापना गुरुगोविंदानें केली. आणि ती हिंदू आणि मुसलमान ह्यांजवर कशी चालवावी तो उपदेश केला. गुरुगोविंदानें आपल्या शिष्यांस दाढी व मिशा राखण्याची परवानगी दिली व निळा पोषाग घालावा म्हणून हुकूम दिला. त्यानें गौमांस खेरीज करून सर्व प्रकारचें मांस भक्षण्याची मोकळीक दिली व जातिभेद मोडून टाकिला. हिंदू अथवा मुसलमान कोणीं

जरी त्याच्या पंथांत गेला तरी तो घेई. असें त्यानें केल्यापासून शीख लोकांस राष्ट्रत्व आलें असें जरी आहे तरी ते हिंदूंच्या सर्व देवांची भक्ति करितात; त्यांचे सर्व सण पाळितात, त्यांचींच काय तीं ह्यांस वाचावयास पुस्तकें, आणि ते ब्राम्हणास मोठा मान देतात. ह्यावरून हें स्पष्ट होतें कीं, जरी त्यांनीं जातिभेद मोडला व वेद पुराणें वगैरेबद्दल दशपादशहाका ग्रंथ वाचूं लागले तरी आपण मुळचे हिंदूच आहोंत हें त्यांच्या मनांत पक्कें ठसलें आहे. दशपादशहाका ग्रंथ गुरुगोविंदानें केला व तो नानकापासून दहावा उपदेशक झाला म्हणून त्या ग्रंथास दशपादशहाका ग्रंथ म्हणू लागले. गुरुगोविंद अठराव्या शतकाच्या आरंभीं प्रसिद्धीस आला.

---

## निर्मळ.

ह्या लोकांच्यामध्यें आणि उदासींच्या मध्यें फारसें अंतर नाहीं. वास्तविक पाहिलें तर नानकानें जो धर्म सांगितला त्याप्रमाणें हेच लोक यथार्थ आचरण करितात असें म्हटलें पाहिजे. त्यांचें नांव निर्मळपंथी हें आहे म्हणजे नानकापासून आलेल्या धर्मांत भेसळ न होऊं देतां मुळच्या धर्माप्रमाणें वागणारे ते जगांतील दूषणापासून आपण अलग आहोंत असें ते सांगतात, व निरंतर धर्म आचरणामध्यें काळ घालवितात. ते लग्न करीत नाहींत व प्रायः अल्प वस्त्रें परिधान करितात. ते उदासी पंथाच्या शीख लोकांप्रमाणें संगतींत जमून राहात नाहींत व ईश्वर भजन करण्याचा त्यांचा एक विवक्षित मार्ग नाहीं. नानक, कबीर वगैरे दुसरे एकेश्वर वादींच्या ग्रंथाचें वाचन मनन करून ते ईश्वरार्चन करितात. हे लोक आपल्या शिष्यांपासून उपजीविका करितात. ते वेदांत शास्त्रांत

पारंगत असतात. ह्या पंथाचे लोक फार नाहींत तरी मोठमोठ्या शहरांतून व विशेषें करून काशींत कांहीं आढळतात.

---

## नाग.

नंगे गोसांवी म्हणून शैवामध्यें आणि वैष्णवामध्यें आहेत त्याप्रमाणेंच शीख लोकांमध्येंही आहेत. त्यांत आणि ह्यांत भेद इतकाच कीं, पहिल्या दोन पंथांचे लोक हत्यारें बाळगितात व हे लोक त्यांस शिवत देखील नाहींत, परंतु स्वस्थ एकांत वासांत ईश्वराचें स्तौत्य करून काळक्षेप करितात. हे नग्न फिरतात आणि निर्मळ पंथी अल्प वस्त्र परिधान करितात. ह्या खेरीज उभय पंथाच्या लोकांमध्यें कांहीं फरक दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

---

## आग्रा.

मुक्काम वाराणशी ता० १८ दि० १८७१

ज्ञानप्रकाशकर्ते महाराज,

नमस्कार. पंजाबांतील लोक दक्षणिपेक्षां स्वभावानें शूर असावे असें आम्हास वाटतें. इकडे ज्ञातिभेद नांवाचा आहे असें म्हटलें तरी चालेल. आतां माझ्या ह्या लिहिण्याचा अर्थ म्हणजे कांहीं सर्व ज्ञातींचा विवाहव्यवहार अथवा पंक्तिव्यवहार होतो असा समजतां कामा नये. परंतु आमच्या तिकडे जसा स्पर्शास्पर्शाचा विटाळ मानतात तसा इकडे बिलकुल मानण्याचा प्रघात नाहीं. हलालखोर घरांत सर्व वागण्याच्या जिन्याच्या चौथ्या मजल्यापर्यंत जातो. स्मश्रु करण्याच्या संप्रदायांत ज्याची त्याची मर्जी पुष्कळांशीं काम करिते. कोणीं कल्लया मधील नुसती दाढीच मात्र काढवितो, कोणीं कपाळावर नुसता एक तीन बोटाचा

त्रिकोन होण्यापुरतीच हजामत करवितो, कोणी नुसती शेंडी कायम ठेवून सर्व हजामत करवितो, कोणी सर्व डोक्याभर दोन अगर तीन बोटें लांबीचे केस राखितो, ह्याप्रमाणें नाना तऱ्हानीं स्मश्रु करविणारे लोक एका जातींत आढळतात. बायकांच्या नथेचा मासला कसा असतो तें आपणास थोडक्यांत कळवितों. नाकांत जी नथ घालण्याची ती घातली म्हणजे बेंबीच्या वर दोन बोटें पडते. सारांश काय सांगावयाचा. महाराज आतां माझ्या ध्यानांत आलें "अगे अगे बायको ऊठ ऊठ तुझ्या नथेंतून तीर मारूं दे" ह्या म्हणींचे तात्पर्य! कां एडिटर बावा असल्या नथेंतून तोफेचा गोळा ती नाकांत असतां निघून पार जाण्यास कांहीं अडचण पडेल काय? नाहींहो नाहीं. मग तीर तर सहज निघून जाईल. वः काय तिरंदाजी ही. अस्तु.

आम्ही अमरसरास गेलों म्हणून तुम्हाला मागल्या पत्रीं लिहून कळविलेंच आहे.

अमरसराहून जे निघालों ते थेट आग्र्यास उतरलों. कां एडिटरराव केवढा प्रवास हा. अहो महाराज, हिमालयाच्या पायथ्याशीं आम्ही सकाळीं थंडीनें कुडकुडत होतों ते एकदम संध्याकाळीं दिल्लीच्या पलीकडे उष्ण प्रदेशांत पडलों. काय आमच्या प्रवासाची स्थिति सांगावी. सकाळपासून संध्याकाळपर्यंत हवेंत, देशांत, त्यांच्या भाषेंत किती फरक!!! ह्याचें वर्णन करवत नाहीं. सकाळीं पंजाबी भाषा, दोन प्रहरीं गुरजरी आणि संध्याकाळीं एकदम दिल्ली प्रांतची शुद्ध मुसलमानी.

आग्रा शहर हें यमुनेचे काठीं अंतरवेदी बाहेर आहे. ह्यापासून ग्वालेर ३६ कोश आहे. आणि मथुरा १८ कोश आहे. आम्ही आग्र्यास पोहोंचलों. त्याच्या अदल्या दिवशींच तेथील किल्ल्यांत स्टोअर हौस आहे, त्यांत दारूखान्यास आग लागून २९, ३० मनुष्यें जाया झालीं होतीं व तेथील इमारतही बरीच

पडली होती. ती सर्व आम्हीं पाहून आम्हास मोठें वाईट वाटलें.

ह्या शहरांतील बाजारच्या रस्त्याची बांधणी मथुरेच्या बांधणीप्रमाणेंच आहे, परंतु बाजार मोठा, पेंठा दोन दोन मैल लांब, दुकानें दाट असें कांहीं हें शहर चमत्कारिक आम्हास वाटलें. इकडे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादि पाहिजे तो व्यापार करितात. तुम्हास थोडकेंच उदाहरण देतों कीं, म्यां ज्या दुकानीं कलाबतूचा कातडी जोडा विकत घेतला तो दुकानदार क्षत्रिय होता. येथें लोक शुद्ध उर्दु भाषा बोलतात. पेहेराव अनेक तऱ्हेचा विचित्र आढळतो व त्यांत प्रतिबंध नाहीं. आज तुम्ही पागोटें घाला, उद्यां टोपी, परवां पटका, तरी लोक हसतील असें वाटत नाहीं.

आग्र्यास प्रवाशानें पाहण्यासारिख्या ज्या इमारती आहेत त्यांत ताज म्हणून जी इमारत आहे त्या सारखी इमारत माझ्या पाहण्यांत आज पावेतों एकही आली नाहीं.

ह्याच्या दरवाज्यांत प्रथमतः गेलें म्हणजे ताजावर जीं माणसें उभीं असतील त्यांच्या उरापासून वरचे भाग दिसतात. दरवाज्यांतून आंत गेलें म्हणजे चोहोंकडून महिरपदार कमानीचे दुजोडीचे सोपे नजरेस येतात. नंतर आंतील दरवाज्यांत गेल्यावर सभोंती नाना तऱ्हेचे वृक्षांनीं सुशोभित झालेली अशी बाग दृष्टीस पडते. ह्या बागेंत फळझाडें आणि फुलझाडें नाना तऱ्हेचीं आहेत. हा ताज नूरजहान बेगम होती तिनें बांधिला आहे. ही पांच मजले प्रचंड इमारत सर्व संगमरवरी दगडांची आहे. ह्या इमारतींत सर्व सामग्री वर्षाच्या बेगमीची घेऊन ५० हजार मंडळी खुशाल नांदेल असा अंदाज आमचा झाला आहे. ह्यांत नाना तऱ्हेचे वेल वेगवेगळ्या रंगानें दगडाचे खोदून केले आहेत. ह्याबद्दल कल्पना करण्यांत ज्यानें ही इमारत पाहिली नाहीं त्यास अशक्य

आहे. आंतील कबरा दोन ठिकाणीं आहेत. एक वरच्या मजल्यावर आणि दुसरी तळमजल्यावर. येथें जें वेलबुटीचें खोदीव काम आहे त्यांत कारागिरीची आणि पैसा खर्चण्याची हद्द झाली आहे. ह्या ताजाच्या एका आंगास निमाज पढण्याकरितां एक सोपा बांधलेला आहे. त्यांत ६ हात लांब आणि ३ हात रुंद असें एकेक आसन संगमरवरी पांढरा दगड आणि दुसरा तसाच गुळगुळीत तांबडा दगड ह्याची एकेक महिरप अशीं हजार आसनें केलीं आहेत. ह्यांत यमुनेचा पाट आणून जलक्रीडेकरितां एक बावडी बांधली आहे. तिला चार मजले इमारत घाटोळी बांधलेली आहे. ती फार चमत्कारिक आहे. ह्या ताजमहालांतील बगीच्याची व्यवस्था सरकारानें इंजनेर खात्यांतून बरीच ठेविली आहे.

येथें त्याच नमुन्याची दुसरी इमारत यमुनेच्या काठीं नूरजहानच्या दिवाणानें बांधली आहे. तीही पाहण्यासारखी आहे.

आग्र्याच्या किल्यांत मोतीयहजाद वगैरे इमारती आहेत. त्या सर्व अनुपम्यच आहेत. किल्यांत एका ठिकाणीं स्नानाची जागा केली आहे. तेथें यमुनेच्या पाटाचें पाणी आणून दरएक स्नानाच्या जाग्याच्या सभोंवती पाट फिरविले आहेत. हें सर्व काम संगमरवराचें आहे. सारांश माती आणि विटा प्रमाणें संगमरवर येथें झालेला आहे. आग्र्यास रेल्वेचें स्टेशनही विटांचें फार चमत्कारिक रीतीचें बांधलेलें आहे.

येथील लोक दगडी कोरीव व कलाबतूचें काम फार चांगलें करितात. मला असें वाटतें कीं, प्राण्यानें जन्मास येऊन आपल्या डोळ्याचें सार्थक करणें असल्यास एकवार तरी येथें येऊन ह्या सर्व इमारती पाहाव्या म्हणजे त्यास जें समाधान होईल तें अवर्णनीय आहे. येथें सत्रंज्या, हिंदुस्थानचें वगैरे भरजरी कापड फार चांगलें होतें.

येथें कोहळा आणि साकर ह्यांचा पाक करून पेठा म्हणून

१५०७२

एक पदार्थ करितात तो खाण्याला फारच चांगला लागतो. व तसा पेठा दुसरा कोठेंही बनत नाहीं. येथें एकंदर ७–८ दक्षणी ब्राम्हण आम्हास स्थाईक असे आढळले. राजा दिनकरराव साहेब हेही येथेंच वाडा बांधून राहिलेले आहेत. ह्यांचेंच मात्र येथें नांदतें दक्षणीचें घर आहे. हे गृहस्थ ह्या प्रांतीं फार इभ्रतदार आहेत. आतां पत्रविस्तारास्तव पुरें करितों.

तुमचा मित्र एक फिरस्ता.

---

## कानपूर व लखनौ.

ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—

वि० वि०. गेल्या पत्रीं आपणाकडे आग्रा शहरची थोडीशी हकीकत लिहून पाठविली. आतां आग्र्याहून आम्ही कानपूर वगैरे कडे गेलों तिकडील कांहीं माहिती लिहून कळवितों.

आग्र्याहून आम्ही पहाटेस तीन वाजतां रेल गाडींत स्वार झालों तों सुमारें साडेदहा वाजतां सकाळीं कानपूरच्या स्टेशनावर दाखल झालों. कानपूरच्या स्टेशनाजवळ शिंदे सरकारची मोठी धर्मशाळा दक्षणी लोकांकरितां उतरण्यास बांधली आहे. तेथें कांहीं लोक उतरतात. कित्येक गंगापार जाऊन लखनौस रेल गाडी जाण्याचें जें स्टेशन आहे तेथें उतरतात. गंगापार उतरल्यानें यात्रेकऱ्यांस गंगेचें उदक स्नानास मिळतें. आणि कानपुराहून लखनौस जी गाडी सकाळीं आठ वाजतां जाते ती साधण्यास बरें पडतें.

कानपुराहून चवदा मैलांवर ब्रम्हावर्त आहे तेथें शिग्राम गाडींत बसून गेलें म्हणजे सुमारें दोन कलाखांत मनुष्य पोंहोचतें. जातां येतांचें भाडें २॥८ पडतें. हें वाल्मिकीचें आश्रमस्थान आहे. येथें श्रीमंत कैलासवासी बाजीराव रघुनाथ पेशवे राहत होते. त्यांच्यामुळें द-

क्षणी लोकांची वस्ती येथें पुष्कळ आहे. हल्लीं ते लोक निराश्रित झाले आहेत. त्यांपैकीं सर्व ब्राम्हण लोकांच्या कुटुंबांस अलीजा बहादर शिंदे सरकार यांणीं कांहीं साह्य करून दिलें आहे. ह्या ठिकाणीं सन १८५७ इसवीचें बंड फार भयंकर रीतीचें झालें ही गोष्ट प्रसिद्धच आहे. कानपूर हें शहर फार मोठें आहे. एडिटरराव इकडच्या दगडी इमारतीची तऱ्हाच कांहीं चमत्कारिक. सगळीं घरें चार मजली पांच मजली महिरापदार नक्षीचें काम. ह्या सर्व गोष्टींनीं एकंदर शहरास जी रमणीय शोभा येते ती अवर्णनीय आहे.

येथें गंगा तटाकीं साहेब लोकांनीं मोठे मौजेचे बंगले बांधले आहेत आणि त्यांतून ते वास करून विहार करतात. धन्य आहेत ते इतकेंच म्हणावयाचें. अहो, मला एक भ्रांती उत्पन्न झाली आहे. ती कोणती ह्मणाल तर साहेब लोकांच्या बंगल्याची तऱ्हाही पुष्कळांशीं इकडील नेटिव इमारती सारखीच दिसते. तेव्हां ही तऱ्हा चांगली म्हणावी किंवा कसें. असो त्या पोकळ बोलण्यांत काय हशील आहे. आपलें काम पुढें चालवूं या. ह्याच गांवीं जो सत्यश्रोतास कालवा भागीरथीचा काढला आहे तो पुनः भागीरथीस मिळविला आहे. हा कालवा शहरांतून सुमारें दोन कोस गेला आहे आणि ह्याच्या दुयड्यांनीं सराया बांधल्या आहेत. त्या फार रमणीय आहेत. ह्या कालव्यांत हरिद्वारास नावेंत बसतात ते कानपुरास उतरतात; अशी मोठी मौज केली आहे.

कानपुरास गंगेच्या पैलतीरीं आम्हीं एक मुक्काम केला. नंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठाच्या गाडीस लखनौस जाण्यास निघालों तों साडे दहा वाजतां लखनौ स्टेशनावर पोहोंचलों. हें स्टेशन मध्यम तऱ्हेचें बांधलेलें आहे. लखनौ स्टेशनापासून गांव सुमारें पक्का दीड कोस आहे. येथें स्टेशनापासून एक मैलावर राजा मानसिंगानें एक धर्मशाळा बांधली आहे. तींत सुमारें २००० उतारूंपेक्षां ज्यास्ती लोक राहतील येवढी मोठी आहे. व

 १५०७२/इति

ही धर्मशाळा एका मोठ्या राजवाड्यासारखी आहे. लखनौ शहर ही एक अजब चीज आहे. ह्याचें यथार्थ वर्णन करण्यास मी असमर्थ आहे हें मला कबूल करणें भाग आहे. ह्या शहरचे बाजार ही फारच मोठे. तरी एडिटर बाबा हें दहा आणें शहर इंग्रज सरकारानें बंडाच्या सालीं अगदीं उद्वस्त करून टाकिलें आहे. येथें फारशी भाषेत निष्णात असे पुष्कळ लोक मला आढळले. येथें इमाम वाडा आणि केसरी बाग हीं दोन स्थळें पाहण्यासारखीं आहेत. येथील किल्ला पाडून अगदीं जमीनदोस्त केला आहे.

इमाम वाड्यांत नबाब लोकांच्या कबरी आहेत. ह्या कबरीस पुष्कळ पैसा खर्च झालेला आहे. संगमरवरी दगडाचें काम केलें आहे. येथें दोन नमुने करबला येथील हसन हुसनच्या कबरीचे आपल्या तिकडील डोले करितात त्या नमुन्याप्रमाणें चांदीचे भले मोठाले बनविलेले आहेत. येथें आरसे, हंड्या झाडें, वगैरे सामान लाखो रुपयांचें आहे. येथें एक आग्र्याच्या ताजमहालाच्या नमुन्याप्रमाणें लहानशीशी इमारत बांधलेली आहे. येथें पाण्याचा हौद फार मोठा आहे. त्याच्या मध्य भागीं इकडून तिकडे जाण्यास एक लोखंडी पूल बांधिला आहे. केसरी बागेंत पांच पन्नास मशीदी आहेत. त्या सर्वांस कळस सोन्याच्या मुलाम्याचे आहेत. ह्या शहरांतून गोमती नदी वाहात आहे. तिजवरून लखनौस मुसलमानी अंमल असतांना एक लोखंडाचा पूल बांधिलेला आहे. त्याचें काम फार मजबूद असून पाहण्यासारखें आहे.

लखनौपासून अयोध्या क्षेत्र ४० कोस आहे. तेथपर्यंत रेल गाडीचा रस्ता अद्यापि *तयार झाला नाहीं. ह्याकरितां घोड्याच्या गाड्यांतून लोक तेथें जातात. लखनौस गोमती नदी आहे. हें तीर्थ मोठें आहे. आतां पुरे करितों. लोभ असावा हे विनंती. ता० ७ माहे जानेवारी सन १८७२ इ०.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा.क्र.
15072
294.535/PAT

# अयोध्या.

मुक्काम श्री क्षेत्र वाराणसी
ता० ३ जानेवारी सन १८७२

ज्ञानप्रकाशकर्ते महाराज,—

वि० वि०. गेल्या पत्रीं म्या आपणाकडे लखनौ शहरची वगैरे हकीकत लिहून पाठविली तिजला आपण आपल्या सुंदर पत्रीं जागा दिली तें पाहून मजला परमानंद झाला. आतां आपणाकडे फैजाबाद आणि अयोध्या ह्या हर्दू शहरांची थोडीशी माहिती लिहितों. तिला कृपा करून जागा द्याल अशी उमेद आहे.

महाराज, लखनौ शहरीं अयोध्यस जाण्याकरितां घोड्याच्या गाड्या मिळतात. त्यांत रेकल्यासारखी एक गाडी असते तींत ६ प्यासेंजर बसतात. शिवाय एक कोचमन आणि दुसरा घोडेवाला असे आठ असामी असून त्यांचा सामानाचा बोजाही त्या गाडींत सांठवितात आणि दोन घोडे तिला जोडून ती चालवितात. ह्या गाडीचें भाडें फैजाबादपावेतों १५ रुपये पडतें. ही गाडी लखनौहून निघाल्यापासून सुमारें २० तासांनीं अयोध्येस दाखल होते. अयोध्येच्या आलीकडे सुमारें २ कोसांवर फैजाबाद आहे. त्यास मुसलमान लोक बंगला ह्मणतात. लखनौ पासून अयोध्यस जाण्यास जो सडकेचा रस्ता बांधिला आहे, तो फारच चांगला आहे. वाटेनें दुतर्फा झाडांची दाट गर्दी आहे. फैजाबाद हें शहर फार मोठें आहे. येथील इमारती वगैरेची शिस्त कानपूर वगैरे शहराप्रमाणेंच आहे. अयोध्या क्षेत्र शरयू नदीच्या काठीं आहे. ही नदी फार मोठी आहे. अयोध्या शहर हें त्रेतायुगीं श्री रामाच्या राज्याची राजधानी होतें. ह्या क्षेत्रीं श्री रामाचीं मंदिरें सुमारें ३ हजार आहेत. येथें अयोध्येचा महिमा असा आहे कीं, अयोध्यावासी जितके लोक आहेत ते सर्व जगन्नाथासम आहेत. ह्याकरितां एडिटरराव आसपास राजे रजवाडे लोक येथें जितका पुष्कळ होईल तितका वास करितात.

अयोध्या शहर हें दोन वेळां स्वर्गास गेलें आहे व आणखी एकवार जाणार आहे, ह्याकरितां पुष्कळ बैरागी लोक येथें वास करितात. येथें मोठमोठ्या साव सावकारांचीं व राजे रजवाड्याचीं पुष्कळ अन्नछत्रें आहेत. येथें पंडित उमेदत्त महाराज म्हणून महा विद्वान वृद्ध पंडित आहेत. ह्यांची ह्या प्रांतीं मोठी मान्यता आहे व ह्यांस सालांतून सरासरी उत्पन्न २५ हजारांचें आहे. ह्या पंडित महाराजांच्या दर्शनास आम्ही गेलों होतों. आमचें आदर तार्तम्य ह्यांनीं चांगलें केलें. ह्यांस अबालवृद्धाशीं भाषण करण्याचा कंटाळा नाहीं. हे स्वभावानें फार सुशील आहेत. ह्यांचा विद्यार्थी पढविण्याचा आणि त्यांचे पोटास घालण्याचा मोठा अस्करा आहे. ह्यांचें वय सत्तरीच्या जवळ जवळ आहे असें आम्हास वाटलें.

येथील देवालयांच्या इमारती सर्व दगडी असून लाखो रुपये खर्चानें झालेल्या आहेत. येथें राजा मानसिंगानें एक शिव मंदिर बांधिलें आहे. त्यास फारच खर्च लागलेला आहे. त्याच राजानें येथें शरयू नदीच्या काठीं स्वर्गद्वार म्हणून जागा आहे म्हणजे ज्या द्वारानें श्री रामचंद्रानीं अयोध्या स्वर्गास नेली तेथें त्याच राजा मानसिंगानें सुमारे २ कोट रुपये खर्च करून घांट व देवालयें बांधलेलीं आहेत. तीं पाहण्यासारखीं आहेत.

येथें प्रथमतः गांवांत शिरतांना हनुमान गढी आहे. तींत श्री मारुतीचें संस्थान आहे. येथील मारुतीची मूर्त बसलेली आहे. ह्याचें कारण लोक असें सांगतात कीं, श्री रामचंद्रानीं जेव्हां अयोध्या स्वर्गास नेली तेव्हां तेथील राज्य श्री मारुतीस देऊन त्या गादीवर त्याची स्थापना केली. आणि त्यास तक्तारूढ होण्याविषयीं आज्ञा दिली म्हणून मारुतीची मूर्त बसलेली आहे. बाकी हिंदुस्थानांत कोणत्याही मारुतीच्या देवालयांत मारुती बसलेले आढळत नाहींत. येथें हनुमान गढीच्या नजीकच श्री रामचंद्राच्या राजवाड्याचें स्थान आहे. येथें ज्या कांहीं इमारती आहेत त्यांजविषयीं लोक अशी कथा सांगतात कीं, श्री रामचंद्रानीं अयोध्या स्वर्गास

नेली तेव्हां खालीं नुसती जागा उरली. नंतर पुढें राजा विक्रमानें रामायणाच्या आधारें त्या राजवाड्यांतील वेगवेगळ्या मंदिरांचीं ठिकाणें कायम करून तेथें नवीन इमारती बांधविल्या. त्यांत दशरथ राजाचा महाल, कौसल्या, सुमित्रा, कैकयी ह्यांचे महाल श्री शितेचा महाल, तिची पाकशाळा, श्री रामचंद्राची लहानपणची खेळण्याची जागा, रंगमहाल, दरबारची जागा, अशा अनेक इमारती आहेत. त्या सर्व ठिकाणीं श्री रामचंद्राच्या वगैरे मूर्ती स्थापिल्या आहेत त्यांचें दर्शन होतें.

येथें श्री रामचंद्राचा जन्म झाला त्या ठिकाणीं औरंगजेब पादशहानें मोठी थोरली महजीद बांधविली आहे. त्याप्रमाणेंच त्रेतायुगाचा राम म्हणजे त्या कालीं स्थापन केलेल्या मूर्ती (ह्या श्री राम, शिता, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न वगैरेच्या सोन्याच्या आहेत.) ची स्थापना केली आहे, आणि तेथें देवालयही बांधलें आहे. त्या देवालयावरही सदर पादशहानें एक महजीद बांधिली आहे, आणि तिसरी महजीद स्वर्गद्वाराच्या ठिकाणीं बांधली आहे.

येथें मुख्य यात्रा म्हटली म्हणजे श्रीराम घाटीं शरयू नदीचें स्नान व त्याप्रमाणें स्वर्ग द्वारीं ब्रह्मघाटीं शरयू स्नान आणि तीर्थश्राद्ध आणि वर सांगितलेल्या ठिकाणच्या देवांचीं दर्शनें इतकेंच काय तें. येथें दक्षणी ब्राम्हणांचीं सुमारें ३०,३५ घरें आहेत. बाकी सर्व तद्देशी लोक आहेत. येथें तांबड्या तोंडांचीं माकडें पुष्कळ आहेत. त्यांचा यात्रेकऱ्यांस फार उपद्रव होतो. रस्त्यानें जातांना ते त्याच्या डोक्यावरचें पागोटें उचलून नेतात. येथील हवा पाणी फार चांगलें आहे. येथें मार्गशीर्ष शुद्ध ५ स श्री रामचंद्राचा सीतेशीं विवाह झाला. त्याचा मोठा समारंभ होतो. यात्रा सुमारें २ लाख जमते. मोठ मोठाले राजे रजवाडे लोकही येतात. हा समारंभ पाहण्यासारखा आहे. आतां पुरे करितों. लोभ असावा हे विनंती.

एडिटराचा मित्र
एक फिरस्ता.

# अयोध्येपासून काशीपर्यंत रस्ता व काशींतील मुख्य देवता.

मुक्काम श्रीक्षेत्र वाराणसी ता०
५ जानेवारी सन १८७२.

ज्ञानप्रकाशकर्ते यांसः--

वि० वि०. आपणाकडे मी नेहमी इकडील खबर लिहून पाठवितों तिला आपण आपल्या सुंदर पत्रीं जागा देतां हें पाहून मला आणखी कांहीं ज्यास्त हकीकत लिहिण्यास उमेद आली आहे. ह्यास्तव हल्लीं ह्या चार ओळी आपणाकडे लिहून पाठविल्या आहेत तर त्यांस कृपा करून येत्या अंकांत जागा द्यावी हीच प्रार्थना आहे.

महाराज गेल्या पत्रीं श्री अयोध्या क्षेत्राची माहिती म्यां यथामती आपणाकडे पाठविली. हें क्षेत्र आउध प्रांतांत आहे. ह्या प्रांताचा राज्यकारभार चीफ कमिशनर पाहतो. तो नेहेमीं लखनौस राहतो. अयोध्येस कानपूर मार्गें येण्यास लखनौ पावेतों रेलगाडीची सडक मिळते. हिला आउध आणि रोहिलखंड रेल्वे असें नांव आहे. ह्या रेल्वेस कानपुरापासून आरंभ होतो. ह्या रेल्वेची सडक हल्लीं लखनौ पावेतों तयार असून तिजवरून वाफेनें चालणारी गाडी जाण्या येण्याचा क्रम सुरू आहे. लखनौपासून फैजाबाद पावेतोंही सदर प्रकारची सडक तयार झाली आहे, परंतु मध्यें कांहीं कांहीं ठिकाणीं काम होणें आहे तें लवकरच संपेल अशी येथें माहिती मिळते. तें काम संपलें म्हणजे सुमारें पेस्तर महिन्यांत त्यावरून गाडी सुरू होईल असा अंदाज आहे. ही रेलगाडीची सडक जौनपूर मार्गें श्री वाराणसी पावेतों नेली आहे व हें कामही मोठ्या झपाट्यानें चालू आहे. यंदाच हें काम संपलें असतें, परंतु महाराज यंदा पर्जन्यानें जी इकडे अति वृष्टी केली तिच्या योगें पुष्कळ तयार झालेलें काम

वाहून गेलें. तें सर्व पुनः करण्याचा क्रम जारी आहे. जीवनपूर फार मोठें शहर होतें, परंतु सालमजकुरच्या अति वृष्टीनें त्याची इतकी खराबी झाली आहे कीं, गांवापैकीं दहा आणे भागांतील इमारती जमीनदोस्त झाल्या आहेत. जीवनपुरास बेलियाचें तेल फार चांगलें पैदा होतें, परंतु यंदा तेथील बेलियाच्या फुलाच्या बाड्यांतून पाणी शिरून फारच नुकसान झालें आहे, ह्यामुळें यंदा बेलियाच्या तेलाची अम्मळ चणचण होईल असें लोक ह्मणतात.

अयोध्येपासून ६ कोसांवर नंदिग्राम आहे. तेथें भरतानें तपश्चर्या केली. हें ठिकाण पाहण्यासारखें आहे. ह्याचप्रमाणें अयोध्येपासून सुमारें १८।२० कोसांवर नैमिषारण्य आहे. (ह्यास इकडील लोक निमसार ह्मणंतात) हें ठिकाण सत्ययुगीं तपश्चर्येचें स्थान होतें आणि सूतानीं शौनकादि ऋषीप्रति पुष्कळ पुराणें इतिहास वगैरे कथन केलीं आहेत. हेंही वन एडिटरराव पाहण्यासारखें आहे.

आम्ही अयोध्यापुरीहून परत लखनौ व कानपूर मार्गें श्री वाराणसीस आलों. वाराणसी हें क्षेत्र आशी आणि वरुणा ह्या दोन नद्यांचे संगम भागीरथीशीं झाले आहेत त्यांच्या मध्यें आहे. अशीचा संगम भागीरथीशीं वाराणशीच्या दक्षिण सीमेवर झाला आहे, आणि वरुणेचा संगम उत्तर सीमेवर झाला आहे. त्याच शब्दाचा हिंदुस्थानी भाषेत बनारसी अथवा बनारस हा अपभ्रंश झाला आहे असें अनुमान होतें. ह्या क्षेत्राचें काशी हेंही नांव दक्षणी लोकांत प्रसिद्ध आहे.

विश्वेश्वर, बिंदुमाधव, धुंढिराज गणपति, दंडपाणी, भैरव, काशी, गुहा, गंगा, भवानी आणि मणिकर्णिका ह्या मुख्य देवतांची नित्य यात्रा यात्रेकऱ्यानें करावी लागते.

पाहिलें जें काशी विश्वेश्वराचें देवालय आहे त्यावर औरंगजेब पादशहानें एक मोठी महजीद बांधिली आहे, म्हणून त्याच्या जव-

ळच हिंदूनीं नवें विश्वेश्वराचें देवालय बांधिलें आहे. ह्या देवा-
लयाचें काम जुन्या चालीच्या देवळाप्रमाणें आहे. ह्या शिवालया-
चें शिखर देवळाच्या भिंतीच्या वरल्या गलथ्यापासून तों वरच्या
कळसापावेतों सोन्यानें मढविलेलें आहे. ह्या देवालयाच्या उत्तरेस
ज्ञानवापि तीर्थाचा कूप आहे. जशी विश्वेश्वराच्या देवालयावर
महजीद बांधली आहे तद्वतच बिंदुमाधवाच्या मुळच्या देवळावर
एक भली मोठी महजीद सदर पादशहानें बांधिली आहे. ह्या
महजिदीस दोन मनोरे आहेत. प्रत्येकीं महजिदीच्या चौत्र्यापासून
१२९ फूट उंच आहेत. ह्याजवर चढून काशी क्षेत्र पाहूं लाग-
लें ह्मणजे जो काय मौजेचा चमत्कार शहरांतील इमारतींचा दृष्टीस
पडतो तो अनिर्वाच्य आहे. ह्या महजिदीजवळच हल्लींचें श्री बिंदुमाधवाचें
देवालय आहे. आणि ह्या देवालयाजवळच पंचगंगेचा घाट आहे. ज्या
बिंदुमाधवाच्या मूर्तीचा उच्छेद औरंगजेबानें केला. ती मूर्ति
हल्लीं एका सावकाराच्या येथें आहे. तिचें दर्शन सकाळीं प्रहर
दिवस पावेतों होतें. धुंडिराज विनायकाचें देऊळ श्री विश्वेश्वरा-
च्या देवळाजवळच आहे. दंडपाणी हे विश्वेश्वराच्या देवळांत
पश्चिमेस आहेत. आधीं त्यांचें दर्शन घ्यावें आणि मग श्री विश्वे-
श्वराचें दर्शन घ्यावें. कालभैरव हे काशिकापुरीचे कोतवाल
आहेत. काशीचें देऊळ भैरवाच्या देवळापासून बरेंच लांब आहे.
ह्या देवीला तेथील लोक वन्दे काशी म्हणतात. ह्या देवळाच्या
जवळच गुहा आहे आणि तेथून थोड्याच अंतरावर गंगा ह्या नां-
वचा एक तलाव आहे. भवानीचें देवालय धुंडिराजाच्या देवळा-
जवळ आहे. गंगेच्या काठीं एक घाट आहे. ह्या घाटानजी-
क जो गंगेचा भाग आहे त्यास मणिकर्णिका हें नांव आहे. ह्या
नित्य यात्रेच्या देवतांचें दर्शन यात्रेकऱ्यानें "विश्वेशं माधवं धुंडिं
दंडपाणिंच भैरवं ॥ वन्दे काशीं गुहां गंगां भवानीं मणिकर्णिकां"
ह्या श्लोकाच्या अनुक्रमानें घेतलें पाहिजे. येथें त्या नित्य यात्रेखे-
रीज आणखी अंतर्गृही, दक्षिण मानस, उत्तर मानस, पंचतीर्थ

आणि पंचक्रोशी ह्या यात्रा कराव्या लागतात. ह्यांच्याबद्दल तपशिलवार हकीकत मागाहून लिहीन.

गंगेस आशी, दशाश्वमेध, माणिकार्णिका, पंचगंगा आणि वरुणा हे पांच मुख्य घाट ३ कोसांच्या लांबीत आहेत. येथें प्रत्येक ठिकाणीं यात्रेकऱ्यानें श्राद्ध करावें लागतें.

प्रथमतः यात्रेकरी काशी क्षेत्रीं गेला म्हणजे त्यानें क्षौर करून माणिकार्णिका तीर्थप्रयुक्त श्राद्ध करावें लागतें. नंतर वर लिहिलेलीं पांच श्राद्धें केलीं पाहिजेत. पुढें पंचक्रोशीच्या वाटेनें ९ श्राद्धें केलीं पाहिजेत.

आतां महाराज पत्रविस्तार फार झाला सबब पुरे करितों. लोभ असावा हे विनंती.

एडिटराचा मित्र एक
फिरस्ता.

---

## रेल्वे पासून फायदा व बंगाली बाबू प्यासेंजरास कसे छळतात.

मुक्काम श्री वाराणशी
ता० जानेवारी १८७२.

**ज्ञानप्रकाशकर्ते महाराज,**

वि० वि०. रेल्वे ह्या देशांत होण्यापूर्वी वाराणशी ही जागा पंजाब, काश्मीर आणि काबूल तसेंच बंगाल, बहार, आढीया, ब्रह्मदेश आणि नेपाळ ह्या प्रांतांची आणि दक्षिण हिंदुस्थानांतील प्रांतांची व उत्तर हिंदुस्थानांतील प्रांतांची व्यापाराची एक मोठी उतार पेंठच होती. तो संबंध आतां अगदीं सुटला यामुळें व्यापाराच्या निमित्तें जें वैभव ह्या स्थलास आलें होतें तें अगदींच कमी झालें असें म्हटलें तरी चालेल. आतां देखील येथें व्यापार मोठा होतो, परंतु तो फक्त यात्रेच्या संबंधानें जो होतो तितकाच मात्र. इतर पालवी त्याच्या अगदीं नाहींशा झाल्या.

येथें कारागीर लोक हर जातीच्या कसबांत फार उत्कृष्ट आढळतात. जडावाचें काम तर येथें अनुपम्य रीतीचें बनतें. तांबें, पितळ वगैरे धातूंचें काम चांगलें होऊन स्वस्तें पडतें. लांकडी काम, दगडी काम ह्याचीही तऱ्हा सदहू प्रमाणेंच. इकडे हलवायाच्या दुकानीं पक्कान्नें बहुत तोफा होतात व त्यांत विशेष इतकाच कीं, तीं घृतपक्क असल्यामुळें ब्राह्मण प्रभृति सर्व ज्ञातींचे लोक खातात. हजारों मण पक्कानें नित्य तयार होतात आणि वर लिहिलेली मोकळीक असल्यामुळें तितकीं तीं दररोज खपतात. नेहमींचे एतद्देशीय रहिवासी लोकांच्या येथें हलवायाच्या घरच्या पुऱ्यांचा व लाडवांचा नित्य खर्चाच्या मानानें दोन शेर चार शेरांचा रतीब लावलेला असतो. जे दक्षणी लोक नवीन येऊन राहिलेले आहेत, त्यांच्या येथें मात्र नित्य सर्व प्रकारची सोय घरीं होते. बाकी ठिकाणीं रगडून बाजारांतील जिन्नस चालतात. रांगड्या ब्राह्मण हलवायाच्या दुकानची पक्की रसोय दक्षणी यात्रेकऱ्यास श्राद्धादि कर्मास प्रशस्त आहे. एक दामाजीपंत कमरेस असले ह्मणजे जेवायाला, निजायाला, हुक्का ओढायाला वगैरे सर्व प्रकारची सोय देशाटण करणाऱ्याची निमिष मात्रांत होते.

रेल्वेच्या संबंधानें येथील व्यापार कमी झाला असें आम्हीं वर लिहिलें आहे तरी येथें फार मोठा व्यापार आहे. आह्मी पितांबर घेण्यास एके दुकानीं गेलों होतों तेथें तीन मजला पितांबर भरले होते, असाच प्रकार हर जिनसांचा.

रेल्वे आणि तारायंत्र ह्यांनीं मजा केली खरी, परंतु त्यापेक्षां जे लोक तेथें नौकरीवर आहेत त्यांच्या सारखे मजेदार लोक दुनियेंत आढळणें मुष्कील. काय सांगावें एडिटरबावा, इकडे रुपये ७ दरमहा झाला ह्मणजे त्याला "बाब" हें उपनामाभिधान प्राप्त होतें. तेथें स्टेशनावर शोध केला तों "बाबू" ह्या शब्दाचा अर्थ आपल्या इकडे "राव" अगर "पंत" म्हणतात, त्याप्रमाणेंच आहे असें समजलें. आतां आम्ही रेल्वे स्टेशन

बाबूंचें थोडेंसें वर्णन करितों. त्यांत कदाचित एखादे ठिकाणीं बाबू इतक्याच शब्दानें निर्वाह करूं तर ती गोष्ट रेल्वेवरील अगर इतर संभावित वास्तविक बाबूंस लागू नाहीं असें समजलें पाहिजे. सारांश काय म्हणाल तर झालेल्या बाबूंची ही गोष्ट आहे. प्रथमतः स्टेशनावर म्हणजे रेल्वेच्या हें अध्यारित घ्यावयाचेंच. नौकरी लागली म्हणजे हिवाळ्यांत आर्धा बाबूस एक दुलई पांघरावी लागते व चरस म्हणजे गांजाचा अर्क ह्याचा हुक्का ओढावा लागतो. तो हुक्का कशाचा म्हणाल तर श्रीफलाचें बेलें, देवनळाच्या दांडीवर चिलीम, आपल्या तिकडील रंगाऱ्याच्या येथें सतेलीं असतात त्या घाटाची आणि बेल्याच्या भोंकास वर ओंठ लावून बाबू गुड गुड ओढितात. मग काय विचारावयाची बाबूची चैन. मुलाच्या पायांत साक्स असून बूट असतात. व स्वारी १॥ हाती पंच्या नेसून सोगा खालीं सोडून डोकीवर इकडील किरिस्तवाप्रमाणें केस राखून आंगावर दुलईच्या आंतून एक आंगोछा वेष्टून उघड्या माथ्यानें स्टेशनावर गाडी जाण्याच्या अगर येण्याच्या वेळीं फिरूं लागते.

प्रयागाहून दिल्ली वगैरेकडे गाडी जाऊं लागली म्हणजे तो प्रांत प्रयागच्या पश्चिमेस आहे म्हणून तिला "पछाहाकी गाडी" असें म्हणतात. त्याप्रमाणें कलकत्ता वगैरे पूर्वेस आहे म्हणून तिकडे जाणारी अगर तिकडून येणाऱ्या गाडीस "पूरभ गाडी" असें म्हणतात. ह्या बाबूंचीं नावें भलीं लांब लांब असतात- बाबू राजेंद्र कुमार, बाबू शिवचरण प्रसाद अशा प्रकारचीं. आणि ह्या कृपाळू गृहस्थाची आणि टिकिट विकत मागणाऱ्या प्रवाशाची गांठ पडली म्हणजे फजितीच.

ईस्ट इंडियन रेल्वे कंपनीनें ज्या तिसऱ्या क्लासाच्या गाड्या केल्या आहेत त्या प्रत्येकींत समोरासमोर दोन बाकांवर दहा मनुष्यें बसतील इतक्या जागेचा एक भाग असे वेगळे वेगळे भाग केलेले आहेत. ह्याला हिंदुस्थानी भाषेनें "दरजा" अथवा "खाना"

अशी संज्ञा आहे. ह्या दरएक खान्यांत जरी दहा मनुष्यें बसण्याची जागा असते तरी जर एकाद्यास तो सगळा दरजा घेणें असेल तर सहा मनुष्यांचें भाडें द्यावें आणि "रिजर्व" करून घ्यावा. असा रिजर्व करून एकादा अगर ज्यास्त दरजे हवे असतील तितके घेतले म्हणजे त्यांत आपलीच काय ती मंडळी बसते. दुसरे परकीय कोणी येत नाहींत, ह्यामुळें बायका मनुष्यें घेऊन अदबशीर रीत्या बसण्यास चांगलें पडतें. ह्याकरितां तसा दरजा ज्याचीं ५।६ माणसें असतात ते घेतात. परंतु तो मिळण्याची जी पंचाईत आहे तिचा जेव्हां जातीनें अनुभव घ्यावा तेव्हांच इंगित कळतें. नाहींपेक्षां कळण्यास कठीण. ज्यास दरजा रिजर्व करणें असेल त्यानें लहान स्टेशनावर पूर्वी ४८ तास आणि मोठया स्टेशनावर पूर्वी २४ तास व कांहीं विशेष स्टेशनें आहेत तेथें पूर्वी सहा तास नोटिस दिली म्हणजे मिळेल, असा ईस्ट इंडियन रेल्वे कंपनीनें नियम केला आहे. ह्या नियमाप्रमाणें कोणी ती नोटिस देण्यास प्रथमतः गेला म्हणजे तेथील शिपाई लोक वगैरे म्हणतात कीं, "आछा कुच फिकीर नही. तुमको हम एक पलखमे दरजा रिजर्व करवा देयेंगे. जाव तुम अबी मकानपर" ह्यावर समाधान न पावतां जर कोणी स्टेशन मास्तरास नोटिस दिलीच तर मग जेव्हां दरजा रिजर्व करण्याची वेळ येते तेव्हां बुकिंग क्लार्क जे बाबू त्यांच्या हातीं संधी येते. मग त्यांजकडे दरजा रिजर्व करून द्या ह्मणून मागावयास गेलेंना गेलें म्हणजे ते प्रथमतः "गाडीमे दरजा खाली होगा तो गाडी आई बाद हम तुमको पास देयेंगे" असें उत्तर सांगतात. तेव्हां यात्रेकरू मोठया प्रतिष्ठेनें बाबूजवळ बोलूं लागतो कीं, बाबूजी "हमनें परसूं इस दरजेके वास्ते स्टेशन मास्तरसाबकू नोटिस दियाया" असें बोलतांच बाबू म्हणतात कीं, जाव "तुम स्टेशन मास्तर साबके पास" इतकें यात्रेकऱ्यापाशीं बोलून शिपायाला हाक मारून त्याला विचारतात कीं, क्यौं तुम कैसा गाफिल अदमी है, बाहेर-

के अदमी कोठडीमें केसे आने सकतेहै. लेकिन फोरन सबकु हकाल देव" मग यात्रेकऱ्याची काय विचारतां फजिती "अर्ध चंद्रेण राघवः" ही स्थिति प्राप्त होते. अशा प्रकारें बाहेर आल्यावर यात्रेकरी स्टेशन मास्तराकडे जातो, तेथें त्यास आम्हास दरजा देण्यास बाबूस हुकूम द्या म्हणून बोलावयास जातो तों साहेब आम्हास नोटिस दिल्याचें स्मरण नाहीं असें स्वच्छ सांगतात. मग येत बाबूशींच गांठ. मग शिपाई बोवा मध्यें येऊन म्हणतात कीं, हम तुमको दरजा करवाय देते, तुम कुचतोबी बाबूकू देव." असें बोलून त्यास बाबूकडे नेतो. आणि त्यांस सांगतो कीं, "बाबूजी इनको दरजाका पास करदेव और तुम आपना दस्तुरी लेव" मग बाबू तेव्हांच ताळ्यावर येतात. आणि म्हणतात कीं, अच्छा निकालो रुपय्या. केतने दरजे तुमको होनासो बोलो" मग यात्रेकरी जितके हवे लागतील तितके दरजे मागतो. त्याचा पास बाबू लिहून ठेऊन रुपये पेटींत टाकून स्वस्थपणें टिकिका वाटणें वगैरे काम करूं लागतात. इकडे जों जों गाडी स्टेशनावर येण्याची वेळ होते तों तों यात्रेकरू बावाची जी बाहेर परिवार मंडळी असते त्यांच्याजवळ टिकीट वगैरे कांहीं नसतें म्हणून रेल्वे स्टेशन पोलिसाचे लोक त्यांस धक्का बुक्की करण्याच्या बेतांत येतात. आणि हे गृहस्थ तर आंत अडकलेले असतात. पासाचे रुपये भरून चोरासारखे उगीच उभे राहिलेले असतात; कारण बाबूसाहेबांची मर्जी दुखावेल. मग हळूच धीर करून बोलूं लागतात कीं, "बाबूजी मेहेरबानी करके पास देव, अशा प्रकारें तीन चार वेळां चार चार मिनिटांच्या अंतरानें कृत्रिम बाबूजींची प्रार्थना केल्यावर बाबूजीच्या मुखावाटें मुक्ताफळें कोसळतात कीं, दरजेके पीछे हम दो दो रुपय्या लेयेंगे. अशा प्रकारची आकाशवाणी झाल्यावर यात्रेकरू कांहीं बोलण्याचा यत्न करणार, इतकें त्या अंतरसाक्ष बाबूस कळतेंच. मग तत्काळ बाबूजीकडून आपोआपच उत्तर मिळतें कीं, हं एक पाइ कम लेनेके नहीं." मग

जितके दरजे घेतले असतील त्याप्रमाणें प्रत्येकास रुपये दोन दोन प्रमाणें बाबूच्या पायावर अर्पण करून पास घेऊन बाहेर येतात तों शंकासुराची गांठ पडते. ते लागलीच सवाल करितात कीं, "शिपाईकी दस्तुरी ।· दरजा दिये बिगर दरजा नही खोला जायगा" आणि गाडी तर स्टेशनावर थोडा वेळ उभी राहते तेव्हां पटा पट पावल्या टाकून गाडी उघडून घेऊन माणसें आंत घालताहेत तों लगेज वगैरे कांहीं वजन झालें असतें त्याच्या पासाची बोंब उडते. लगेज वजन करणाऱ्या बाबूची पाद्य अर्घ्यादि पूजा केल्याशिवाय लगेजचा पास तर मिळणेंच नाहीं. बरें ती पूजा करून जो पास घेऊन गाडींत बसावयास जावें तों लगेज्याच्या बोजावरून लेबल मारणारा शंकाशूर हातांत पांच सहा लेबल व गोंदाची करटी घेऊन सलाम करितो आणि म्हणतो कीं, "क्यौं हम लेबल नही लगाना" तेव्हां यात्रेकरू बावा प्रश्न करितात "क्यौं किसवास्ते नही लगाते, तेव्हां त्यांचें छापिल उत्तर येतें कीं, हमारी दस्तुरी काहा है" मग यात्रेकरू बावा म्हणतात कीं, बाबा आतां तुला तरी काय देऊं? मग शिपाई बावा बोलतात कीं, "हंम आठ आणे लेंगे. मग त्यांच्या हातावर तितकी रक्कम टाकिल्यावर रिजर्व केलेल्या दरजास लेबल मारणारा येतो. त्याचीही कथा सदर्हूप्रमाणें. अशा प्रकारें यात्रिकरू बावाची पिशवी बरीच खालीं होते. आणि इतकी भुतावळ संपून जर स्टेशनावर कांहीं वेळ गाडी उभी राहिली तर वशिल्यानें प्लाटफार्मवर आलेले भिकारी लोकांची गांठ पडते आणि गाडी निघे पावेतों त्रास देतात. त्या सर्व कृत्यांत अशी कांहीं जिकीर होते कीं, जो गाडीचा पास काढण्याच्या वेळेपासून डोकें दुखण्यास आरंभ होतो तो डोकें उतरण्यास गाडी चालू झाली तरी दोन तास पुढें काळ लागतो.

ह्याप्रमाणें पास काढणें झाल्यास अगर रिटर्न जर्नी टिकिट घेणें झाल्यास यत्रिकऱ्यास दुःख मानसिक व शारीर संबंधीं सो-

सावें लागतें. केवळ टिकिटेंच काढावयाचीं असलीं तरी दे-खोल सदरीं सांगितलेली भयंकर चिरी मिरि द्यावी लागते. ति-च्या शिवाय गत्यंतरच नाहीं.

आतां एडिटरराव उत्तर हिंदुस्थानांतील रेल्वे कंपनीनें जीं सु-खाचीं साधनें करून ठेविलीं आहेत तीं सर्व ह्या आगांतुक का-रणामुळें व्यर्थ होतात. ह्याचा बंदोबस्त होणें मला तर कठीण-च दिसतें. अस्तु प्रालब्ध योग म्हणायाचा.

आतां सदरीं जी हकीकत म्यां लिहिली आहे ती सर्वत्र आहे असें समजूं नये.

(आम्हीं आतां गयेस जाण्याचा बेत केला आहे. तिकडे जाऊन आल्यावर पुनः आपली भेट पत्रद्वारें घेऊं. येतों लो-भ असावा हे विनंती.)

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

---

## मानमंदीर.

मु० श्री वाराणशी ता०
जानेवारी सन १८७२.

ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—

वि० वि०. गेल्या पत्रीं म्यां तुम्हास लिहून कळविलें होतें कीं, आम्ही गयेस जाणार, परंतु एडिटरबावा आमचा मुक्काम येथें आ-णखी कांहीं दिवस आहे ह्याकरितां येथील प्रसिद्ध प्रसिद्ध ठिकाणची हकीगत तुम्हास लिहून कळवावी असा म्यां बेत केला आहे आणि ह्याला अनुलक्षून हें आजचें पत्र लिहितों. आजच्या पत्रीं तुमच्या वाचकांस ह्या क्षेत्रांतील मानमंदिल आणि त्या मोहोल्यांत जीं दुसरीं मोठमोठालीं देवालयें आहेत त्यांचें वर्णन करितों.

मानमंदिल हीं एक जुनी वेधशाळा आहे व ह्याच्या नजीक जो गंगेस घाट आहे त्याला मानमंदील घाट ही संज्ञा आहे. या भव्य इमारतीनें घाटाला फारच शोभा आली आहे आणि ह्या इमार-

तीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्याच्या आटाळीवर उभे राहून गंगा प्रवाह अवलोकन केला म्हणजे मोठीच मौज दिसते. ह्या मंदिरांत जाण्याच्या द्वाराच्या आसपास पुष्कळ जुन्या झिजलेल्या मूर्ति दृष्टीस पडतात. त्यांत बऱ्याच मूर्ति मारुतीच्या आहेत. येथें एक जयपूरच्या राजाचें उंच काठीला बांधलेलें निशाण फडकत असतें. ह्याचें कारण असें कीं, हा सर्व मोहोल्ला त्याचा म्हणविला जातो आणि हल्लींच्या राजे साहेबांच्या पूर्वजांपैकीं कोणी जयसिंह म्हणून जयपूरचा राजा होऊन गेला त्यानें ही मानमंदिल नामक वेधशाळा बांधविली. ह्या वेधशाळेपासून घाटावर जी गल्ली जाते तींत दालभैरवेश्वराचें शिवालय आहे. ह्या देवावर जर अवर्षण पडलें तर संततधार धरितात असा येथें सांप्रदाय आहे. हा महादेव देवालयाच्या मध्यभागीं एक खोल कुंड आहे त्याच्या मध्यें आहे आणि जेव्हां देवाला गंगोदकानें कोंडून टाकितात तेव्हां नुसतें कुंडच भरून राहात नाहींत तर देवालयाचीं सर्व कपाटें बंद करून तें देखील तुडुंब भरतात, अशी येथें माहिती मिळते. ह्या देवाची यात्रा दारिद्रमोचनदायकही आहे. येथें चतुर्भुज अथवा श्री विष्णु आणि शीतला देवी हे देव आहेत. दालभैरवाच्या देवालयाजवळच सोमेश्वराचें देवालय आहे. ह्या देवाचें आराधन यथाशास्त्र केलें म्हणजे सकल व्याधींचा परिहार होतो. कोणीं थट्टेखोरानें आम्हास असा प्रश्न केला कीं, सकल व्याधींचें परिहार स्थान सोमेश्वराचें देवालय आहे तर इंग्लिश दवाखाने आणि नेटिव डाक्तर ह्यांच्या घरीं रोग्यांची गर्दी कां? आम्ही पडलों शहाणेंच तेव्हां प्रश्नास कांहीं तरी उत्तर द्यावें म्हणून "भावेन देवं" ह्या वचनानें त्याला गप्प बसविलें. कां? एडिटरराव आम्ही शहाणे खरे किंवा नाहीं? आम्हाला तर वाटतें कीं, आम्ही मोठें शहाणें. अस्तु विषयांतराची क्षमा असावी. ह्या देवालयापासून नजीकच एका गल्लींत एक बऱ्हान देवीचें देवालय आहे. ह्या देवतेच्या आराधनानें हातीं पायीं सुजलेले लोकांची व्याधी दूर होते.

मानमंदिल अथवा मानमंदीर ही वेधशाळा घाटावर उभें राहिलें म्हणजे भली उंच दिसते. ह्या मंदिराच्या थोरल्या दरवाज्यांतून आंत गेलें म्हणजे एक मोठा चौक लागतो. तेथून दुसऱ्या मजल्यावर गेलें म्हणजे ग्रहादिकांचे वेध वगैरे करण्याकरितां जीं कांहीं मजबूत यंत्रे बांधलेलीं आहेत तीं दृष्टीस पडतात.

ही वेधशाळा सन १६९३ इसवींत अंबेरीचा राजा जयसिंह ह्यानें बांधविली. राजा जयसिंह हा मोठाच विद्वान महमदशहा पादशहाच्या वेळीं होऊन गेला. इतर शास्त्रापेक्षां ह्याला गणिताची अशी कांहीं आवड होती आणि तो ज्योतिष शास्त्रांत इतका निपूण होता कीं, महमदशहा पादशहानें त्याजकडून ज्योतिष शास्त्राच्या गणितास बाहेरील अनुभवास जो कांहीं फरक येतो तो काढून टाकावा, या हेतूनें एक सारणी तयार करविली. आणि तिला जीज महमदशाही हें नांव दिलें. ह्याच सारणीच्या अनुरोधानें हल्लीं दिल्ली वगैरे प्रांतीं ज्योतिष शास्त्राचें सर्व गणित करितात. आपली ही सारणी चांगली व्हावी आणि ज्योतिष शास्त्रसंबंधी शोधास पुष्कळ मदत मिळावी म्हणून राजा जयसिंह ह्यानें दिल्ली, वाराणशी, मथुरा, अवंतिका आणि जयपूर इतक्या ठिकाणीं एकेक वेधशाळा बांधविली. त्या सर्व अद्याप काल पावेतों पाहण्या सारख्या आहेत.

महमदशहा पादशहानें जेव्हां राजा जयसिंहास वर लिहिलेली सारणी तयार करण्याचा हुकूम केला तेव्हां त्यानें प्रथमतः जीं आपल्या लोकांत पितळेचीं केलेलीं ज्योतिष शास्त्रसंबंधीं यंत्रे प्रसिद्ध होतीं तीं जमवून त्यानें काम चालविलें, परंतु त्या यंत्रांनीं मनाजोगें काम होईना म्हणजे तीं यंत्रें लहान असल्यामुळें व त्यांजवर अंश कला, विकला इत्यादि अति सूक्ष्म भाग बरोबर नसल्यामुळें यथातथ्य वेध होईनासे झाले. व दुसऱ्या पुष्कळ अडचणी येऊं लागल्या. तेव्हां त्यानें आपल्या मतानेंच "रामजंतर", "समराटजंतर" इत्यादि यंत्रें निर्माण केलीं. समराटजंत्राची तृजा १८ हातांची

आहे आणि कला दीड जवाची आहे. हीं यंत्रें दगड आणि चुना ह्याचीं भलीं मजबूत बांधलेलीं आहेत. हीं यंत्रें बांधवितेवेळीं जे भूमिति शास्त्राकडे लक्ष्य दिलें आहे त्याचें तें यंत्र पाहतांना आश्चर्य वाटल्यावांचून राहवतच नाहीं. ह्याप्रमाणें एडिटर महाराज राजा जयसिंहानें ज्योतिःशास्त्राचा विजय करून वेधशाळा बांधण्याचा प्रचार सुरू केला. ह्या वेध शाळेच्या योगानें ग्रह, तारे व इतर नक्षत्रें ह्यांच्या गति, स्थिति वगैरे प्रकार सुगम रीत्या कळूं लागले. ह्या पांच ठिकाणीं वेग वेगळ्या ज्या वेधशाळा बांधविल्या त्यांचें कारण इतकेंच कीं, एके ठिकाणीं जें गणित अगर वेध एका विवक्षित वेळीं केले तर ते वेध अगर गणित त्या विवक्षित वेळीं दुसऱ्या ठिकाणीं केल्यानें मिळतें किंवा चुकतें हें पाहतां यावें. ह्या प्रत्येक ठिकाणीं जे वेध होत ते नित्यशः आणवून प्रत्येक ठिकाणच्या रेखांशाचें अंतर काढून नंतर तें मिळालें तर खरें, नाहीं पेक्षां पुनः तपासणीस तो राजा पाठवी. परंतु त्याच्या ह्या वेधपत्रकांत अंतरच येत नसे. जसें गणितानें येईल तसेंच वेधानें येई. इतकें बरोबर काम त्यानें केलें. ह्याप्रमाणें श्री वाराणशी येथील वेधशाळेची आणि तेथील यंत्रांची हकीकत आहे. ती आमच्या एका मित्रानें आम्ही ही वेधशाळा पाहण्यास गेलों त्या वेळीं सांगितली. ती आपणाकडे पाठविली आहे. कृपा करून छापावी.

हल्लीं या यंत्राच्या योगानें ग्रहणें, तिथी वगैरे मात्र वर्तवितात. युरोपियन वगैरे जे कोणीं ह्या क्षेत्रीं येतात ते या वेधशाळेंत आल्यावांचून राहात नाहींत. तिगस्ता ड्यूक आफ एडिंबरोची स्वारी हिंदुस्थानांत देशाटनास आली होती तेव्हां येथें आली होती. हें मंदिर व त्यांतील यंत्रें फार पैसा खर्च करून व अक्कल खर्च करून बांधिलीं आहेत तरी जे ब्राम्हण ह्या मंदिरीं राहतात आणि त्यांस पाहण्यास येणाऱ्या लोकांपासून बरेच पैसे मिळतात तथापि त्यांची झाड झुड देखील बरोबर रीत्या त्यांच्यानें ठेववत नाहीं

ही मोठी दुःखकारक गोष्ट आहे. ह्या यंत्राचे जे अति सूक्ष्म भाग आहेत ते कित्येक ठिकाणीं अगदीं झिजून गेले आहेत व कित्येक ठिकाणीं माती सांठून सांठून बुजून गेले आहेत.

. वेधशाळेंत गेलें म्हणजे पहिल्यानें "भिंति यंत्र आपल्या दृष्टीस पडतें. ह्याची जी एक भिंत आहे ती अकरा फूट उंच आणि ९ इंच जाड असून क्षितिजाच्या पातळींत आहे. ह्या यंत्राच्या योगें मध्यान्हास सूर्य आला म्हणजे त्याची उंची वगैरे मापतां येते. ह्या यंत्रापासून थोड्याच अंतरावर एक फक्त दगडी आणि दुसरें केवळ चुन्याचें अशीं दोन भलीं मोठीं वर्तुळें बांधलेलीं दृष्टीस पडतात. त्यावरही अंश, कला वगैरे भाग पाडलेले आहेत, परंतु त्याचा उपयोग काय करितात तो आम्हास कोणीं तेथें सांगितला नाहीं. यंत्र सम्राट अथवा यंत्रराज हें एक यंत्र येथें बांधलेलें आहे. ह्याची भिंत ३६ फूट लांब आणि ४॥ फूट रुंद आहे. ती क्षितिज्याच्या पातळींत आहे. ह्याचें एक टोक ६ फूट ४। इंच उंच आहे. आणि दुसरें २२ फूट ३॥ इंच हळू हळू उंच उंच होत गेलें आहे आणि तें उत्तरधृवाच्या अगदीं सम रेषेंत आहे. ह्या यंत्राच्या योगानें क्षितिज्यापासून एकाद्या ग्रहाचें अगर ताऱ्याचें अंतर वगैरे काढतां येतें. येथें आणखी ३ ४ दगडी यंत्रें आहेत. त्यांचीं नांवें आतां मला आठवत नाहींत. लहान लहान यंत्रसम्राटही आणखी पुष्कळ येथें बांधलेले आढळतात.

ह्यांच्या जवळच चक्रयंत्र आणि दिगंशयंत्र हीं आहेत.

मानमंदिराजवळच घाटावर नेपाळच्या राजानें बांधविलेलें एक देवालय आहे. हें अवश्य पाहण्यासारखें आहे. हें देवालय बांधण्याची तऱ्हा इतर जीं देवालयें ह्या क्षेत्रीं आहेत त्यांच्या पासून फारच भिन्न आहे. असेना बापडी आपणास काय? हे विनंती.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

# दशाश्वमेध.

मुक्काम श्री वाराणशी.
ता० जानेवारी १८७२.

ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—

वि० वि०. गेल्या पत्रीं आपणाकडे मानमंदीर मोहोल्याची हकीकत लिहून पाठविली. ती आपण कृपा करून छापालच. हल्लींच्या पत्रीं दशाश्वमेध मोहोल्याचें विवरण लिहून पाठवितों. तिला आपल्या सुंदर पत्राच्या एका अंकांत कृपा करून जागा द्या.

दशाश्वमेधाचा घाट मानमंदीर घाटाच्या दक्षिणेस आहे. ह्या घाटीं स्नानादि कर्मांचें महत्पुण्य आहे याकरितां यात्रेकरू व क्षेत्रस्थ येथें जितकीं स्नानें साधतील तितकीं साधून घेतात. ह्या क्षेत्रीं पंचतीर्थी म्हणून जी यात्रा करितात त्या यात्रेचें एक श्राद्ध येथें करावें लागतें. बाकीचीं चार श्राद्धें अशीं संगम मणिकर्णिका, पंचगंगा, आणि वरूणा संगम ह्या ठिकाणीं केलीं पाहिजेत. ह्या पांच ठिकाणच्या श्राद्धाचीं फलें जगंनाथ, गया, प्रयाग, वाराणशी, हरिद्वार इत्यादि स्थलीं श्राद्ध यात्रा करून जें फल प्राप्त होतें तत्समान आहे.

दशाश्वमेधाची कथा मला एकानें सांगितली ती येथें लिहितों. कोणे एके दिवशीं शिव आणि पार्वती मंद्राचल पर्वताच्या शिखरावर क्रीडा करीत असतां एकाएकीं शंकरास वाराणशी क्षेत्राचें स्मरण झालें आणि तेथील वर्तमान आपणास पुष्कळ दिवस कळलें नाहीं म्हणून त्यास फार खेद झाला. श्री वाराणशी येथें दिवोदास राजा राज्य करीत होता. त्यानें महादेवासुद्धां सर्व देवांस श्री वाराणशींतून हाकून लाविलें होतें. नंतर शंकर तेथून निघून कांहीं दिवस मंद्राचलावर उमेसह येऊन राहिले होते. तेथून पुष्कळ दूतांस त्यांनीं वाराणशीस जाऊन तेथील वर्तमान काय आहे हें पाहून येण्यास आज्ञा केली व ते दूत वाराणशीस गेले. परंतु वाराणशी क्षेत्राचा महिमाच विलक्षण ह्यामुळें जो दूत तेथें जाई तो

परत येत नसे. कोणास तें क्षेत्र सोडावें असें वाटेचना, आणि शंकरास तर तेथील कांहींच वृत्त कळेना. अशा संकटांत सांपडले असतां काय करावें हा विचार करूं लागले. त्यांचें मन ह्या विचारांत निमग्न असतां ब्रह्मदेवास श्री वाराणशीस पाठवून शोध आणवावा ह्मणून उमेनें सुचविलें. तेव्हां महादेवानीं ब्रह्मदेवास बोलावून आणून सांगितलें कीं, तुम्ही वाराणशी क्षेत्रीं जाऊन तेथील वर्तमान घेऊन यावें. नंतर ब्रम्हदेव हंसारूढ होऊन वाराणशीस गेले. तेथें दाखल झाल्यावर त्यानीं सर्व क्षेत्रभर पर्यटण केलें. सर्व देवांचीं दर्शनें घेतलीं. नंतर त्यांस तेथें अत्यंत आनंद झाला आणि तें क्षेत्र सोडून जाण्याची वासना त्यांस होईना. तेव्हां त्यानीं आपणास राहण्याकारितां दशाश्वमेधचें स्थल निवडलें आणि तेथें एका वृद्ध ब्राम्हणाचें रूप धारण करून स्वस्थ राहिले. परंतु शंकरानीं जें काम त्यांस सांगितलें होतें त्याचा त्यांस विसर पडला नाहीं. दिवोदास राजाच्या नित्य कृत्यांत अगर दानधर्मांत कोठें तरी व्यंग काढावें ह्या हेतूनें ते शोध करूं लागले. तों त्यांस न्यून कोठेंच दिसेना. नंतर ब्रम्हदेवानीं अश्वमेधसामग्री राजाजवळ मागितली. ती अशी कीं, २७ कुंडांचें उदक, सत्तावीस वृक्षांच्या पालवी, ह्या प्रमाणें सर्व सामग्री दरएक जिन्नस सत्तावीस सत्तावीस ठिकाणचे असे आणून दे म्हणून म्हणतांच राजानें त्यांस उत्तर केलें कीं, महाराज एक अश्वमेध सामग्री तर काय, परंतु दहा अश्वमेधांची सामग्रीची तयारी ठेवितों. आपण स्वस्थ आश्रमास चलावें. नंतर ब्रम्हदेव गंगातटाकीं आले आणि स्नानसंध्यादि नित्य क्रम त्यानीं सुरू केला. नंतर राजानें दहा अश्वमेधांची सामग्री ब्रम्हदेवास पाठविली. ते सर्व जिन्नस त्यानीं तपासून घेतले तों त्यांस एकही न्यून आहे असें दिसलें नाहीं. यामुळें त्याची मर्जी फारच संतोष पावली आणि त्यांनीं दहा अश्वमेध केले. ज्या स्थलीं ब्रम्हदेवाचे हे दहा अश्वमेध झाले त्या स्थलास त्यांनीं दशाश्वमेध हें नांव देऊन त्या जागीं जो कोणी तीर्थविधि वगैरे कर्म करील त्यास तीं कर्में प्रया-

गास त्रिवेणी संगमीं केल्याचें फल मिळेल असा वर दिला. ब्रम्ह-देवानीं नंतर एक दशाश्वमेधेश्वर महादेव आणि दुसरा ब्रम्हेश्वर महादेव अशीं दोन लिंगें स्थापिलीं. दशाश्वमेधेश्वराचें लिंग फार मोठें गंडकी शिळेचें आहे. सुमारें घेर ६ फूट असून उंची ४ फूट आहे. ब्रम्हेश्वराचें लिंग इतकें मोठें नाहीं. दशाश्वमेधेश्वराच्या आराधनेनें नरदेह धारण करणाऱ्या प्राण्यास जन्ममरणापासून मुक्ती आहे, आणि ब्रम्हेश्वराच्या आराधनेनें ब्रम्हलोक प्राप्ती आहे अशी कथा आहे. ह्या देवालयांतून पुष्कळ दुसरीं लिंगें स्थापन केलीं आहेत. त्यांस रांगडे लोक कचेरी असें म्हणतात. दशाश्वमेध घाटीं आणि तेथेंच रुद्रसर ह्या नांवाचें कुंड आहे तेथें दशाहारांत स्नानाचें विशेष महात्म आहे. ज्येष्ट शुद्ध १५ च्या स्नानाचें फल तर फारच मोठें आहे.

ब्रम्हदेवाचे अश्वमेध संपल्यावर शंकराच्या कामाचें त्यांस पुनः स्मरण झालें म्हणून पुनः ते विचार करूं लागले. तों त्यांस कांहींच युक्ती सुचेना व दिवोदासाचा अपराधही त्यांस कांहीं आढळेना, तेव्हां त्यांनीं वाराणशीसच राहण्याचा निश्चय केला.

सिद्धेश्वरी महल्यांत एक सिद्धेश्वरीचें आणि दुसरें संकटा देवीचें अशीं दोन देवालयें आहेत. सिद्धेश्वरीच्या देवळालगतच चंद्रकूप म्हणून जो प्रसिद्ध कूप तो आहे. ह्या देवालयास दोन चौक आहेत त्यांपैकीं एकांत हा कूप आहे. चैत्र शुद्ध १५ स चंद्रकूपाची यात्रा मोठी भरते आणि कोणत्याही महिन्यांत सोमवारीं पौर्णिमा आली तर तेथें मोठा मेळा जमतो. ह्या कूपांत पिंडदानाचें मोठें फल आहे. याच चौकांत दुर्गा देवी आहे. ती चतुर्भुज आहे. एका हातांत कमल दुसऱ्या हातांत तरवार तिसरा हात सिंहावर आणि चवथा हात रेड्यावर असे आहेत. ह्या देवळा मागें सिद्धेश्वरीचें देवालय आहे. ही देवी सकल कार्यांची सिद्धिदायका आहे म्हणून सर्व लोक हिची आराधना करितात.

संकटा देवी ही सकल संकटाची परिहर्ती आहे. हें देवालय

मोठें असून ह्यांत एक मठ आहे. ह्या मठांत वाराणशी क्षेत्रीं मरावें ह्या उद्देशानें आलेले गरीब लोक राहतात. तसें कांहीं शास्त्राध्ययन करणारे विद्यार्थीही राहतात. ह्या देवळापासून जवळच भागीरथीच्या तटाकास एक घाट आहे. त्याला संकटाघाट ही संज्ञा आहे. ह्या घाटावरच महावीराचें देवालय आहे. संकटा घाटाच्या उत्तरेस रामघाट आहे. येथें जितके घाट आहेत तितके प्राय: राजे लोकांनीं आणि महाजन लोकांनीं बांधलेले आहेत व दरएक घाटीं एकेक शिवालय आहे. आतां आम्ही कंटाळलों. हे विनंती.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

---

## पिशाचमोचन.

मु० श्री वाराणशी ता०
जानेवारी १८७२.

ज्ञानप्रकाशकर्ते यांस:—

वि० वि०. आम्ही विक्षिप्त आणि आतां तुम्हास काय म्हणूं? आम्ही विक्षिप्त कसे म्हणून प्रश्न कराल तर सांगतों ऐका. आम्हीं काल पर्वां तुमच्याकडे दोन पत्रें रवाना केलीं त्यांतून "मानमंदीर" आणि "दशाश्वमेध" ह्या मोहोल्याची हकीकत तुम्हास लिहून कळविली आणि आज त्या क्रमानें म्हटलें म्हणजे "बंगाली टोला" मोहोल्याची कांहीं माहिती तुम्हास ल्याहावी, तसें न करितां आज आम्ही तुम्हास "पिशाच मोचना" कडील वाराणशीच्या भागाची हकीकत लिहिणार अतएव विक्षिप्त. अस्तु.

ह्या क्षेत्राच्या पश्चिम सीमेवरच कां म्हणाना "पिशाच मोचनाचें" मोठें तळें आहे. ह्यांतील उदक संचयास विमलतीर्थ असें नांव आहे. ह्या सरोवरास चोंही बाजूनीं घाट बांधलेले आहेत. जो घाट दक्षिणोत्तर जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला आहे त्यावर देवळें आहेत. जे यात्रेकरू श्री वाराणसीस यात्रेस येतात त्यांस येथें येऊन स्नान व श्राद्ध करावें लागतें. येथें एक त्रिपिंडी श्रा-

द्ध आणि दुसरें विमल तीर्थप्रयुक्त श्राद्ध हीं करावीं लागतात. ज्याच्या घरांत कांहीं पिशाचाचा उपद्रव असेल त्यास पहिलें श्राद्ध करणें अवश्य आहे, नाहींपेक्षां फक्त दुसरेंच केलें म्हणजे बस होतें. पहिल्या श्राद्धाच्या संकल्पांत भूम्यांतरिक्षादिविस्थानां आज्ञातनाम गोत्राणां प्रेतानां उत्तम लोक प्राप्त्यर्थं असें म्हणावें लागतें. क्षेत्रस्थ जे लोक आहेत ते वर्षांतून एकवार तरी ह्या विमलतीर्थीं स्नान करितात. ह्या तीर्थाच्या स्नानें करून ब्रम्हराक्षसादि पिशाचांच्या पीडा परिहार होतात. ह्या क्षेत्राची कोतवाली कालभैरवाकडे श्री विश्वेश्वरानीं दिलेली आहे ह्याकारितां त्यांचे दूत ह्या क्षेत्राच्या संरक्षणार्थ चोंहींकडे पहारा करीत असतात. एके दिवशीं असा चमत्कार झाला कीं, कोणीं एक महद्भूत जिवाचा धडा करून वाराणसीस येऊं लागला. तेव्हां तो ह्या नगराची पंचक्रोशीची जी प्रदक्षणा आहे त्या मार्गावर आला. तेव्हां त्यास भैरवनाथाच्या दूतांनीं अडविलें आणि नगरींत जाण्यास प्रतिबंध केला. तेव्हां त्या ब्रम्हराक्षसानें त्या भैरव दूतांशीं युद्ध केलें आणि त्यांचा पराभव करून आपण पुढें चालता झाला. मार्गानें येतां येतां तो विमल तीर्थ कुंडापाशीं आला. तेव्हां खुद्द भैरवेश्वराची आणि त्याची गांठ पडली. आणि उभयतांचें युद्ध जुंपलें. युद्धांत भैरवांनीं आपल्या खड्गानें त्याचा शिरच्छेद केला आणि तें शीर घेऊन श्री विश्वेश्वराकडे वर्दीस गेले. वर्दी देताहेत तोंच त्या महद्भुताच्या शिरानें श्री विश्वेश्वराच्या स्तवास आरंभ केला. हें पाहून उभयतांस परमाश्चर्य वाटलें. त्या स्तवें करून श्री विश्वनाथ भोळेच ते संतुष्ट झाले आणि त्या महद्भुतास वर माग म्हणून म्हणाले. तेव्हां त्यानें मला श्री वाराणशी क्षेत्रीं विमल तीर्थीं निरंतर राहण्याची परवानगी मिळावी म्हणून वर मागितला. त्याप्रमाणें श्री विश्वेश्वरांनीं त्यास वर देऊन सांगितलें कीं, इत उत्तर कोणींही दुष्ट पिशाचाचा प्रवेश ह्या नगरांत न होई असा बंदोबस्त तूं ठेव. ह्याप्रमाणें येथील पिशाच मोचनाची कथा आहे महाराज.

तिरस्थळी (त्रिस्थळी) ची यात्रा करणाऱ्यानें श्री वाराणशीस आल्यावर पिशाच मोचनाची यात्रा केली नसली तर त्यास गयेची यात्रा करण्याचा अधिकार येत नाहीं, परंतु कोणी यात्रेकरू अज्ञानानें काशी प्रयागची यात्रा करून काशींतील पिशाच मोचनाची यात्रा न करितां गयेस गेला तर गयावळ त्यास लागली पिशाच मोचनाची यात्रा केली किंवा नाहीं ह्याबद्दल प्रश्न करितात. केली नसल्यास गयेस पिशाच मोचनाचें स्थान अक्षयवटाकडे आहे तेथें प्रथमतः विधियुक्त पिशाच मोचनाची यात्रा करवून नंतर गयावर्जनास आरंभ करवितात.

परंतु एडिटर महाराज, हा जो यात्रेचा क्रम म्यां लिहिला तो प्राचीन काळचा बरें. हल्लीं जर विचाराल तर ह्या आगगाडीनें आणि तारायंत्रानें जो विलक्षण वेग यात्रेस आला आहे तो फारच आश्चर्यकारक आहे. ज्या गयेच्या यात्रेस पुरे ६० दिवस अवश्य आहेत ती यात्रा दोन दिवसांत संपून पार! आगगाडीनें जितका काळ मार्ग क्रमणाचा कमी केला आहे, त्याचप्रमाणें गयावर्जनाचा काळही कमी झाला आहे. श्राधाची जी फजिती उडाली आहे ती तर लिहिण्याची सोयच नाहीं. अग्नीकरण, ब्राम्हण भोजन आणि पिंडदान हीं श्राद्धाचीं मुख्य तीन अंगें असतां आम्हास तें यथासांग करण्यास अवधि आणि सामर्थ्य असतां आम्ही तें सर्व पिंडदानावर आणि एक पैसा दक्षिणेवर भागवितो, तेव्हां शाबास आमची किंवा नाहीं एडिटरराव?

येथें म्हणजे पिशाचमोचनीं वर्षांतून बरेच मेळे भरतात. त्यांत मुख्य म्हटला म्हणजे काय तो पौषवद्य १४ म्हणजे आपल्या तिकडील मार्गशीर्षवद्य १४ चा. ह्या मेळ्यास रोटया भज्याचा मेळा असें म्हणतात म्हणजे साधारणतः मुळ्याच्या थालीपिठाचा मेळा असें म्हटलें तरी चालेल. ह्याचें कारण असें कीं, रांगडे लोक त्या दिवशीं मुळ्यांनीं मिश्रित केलेले कणकीचे रोट त्या यात्रेंत आणितात आणि खातात. हा मेळा फारच मोठा भरतो. सर्व अलम दुनिया तेथें

जमते. एडिटरराव ह्या मेळ्यांत जे मुळे विकावयास येतात तेवढे मोठे मुळे म्यां कधीं व कोठेंच पाहिले नाहींत. एकेक मुळा १४ तसूंच्या हातानें १। हात लांब आणि ६–७ इंच घेराचा. एकेक मुळ्याचें वजन सुमारें ६–७ पक्के शेर असून किंमत २–३ पैसे.

विमल तीर्थ म्हणून जो तलाव आहे त्याच्या पूर्वेकडील घाटाचा कांहीं भाग सुमारें ८० वर्षांपूर्वीं कोणीं गोपाळदास साहू ह्या नांवाच्या सावकारानें बांधविला आणि बाकीचा भाग आणि त्यावरील देवालय हीं मृगाबाई ह्मणून कोणीं सावकाराची स्त्री होती तिनें बांधविला असें कळतें. पश्चिमेच्या आंगचा घाट आणि त्यावरील बुरूज हेही तितकेच जुने आहेत. घाट कोणीं बळवंतराव बाकिरा ह्यानें आणि बुरूज मिरजा खुरमशा ह्यानें बांधविले. उत्तरेच्या आंगचा घाट १०० वर्षांपूर्वीं राजा मुरलीधर ह्यानें बांधविला, परंतु दक्षिणेकडील घाटाचें काम फारच जुनें आहे. तो सुमारें ३०० वर्षांपूर्वीं राजा शिवशंबर ह्यानें बांधविला. त्याच्या कांहीं भागाचा जीर्णोद्धार थोड्या वर्षांपूर्वीं विनायकराव साहेब ह्यानीं करविला.

पूर्वेकडील घाटीं दोन देवालयें एक नक्कुमिश्र ह्यानें आणि दुसरें मृगाबाईनें अशीं बांधविलीं.

मृगाबाईनें जें महादेवाचें देवालय पिशाचमोचनीं बांधविलें आहे त्यांत मुख्य दैवत शिव असून त्याचे जवळच ज्या पिशाचाचें शिर कालभैरवानें छेदिलें त्याचें द्योतक दगडी शीर भयंकर आकाराचें करून बसविलें आहे. ह्याच्या पलीकडे श्री लक्ष्मी नारायणाच्या मूर्ति आहेत. ह्या सर्व मूर्तिजवळच एक ऋषीची मूर्ति आहे. ह्याच देवळाच्या पूर्वेस कोपऱ्यास पांच सोंडेच्या गणपतीची मूर्ति आहे.

नगरीच्या ह्याच आंगास दुसरें एक कुंड आहे त्याला सूर्यकुंड ह्मणतात. ह्या कुंडांत पूर्वीं १२ कूप होते त्यांपैकीं २ कूप हल्लीं उपलब्ध आहेत. ह्या कुंडांत एका आंगास घाट आहे त्या-

वर सूर्यनारायणाचें देऊळ आहे. हें देऊळ बुंदीकोट्याच्य राजानें बांधविलें आहे. ह्या देवळांत मध्यभागीं सूर्ययंत्र भले मोठें पाषाणाचें आहे. त्याची पूजा परमादरानें लोक रविवारीं करितात. ह्या देवळांतच एक कोठडी आहे तेथें होम कराव लागतो. होम होते वेळीं यजमानास सूर्यपुराण श्रवण करावें लागतें. ह्या देवाचें नांव सांबादित्य आहे. ह्याची कथा अशी आहे कीं, श्री कृष्णाचा मुलगा जांबवतीच्या पोटीं झालेला जो सांब त्याला कांहीं पातकामुळें कुष्ट भरलें. तेव्हां जांबवतीनें श्री कृष्णास त्याची कुष्टरोगापासून मुक्ती व्हावी ह्मणून कांहीं तरी व्रत सांगावें ह्मणून विनंती केली, तेव्हां कृष्णानीं तिला सांगितलें कीं, मुलानें श्री वाराणशी क्षेत्रीं जावें आणि तेथें एक तलाव बांधून त्यावर श्री सूर्यनारायणाचें देऊळ बांधावें आणि नित्य त्या तळ्यांत स्नान करून देवळांतील सूर्ययंत्रावर अर्घ्यप्रदान करावें म्हणजे कुष्टरोग दूर होईल. ह्याप्रमाणें सांबानें आचरण केलें तेव्हां त्याचें कुष्ट गेलें. ह्या सूर्यकुंडासमीप अष्टांगभैरवाची मोर्ति आहे ती औरंगजेब पादशहानें छिन्न विछिन्न केली आहे.

इकडेच ध्रुवेश्वराचें देवालय आहे. ह्यांत ध्रुवऋषीनीं स्थापित महादेवाची शाळुंका आहे. आतां पुरे करितों हे विनंती.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

---

## काळभैरव काशीचे कोतवाल.

मुक्काम श्री वाराणशी.

ता० जा० १८७२.

**ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—**

वि० वि०. अहो एडिटर बावा आलीकडे आम्हास विस्मरणाची बाधा फारच झाली. ती कोठवर म्हणाल तर तारीख देखील ध्यानांत राहिनाशी झाली. नुकतें आज सकाळीं पंचांग पाहिलें आणि ता० कितवी ती घोकली. असें असतां दोन पंचांगाचे बेरजे

बरोबर एक दशांगाची गोळी होऊन आमच्या स्मरणाग्नींत धूप बनून गेली. वा: धन्य तुमची आणि आमची. अस्तु.

आजच्या पत्रीं काशी क्षेत्राचे कोतवाल जे काळभैरव ह्यांच्या मंदिराचें आणि त्या मोहोल्याचें थोडेंसें वर्णन तुमच्याकडे पाठवितों. त्याला आपण कृपा करून जागा द्या.

भैरवनाथाचें मंदीर श्री काशी विश्वेश्वराच्या मंदिरापासून सुमारें एक मैलभर लांब आहे. काळभैरवाचा अंमल सगळ्या पंच क्रोशींत आहे. ह्यांचा सोटा मोठा कठीण आहे. ह्या सोट्याचें नांव दंडपाणी. आतां दंडपाणी ह्या शद्बाचा अर्थ पाहूं गेलें तर ज्याच्या हातांत दंड तो. व अशा नांवाचा एक शंकराचा दूत होता. असें असतां येथें दंडपाणी याचा अर्थ काळभैरवाचा सोटा असा सर्व लोक समजतात. ह्या दंडपाणीचें देवालय काळभैरवाच्या देवालया-जवळच आहे. काळभैरवाच्या देवळांत एक चौघडा आहे. ब्रम्हरा-क्षसादि पिशाच योनींतले जिवास व पातकी प्राण्यास काळभैरव शिक्षा करितात. दंडपाणीच्या देवळांत गेलें म्हणजे तेथें एक चार फूट उंचीचा भला मोठा पाषाण आहे. इतकेंच काय तें दृष्टीस पडतें. ह्यांच्या दर्शनास लोक प्रत्येक रविवारीं आणि प्रत्येक मंगळ-वारीं फार जातात. त्या दिवशीं ह्या देवास एक रुप्याचा मुखवटा घालितात. आतां खुद्द काळभैरवाच्या देवळांत दर्शनास जे लोक जातात त्यांच्या पाठीवर काळभैरवाचा सोटा बसल्यावांचून राहतच नाहीं. आतां हें समजण्याकरितां मला येथें थोडेंसें काळभैरवाच्या आंतील देवळाचें वर्णन केलें पाहिजे. ज्या ठिकाणीं देवाचा देव्हारा आहे तें स्थल अथवा ती खोली तीन खण + दोन खण अशा लांबी रुंदीची आहे. व त्या पुढें तीन खण लांबीचें बाहेरील खुलें दालन आहे. ह्या दालनांत मधल्या खणांत दरवाजा देवघरांत जा-ण्याचा आहे. ह्या दरवाजानें यात्रेकरू देवदर्शन घेऊन परत जाऊं लागला म्हणजे त्यास बाहेर दोन्हीआंगास काळभैरवाचे दोन निशी-म भक्त चौरंगावर बसलेले असतात. त्यांपैकीं एकजण गांठितो

आणि त्यांच्या हातांत रेशिमाचा काळा गंडा बांधून त्याच्या पाठीवर मोराच्या पिसांचा कारल्याच्या आकृतीसारखा केलेला एक सोटा लगावतो आणि एक पैसा घेऊन सोडून देतो. भैरवनाथाची मूर्ति चतुर्भूज आहे. येथें व येथील दुसऱ्या देवळांतून देवदर्शनास गेलें म्हणजे कपाळास पुजारी लोक चिमटीनें एक तांबडी भरड पूड लावितात. तिला कुंदी असें नांव आहे. ह्या देवास मादक द्रव्याची फार आवड आहे. कुत्रें हें त्या देवाचें प्रिय श्वापद आहे. एक भला मोठा दगडी कुत्रा दरवाजाच्या आंत गेलें म्हणजे दृष्टीस पडतो.

सुमारें ४०,४२ वर्षांपूर्वी कैलासवाशी बाजीराव रघुनाथ पेशवे ह्यानीं भैरवनाथाचें देवालय बांधविलें अशी माहिती लागते. ह्या देवळाच्या बाहेरच्या आंगास ३।४ हलवायाचीं दुकानें आहेत. तेथें साखरेचा वडा आणि घोडा हीं विकत मिळतात. तें घेऊन देवास अर्पण करण्याचा संप्रदाय आहे. मला कोणीं सांगितलें कीं, तो घोडा नव्हे तर कुत्रा असतो. आणि ह्या गोष्टीचा संभवही आहे. कारण कुत्रा हें भैरवनाथाचें वहान आहे.

भैरवाच्या देवळापासून जवळच रवि, सोम, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु आणि केतु ह्या नवग्रहांचें आलय आहे. हे नवग्रह तीन ओळींत दर ओळींत तीन प्रमाणें स्थापिले आहेत.

येथून थोडेंसें पुढें गेलें म्हणजे पूर्वीं सांगितलेले दंडपाणीचें देऊळ लागतें. त्यांत काळकूप म्हणून जो प्रख्यात कुवा तो आहे. ह्या कूपांत मध्यान्हीं सूर्य आला म्हणजे लोक स्नानास जातात. त्या स्नानानें आपल्या भविष्य स्थितीचें ज्ञान होतें असें सांगतात. येथेंच महा काळाची मूर्ति आहे. ह्या महा काळाच्या आराधनेनें प्राणी जन्ममरणापासून मुक्त होतो. येथें पांच पांडवांचे पुतळे आहेत.

मणिकर्णिका कुंडाची कथा येथें लिहितों. ह्या कुंडांतील तीर्थांत स्नान केल्यानें मुक्ति प्राप्त होते. ह्या कुंडाबद्दल कथा

अशी आहे कीं, कोणे एके समयीं श्री विष्णूंनीं काशी क्षेत्रीं येऊन आपल्या चक्रानें एक कूप खणिला आणि त्याला चक्रपुष्करणी हें नांव दिलें. त्या कूपाचें सौंदर्य पाहून विष्णूस फार संतोष झाला. आणि ते त्या कूपाच्या उत्तर भागीं तपश्चर्येस बसले. इतक्यांत श्री शंकराची स्वारी तेथें आली. आणि ती कूप पाहून आनंदानें नृत्य करूं लागली. हें नृत्य करितां करितां शंकराच्या कानांतील कुंडल त्या तीर्थांत पडलें तेव्हांपासून पुढें त्या कूपाला मणिकर्णिका हें नांव प्राप्त झालें. आतां मागाहून लिहूं. हे विनंती.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

---

## मणिकर्णिका, चक्रपुष्करणि आणि वृद्धकाळेश्वर.

मुक्काम श्री वाराणशी ता०
जानेवारी सन १८७२.

**ज्ञानप्रकाशकर्ते यांस.—**

वि० वि०. गेल्या पत्रीं आपणाकडे मणिकर्णिका तीर्थाची कथा लिहून पाठविली. आजही आणखी थोडीशी लिहून नंतर दुसऱ्या ठिकाणची माहिती लिहितों. तिला आपल्या सुंदर पत्रीं कृपा करून जागा द्यावी.

मणिकर्णिका कुंडास मुक्तिक्षेत्र आणि पूर्ण शुभकरण हीं नांवें आहेत. लोकांत ह्या कुंडास मणिकर्णिका हें नांव कां पडलें त्याबद्दल आणखी अशी कथा प्रसिद्ध आहे कीं, कोणे एके समयीं ह्या कुंडावर शंकर आणि पार्वती क्रीडा करीत होतीं तेव्हां पार्वतीच्या कानांतील एक तानवड त्यांत पडलें ह्यामुळें त्यास मणिकर्णिका हें नामाभिधान त्यास प्राप्त झालें. सारांश काय तर कानांतला मणी त्यांत पडला. तो शंकराच्या कानांतील पडलेला असो किंवा पार्वतीच्या कानांतील असो म्हणून त्या कुंडास मणिकर्णिका हें नांव मिळालें. नाहीं तर त्याचें पहिलें नांव मागल्या पत्रीं लिहिल्याप्रमाणें चक्रपुष्करणी हें होतें व तें हल्लींही प्रसिद्ध आहे.

ह्या कुंडास चोंहींकडून पायऱ्या बांधलेल्या आहेत त्यांपैकीं अगदीं तळच्या ज्या पायऱ्या आहेत त्या एक संधी आहेत असें गंगापुत्र सांगतात. परंतु त्याला सांधे दिसतात ते कां म्हणून विचारिलें तर ते म्हणतात कीं, जरी ते सांधे वर दिसतात तरी ते आंत पावेतों नाहींत. ह्या पायऱ्या श्री विष्णूनीं जे वेळीं आपल्या चक्रानें चक्रपुष्करणी निर्माण केली त्या वेळींच त्यांनीं बांधल्या. ह्या पायऱ्याच्या एका पटांगणावर उत्तरेच्या आंगास एक कोनाडा आहे. त्यांत श्री विष्णूची मूर्त आहे. तिचें पूजन पुष्करणीचें स्नान झालें ह्मणजे करावें लागतें. ह्या कुंडांत हल्लीं पाणी भरावें लागतें ह्मणून तें कोंडलेलें पाणी होऊन लोकांच्या स्नानानें त्यास गंधी येतो.

चक्रपुष्करणी कुंड आणि भागीरथी ह्यांच्या मध्यें जो घाट आहे त्याला मणिकर्णिका घाट असें नांव आहे. ह्या घाटावर तारकेश्वराचें आलय आहे. वाराणशी क्षेत्रीं प्राण्याच्या प्राणोत्क्रमणाच्या वेळीं हे तारकेश्वर त्याच्या कानांत तारक मंत्राचा उपदेश करतात आणि त्याची जन्म मरणापासून मुक्ती होते. येथें असें सांगतात कीं, जो कोणी येथें म्हणजे वाराणशी क्षेत्रीं मरण पावतो त्यास तारकोपदेश होतो आणि तो झाला म्हणजे त्याचा उजवा कान त्या वेळीं वर असतो. तारकेश्वराचें मंदीर अगदीं भागीरथीच्या काठीं असल्यामुळें व वर्षांतून सुमारें चार महिने तें सगळें पाण्यांत बुडत असल्यामुळें त्याचे खालचे सर्व चिरे उखळले आहेत. तारकेश्वराचें लिंग कुंडांतील देवळांत आहे आणि तें कुंड हमेश भागीरथीच्या उदकानें भरलेलें असतें म्हणून त्याचें स्पष्ट दर्शन बहुधा होत नाहीं.

मणिकर्णिका घाटाच्या वरच्या आंगीं चरण पादुका आहेत. त्या विष्णूची दोन पावलें संगमरवरी दगडावर कोरून कुरुंदाच्या दगडांत बसविलेलीं आहेत. ह्या विष्णूच्या चरण पादुका येथें स्थापन करण्याचें कारण असें सांगतात कीं, पूर्वीं जेव्हां श्री वि-

ष्णूनीं शंकराचें आराधन केलें तेव्हां ते ह्या ठिकाणीं तपश्चर्येस बसले होते. कार्तिक महिन्यांत येथें मोठा मेळा जमतो.

मणिकर्णिका घाट ही सर्व काशी क्षेत्रांत अत्यंत पवित्र जागा असून ती ह्या क्षेत्राचा मध्य बिंदु आहे असें मानल्यास चालेल. कारण ह्या ठिकाणापासून जर रेषा काढून काशी क्षेत्राचे दोन भाग केले तर ते परस्पराशीं अगदीं जवळ जवळ सारखे होतील. ह्या घाटाच्या दुसऱ्या तबकडीच्या पायऱ्या चढून वर गेलें म्हणजे सिद्ध विनायकाचें देऊळ लागतें. ह्या देवळांत सिद्ध विनायकाची मूर्त असून दोन्ही आंगास सिद्धीबुद्धीच्या मूर्ति उभ्या आहेत. विनायक राजाच्या चरणापाशीं एक लहानसा मूषक आहे.

मणिकर्णिका घाटाच्या जवळ शिंदे आणि भोसले ह्यांचे घाट आहेत. शिंद्याचा घाट बायजाबाई शिंदे ह्यांनीं बांधविला आहे. ह्याच बायजा बाईनीं ज्ञानवापीचा मंडप बांधविला. शिंद्याचा घाट अगदीं ओहोळून गेला आहे. त्याचे बुरूज कोसळून पडले आहेत. जशी धरणीकंपानें जमीन फाटते आणि वरील इमारत आंत खचते त्याप्रमाणें ह्या घाटाची स्थिति दिसते.

वृद्ध काळेश्वराचें देऊळ वाराणसी क्षेत्राच्या उत्तर भागांत आहे. हें देऊळ फार प्राचीन आहे. प्रथमतः ह्यास १२ चौक होते असें सांगतात. परंतु हल्लीं सात उभे आहेत. पैकीं कित्येक अगदीं मोडकळीस आलेले आहेत. ह्या देवळाच्या आवारांत एक बगीच्या होतासा वाटतो. ती जागा आणि पडलेल्या पांच चौकांची जागा ह्यांत लोक घरें बांधून राहिले आहेत. प्रथमतः हें देवालय बांधून तयार झालें असेल तेव्हां खरोखरीच फार शोभायमान दिसत असेल. ह्या देवाची कथा अशी आहे कीं, सत्ययुगीं कोणी एक राजा वृद्धापकाळीं अत्यंत रोगग्रस्त झाला तेव्हां तो काशीस आला. आणि ईश्वराचें आराधन करूं लागला. ह्या त्याच्या आराधनानें महादेव फार संतुष्ट झाले. आणि राजास रोगमुक्त केला एवढेंच नाहीं तर त्यास यौवन दिलें. नंतर त्या राजानें

हें वृद्ध काळेश्वराचें मंदिर बांधिलें. आणि तेथें महादेवाची स्थापना केली. नंतर शंकरानीं प्रसन्न होऊन असा वर दिला कीं, जो कोणी वृद्धकाळेश्वराची आराधना करील त्यास कोणत्याही रोगाची बाधा होणार नाहीं. व तो दीर्घायु होईल. ह्या देवळांत शिरतांना पहिल्यानें महा वीराचें दर्शन होतें. पुढें काली देवीचें दर्शन होतें. तिच्या पुढेंच महादेवाचें दुसरें एक लिंग त्या राजानें स्थापिलेलें आहे त्याचें दर्शन होतें. काळीच्या उजव्या आंगास पार्वती आणि गणपतीच्या मूर्ति आहेत. आणि पार्वतीच्या डाव्या आंगास भैरवनाथ, सूर्यनारायण, हनुमान, आणि लक्ष्मी नारायणाच्या मूर्ति आहेत. येथें दोन कूप आहेत त्यांपैकीं एका कुपांतील पाण्यास मनस्वी घाण येते आणि तिनें तो सगळा चौक भरलेला असतो. कूपाच्या पाण्यांत व्याधिस्त लोक स्नानें करितात. बारा वर्षें सारखें ह्या कूपोदकानें स्नान केलें तर कुष्टादि महान रोग दूर होतात असें सांगतात. ह्या कूपोदकास विशेषंकरून गंधकाची फारच घाण येते. ह्या कूपाच्या शेजारीं दुसरा एक कूप आहे. ह्यांतील पाणी गोड असून चांगलें पाचक आहे ह्या चौकांतून दुसऱ्या चौकांत गेलें ह्मणजे तेथें भले मोठे अश्वथ आणि निंबाचे दोन वृक्ष दृष्टीस पडतात. तिसऱ्या चौकांत दोन भाग आहेत. पैकीं एका भागांत वृद्ध काळेश्वराचें लिंग आहे.

ज्या चोकांत कूप आहेत त्याच्या उत्तरेस एक लहानसें आवार आहे. त्यांत मार्कंडेश्वर आणि दक्षेश्वर हे दोन देव आहेत. वृद्ध काळेश्वराच्या देवळा बाहेर पडून त्या देवळाच्या दक्षिणेकडील भिंतीच्या बाजूनें रस्त्यांतून चाललें ह्मणजे त्या भिंतीच्या कोपऱ्यास अल्पमृतेश्वराचें देऊळ लागतें. ह्या देवाची आराधना दीर्घायुत्व देते. वृद्ध काळेश्वराच्या देवळांत दर रविवारीं मोठा मेळा जमतो आणि श्रावणा आदितवारीं मोठीच यात्रा जमते. वृद्धकाळेश्वरार्पणमस्तु.

एडिटराचा मित्र फिरस्ता.

# दिवोदास हा बौद्ध धर्मी होता वगैरे.

मु० श्री वाराणशी ता०
जानेवारी १८७२.

**ज्ञानप्रकाशकर्ते यांस.—**

वि० वि०. काल रोजीं आह्मी ह्या क्षेत्रीं फिरत असतां एका मिशनरी साहेबांची व आमची गांठ पडली. तेव्हां त्यांनीं चालीप्रमाणें आम्हावर झडप घातलीच आणि बराच वेळ त्यांचें व आमचें संभाषण झालें. त्यापैकीं येथें थोडेंसें लिहितों. नंतर आमचा जो क्रम आहे त्याप्रमाणें ज्या ज्या देवालयांत आह्मी दर्शनास गेलों तेथील हकीकत लिहितों. तिला कृपा करून आपण आपल्या सुंदर पत्रीं जागा द्या. नाहीं ह्मणूं नका हो बाबा.

मिशनरी बावांनीं काशी क्षेत्रीं श्री विश्वेश्वराचें आधिपत्य प्राचीन काळापासून आहे ह्याबद्दल बरेच वेळ संभाषण केलें. नंतर त्यांस व त्या सहित इतर सर्व देवांस वाराणशी क्षेत्रांतून दिवोदास राजानें हाकून दिलें, ह्याबद्दलही संभाषण केलें. दिवोदास राजाची कथा अशी आहे कीं, कोणे एका समयीं वाराणशी क्षेत्रीं दिवोदास नामें राजा राज्य करीत होता. तो परम धार्मिक, पुण्यशील, नीतिमान इत्यादि सर्व गुणांनीं संपन्न होता. असें असतां देवांचें आणि त्याचें वाकडें आलें आणि त्यानें श्री विश्वेश्वर प्रभृति सर्व देवतांस वाराणशींतून हाकून लाविलें. श्री शंकरास वाराणशीवांचून इतर ठिकाणीं तर चैन पडेना आणि दिवोदास राजा तर त्यांचा त्या नगरींत प्रवेश होऊं देईना. तेव्हां युद्ध प्रसंगानें दिवोदासास जिंकावें असा बेत सर्व देवांनीं केला. परंतु त्यांतही ते फसले. पुढें दिवोदासाच्या हातून कांहीं तरी पातक घडवावें आणि त्याच्या पुण्याईंत कांहीं कमतरता आणून त्यास राज्यभ्रष्ट करावें असा बेत त्यांनीं केला. परंतु तोही निष्फल झाला. मग सर्व देव उगीच बसले. त्यांस काय करावें हें सुचेना. शेवटीं श्री गजानन महाराजांनीं देव सभेंत पुढें येऊन

विडा उचलला कीं, मजकडे जर हें काम सोंपविलें तर मी दिवोदासास वाराणशींतून बाहेर काढितों. अशा प्रकारचें वचन लंबोदर महाराजांचें ऐकतांच सर्व देवांस परम संतोष झाला आणि भोळ्या शंकरांनीं त्यास तसें करण्यास आज्ञा दिली. नंतर गणपतींनीं वृद्ध ब्राम्हणाचें रूप धारण केलें आणि दिवोदास कचेरींत प्रवेश केला. दिवोदासानें गणेश भटजींस अत्यादरें आसन वगैरे देऊन आपल्याजवळ बसवून घेतलें आणि प्रत्यक्ष गणपतींनीं भाषणास आरंभ केला. तें भाषण ऐकून सर्व कचेरींतील लोकांचीं अंतःकरणें वेधलीं गेलीं. राजाची भक्ति तर गणेश भटजींच्या भाषणावर इतकी बसली कीं, "गणेशभटजी वाक्यं प्रमाणं" असें होऊन गेलें. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं राजानें गणेश भटजींस गुरू करून उपदेश घेतला. तेव्हां आतां गुरुदक्षिणा द्यावयाची ती काय द्यावी म्हणून गुरू महाराजांस प्रश्न केला असतां त्यांनीं आज रात्रीं स्वप्नांत जो दृष्टांत तुम्हास होईल ती गुरुदक्षिणा मला द्या म्हणून सांगतांच राजानें ती गोष्ट स्वीकारली. नंतर त्या दिवशीं रात्रीं राजा निजला असतां त्यास स्वप्न पडलें कीं, "तुम्हीं वाराणशींतून बाहेर जावें". नंतर राजा जागा झाला आणि विचार करूं लागला तों त्यास हें सर्व देवांचें कपट आहे असें कळलें. परंतु एडिटर दादा गुरुभक्तीविषयीं सत्ययुगीचे लोक परम दृढतर ह्यामुळें त्यानें स्वप्नांत झालेल्या आज्ञेप्रमाणें वाराणशीचा त्याग केला आणि सर्व देवांस आंत येण्यास मोकळीक दिली अशी कथा आहे. ह्या कथेवर मिशनरी साहेबांनीं थोडेंसें व्याख्यान दिलें तें येथें लिहितों. सदर साहेबांचा अभिप्राय असा कीं, दिवोदास राजा हा बौद्ध धर्माचा अनुयायी होता ह्मणून त्यास हिंदूंच्या देवांची मानखंडणा करणें अवश्य वाटे व जेव्हां त्याचें वर्चस्व काशी क्षेत्रीं झालें तेव्हां त्यानें सर्व देव तेथून हाकून दिले. त्याचा अर्थ काय म्हणाल तर त्या देवतांची पूजा अर्चा आपल्या राज्यांत त्यानें बंद केली.

अशा प्रकारें व्यवस्था झाल्यावर देवांनीं त्याचा पराभव करून तर नाहींच, परंतु कपटानें काशी हस्तगत करून घेतली. साहेब म्हणाले कीं; आम्हास असें वाटतें कीं, ज्या काळीं बौद्ध धर्माचा ऱ्हास काळ आला, त्याच वेळीं काशी देवांच्या हस्तगत झाली, असें आमचें अनुमान आहे. असो, कांहीं कां असेना. आमच्या कथेंत दिवोदास राजास कैलासास पुढें शंकरांनीं नेलें असें सांगितलें आहे.

काय हो एडिटर बाबा, विश्वेश्वराच्या नगरीच्या मागें लचांडें तरी! दिवोदास राजानें तिला हिरावून घेतलीच होती. अहो आलीकडे सुमारें सव्वाशें वर्षांपूर्वीं औरंगजेब पादशहानें ती घेतली तेव्हां श्री विश्वेश्वरादि सर्व देवांचीं स्थानें समूळ भ्रष्ट केलीं. सारांश काय? चांगलें ह्मणजे कोणाला नको असें नाहीं.

दिवोदासेश्वराचें देऊळ मीरघाटीं आहे. येथें एक "वीस बाहुक" ह्मणून वीस भुजांचा देव आहे. येथें एक कूप आहे. त्याचें नांव धर्मकूप आहे. मुख्य देवळांत जाण्याच्या वाटेवर धर्मेश्वराचें देवालय आहे. येथून थोड्याच अंतरावर विशालाक्षी देवीचें आलय आहे. मीर घाटाच्या पायऱ्या फार सोप्या आहेत.

येथून जवळच औसानगंजा शेजारीं नागकुवा महला आहे. त्यांत नागकुवा मोठा प्रसिद्ध कुवा आहे. ह्या नाग कुव्यांत पहिल्या १२ पाय्ऱ्या उतरून गेलें ह्मणजे जें पाणी लागतें तें अगदीं गढूळ आणि घाणेरें आहे. त्या पाण्याखालीं एक लोखंडी पत्रा आहे. तो पत्रा काय तो खालच्या खऱ्या विहिरीचें द्वार. येथें पूर्वेच्या आंगच्या भिंतीवर एक लेख आहे. त्यांत संवत १८२५ सांत एका राजानें ह्या विहिरीचा जीर्णोद्धार केला असें लिहिलें आहे. येथें ईश्वराच्या लिंगावर नागाची फडी आहे त्याला नागेश्वर म्हणतात. श्रावण वद्य ९–१० च्या दिवशीं दरसाल येथें

मोठा मेळा जमतो. पहिल्या दिवशीं बायकांची यात्रा आणि दुसऱ्या दिवशीं फक्त पुरुष. लोभ करावा हे विनंती.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

---

## विश्वेश्वर मोहोला.

मु० श्री वाराणशी ता०
जानेवारी सन १८७२.

ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—

वि० वि०. म्यां एका पूर्वींच्या पत्रीं आपणाकडे काशीविश्वेश्वराच्या देवळाची थोडीशी माहिती लिहून पाठविली होती ती आपण कृपा करून छापली. आज तेथील विशेष हकीकत लिहितों.

विश्वेश्वराच्या देवालयाच्या घुमटास आणि वरील शिखरास दगडी इमारतीवरून तांब्याचे पत्रे मारून वर सोन्याच्या वरखाचा मुलामा केला आहे. ह्याचा सर्व खर्च राजा रणजितसिंह जो लाहोरचा राजा होऊन गेला त्यानें केला आहे. विश्वेश्वरापुढें सुमारें नऊ घांटा टांगलेल्या आहेत. त्यांपैकीं एक आहे तिचें काम पाहण्यासारखें आहे. ही घांट नेपाळच्या राजानें टांगली आहे. ह्या देवळांत उत्तरेच्या अंगास जोतें देऊन एक सोपा बांधलेला आहे. त्यांत पुष्कळ देवता स्थापिल्या आहेत. ह्या सर्व देवता पहिलें जें विश्वेश्वराचें देऊळ होतें आणि जें १७ व्या शतकांत औरंगजेब पादशहानें मोडिलें आणि त्यावर एक मोठी महजीद बांधली त्यांतील मूर्ति आहेत असें सांगतात.

पाहिलें विश्वेश्वराचें देऊळ हल्लींच्या देवळाच्या ईशान्येस होतें आणि तें हल्लींच्या देवळाच्या इमारतीपेक्षां सुमारें पांचपट मोठें असावें असें अनुमान होतें. हल्लींचे देवळाच्या शिखराची उंची सुमारें ५० फूट येईलसें वाटतें. पाहिल्या देवळावर औरंगजेबानें एक मोठी महजीद बांधली आहे. तिचें काम आबडधोबड आहे.

ह्या महजिदींत गेलें तर तेथें पाहिल्या हिंदूच्या देवळाचे खांब पुष्कळ नजरेस पडतात. ह्या महाजिदीस जी सफेती लावलेली आहे ती तर अगदींच घाणेरडी आहे. त्या सफेतीच्या योगानें ती खुलावी तें एकीकडे राहून उलटी ज्यास्त मळकट आणि कंटाळवाणी दिसते. ह्या महाजिदीस एक मोठा दरवाजा बांधलेला आहे, परंतु तो वागता दरवाजा नाहीं. तो हिंदु आणि मुसलमान ह्यांच्या तंट्यामुळें सरकार हुकुमानें बुजवून टाकिला आहे आणि दुसरी एक लहानशी वाट दुसऱ्या बाजूस कोपऱ्यास पाडलेली आहे. ह्या महाजिदीच्या थोरल्या दरवाज्याजवळ एक मोठा अश्वत्थ वृक्ष आहे. त्याचें दर्शन अंतर्गृहीच्या यात्रेच्या वेळीं अवश्य आहे. ह्या महाजिदीच्या खर्चास सरकारी तिजोरींतून भरलेल्या पैशाचें व्याज बरेंच येतें असें कळतें. ह्या महाजिदीच्या आणि हल्लींच्या विश्वेश्वराच्या देवळाच्या मध्यें ज्ञानवापीचा मंडप आहे. ह्या ज्ञानवापींत विश्वेश्वराची नित्य वस्ती आहे असें सांगतात. ह्याची कथा अशी आहे कीं, कोणे एका समयीं वाराणशी क्षेत्रीं १२ वर्षें पर्यंत पाऊस पडला नाहीं आणि पाण्याचें अवर्षण पडलें. तेव्हां एका ऋषीनें शिवाच्या त्रिशुळानें ही विहीर खणिली आणि पाहतो तों तिला पाणी विपूल लागलें. ही गोष्ट शंकरास कळतांच शंकर तेथें आले आणि त्यानीं ऋषीस सांगितलें कीं, आम्ही येथें निरंतर वास करूं. दुसरें असें सांगतात कीं, औरंगजेबानें जेव्हां विश्वेश्वराचें पहिलें देऊळ मोडलें तेव्हां पुजाऱ्यानें विश्वेश्वराचें लिंग उचलून ज्ञानवापींत टाकिलें. ह्या ज्ञानवापीस जो मंडप बांधिला आहे त्याचें काम चांगलें केलें आहे. छताचें काम कळसपाकी आहे. तीन दालनी मंडप आहे. ह्यास खांबांच्या चार ओळी आहेत. त्या सर्व मिळून खांब सुमारें ४० आहेत. हा मंडप बायजाबाई शिंदे ह्यानीं सन १८१८ इसवींत बांधविला.

ह्या मंडपासमीपच एक भला मोठा पाषाणाचा नंदी आहे. तो सुमारें सात फूट उंच आहे. त्या नंदीपासून थोड्याच अंतरावर ने-

पाळच्या राजानें एक नंदिकेश्वराचें देऊळ बांधिलें आहे. ह्या मंडपाच्या ईशान्येस महाजिदीपासून सुमारें १५० याडींवर आदि विश्वेश्वराचें मंदीर आहे. हें देऊळ फार जुनाट आहे. त्याचा घुमट अगदीं मोडकळीस आलेला आहे. ह्या देवळाच्या खालच्या भागाचा जीर्णोद्धार एक गणेशदास तंबाकूवाला यानें केला आहे. आदि विश्वेश्वराच्या देवळाच्या पूर्वेस थोड्याच अंतरावर काशी कर्वत नामें कूप आहे. ह्या कूपास वरून चालीप्रमाणें तोंड असून एक आंत उतरण्यास वाट आहे, परंतु ती आतां दर सोमवारीं मात्र कांहीं वेळ खुली असते. ह्याचें कारण असें सांगतात कीं, कांहीं वर्षांपूर्वीं एका बैराग्यानें येथें शिवार्चन करून प्रसिद्धपणें जळसमाधि घेतली. तेव्हां पासून सरकारानें ती वाट अगदीं बुजवून टाकिली होती. पुढें तेथील पुजाऱ्यानें अर्ज करून पुनः तशी गोष्ट न होऊं देण्याबद्दल मुचलका देऊन दर सोमवारीं अमुक वेळ तो रस्ता यात्रेकऱ्याकरितां खुला ठेवावा असा हुकूम आणिला. ह्या भागांत पुष्कळ देवळें ज्यांची कारागिरी उत्कृष्ट अशीं आहेत.

विश्वेश्वराच्या देवळापासून थोडेंसें पुढें गेलें म्हणजे शनीचें देऊळ लागतें. तेथून पन्नास पाऊणशें कदम पुढें गेलें म्हणजे अन्नपूर्णेचें मंदीर लागतें. ह्या देवीचें काम सर्वांस भोजन घालण्याचें आहे. येथें असा चमत्कार सांगतात कीं, कोणत्याही प्रकारचा तडीतापडी अतिथी उपोषित राहात नाहीं. सर्वांस ह्या अन्नपूर्णेच्या कृपेनें भोजन मिळतें. येथें भिजवून मूठ मूठ डाळ वाटण्याची चाल फार आहे. ह्याबद्दल कथा अशी सांगतात कीं, जेव्हां प्रथमतः श्री अन्नपूर्णा काशीवासास आली तेव्हां श्री० विश्वेश्वरानीं तिला माझ्या नगरींत कोणीं उपोषित राहूं नये अशी तजवीज तूं ठेव म्हणून सांगितलें. तेव्हां इतक्या लोकांस अन्न पाणी माझ्या एकटीच्यानें कसें पुरवेल अशी काळजी ती करीत बसली. तेव्हां गंगेनें येऊन तिला सांगितलें कीं, तूं सर्वांस मूठ मूठ डाळ दे म्हणजे मी त्यांस लोटा लोटा पाणी देईन.

अशा प्रकारें दोघींनीं हीं दोन कामें वाटून घेतलीं. ह्यामुळें येथें पुष्कळ श्रीमंताच्या बायका भिजलेली डाळ मूठ मूठ वाटितात. व ह्याच कारणास्तव एडिटरराव मला वाटतें कीं, चैत्रांत हळदी कुंकाच्या समारंभास भिजविलेल्या डाळीनें आपल्या तिकडे सुवासिनींच्या ओंट्या भरतात. येथें एकएकास इतकी डाळ मिळते कीं, दररोज ती वाळवून त्यानें विकली म्हणजे त्याची आठ बारा आण्याची रोजी होते. असो, अन्नपूर्णेच्या कृपेचें फळ अन्नपूर्णेचें मंदीर सुमारें १५० वर्षांपूर्वीं पुण्यांतील पेशव्यांपैकीं एकानें बांधिलें अशी खबर मिळते. ह्या देवीस जडिताचे अलंकार वगैरे पुष्कळ आहेत.

ह्या देवळांत एका कोपऱ्यास सूर्यनारायणाची मूर्त स्थापिली आहे व दुसऱ्या कोपऱ्यास गौरी शंकराची मूर्त आहे. तिसऱ्या कोपऱ्यास हनुमान आणि चवथ्या कोपऱ्यास गणपती असे आहेत. अन्नपूर्णेच्या देवळावरून साक्षी विनायकास जाऊं लागलें ह्मणजे धुंडिराज विनायक एके कोनाड्यांत बसविलेले आहेत त्यांचें दर्शन होतें. साक्षी विनायकाचें देऊळ कोणीं दक्षिणेकडील मराठ्यानें बांधलें आहे असें समजतें.

शनीच्या देवळाच्या दक्षिणेस शुक्रेश्वराचें देवालय आहे. सर्व यात्रा झाली म्हणजे साक्षी विनायकाचें दर्शन घेऊन त्यास साक्षी ठेवून नंतर काशींतून यात्रेकरू लोक जातात. लोभ असावा हे विनंती.

एडिटराचा मित्र एक
फिरस्ता.

---

☛ Presented to "THE PRIVATE FREE LIBRARY-Dharmapuri, Wai" by K. V. Pandit. in memory of his uncle the late Mr. Bapusaheb Pandit.

# बंगाली टोला.

मुक्काम श्री वाराणसी
ता० जानेवारी १८७२.

ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—

वि० वि०. गेल्या पत्रीं साक्षी विनायकापर्यंत आम्ही पल्ला पोंचविला. व आतां यात्रा समाप्त झाली. परंतु एाडटरराव आम्हीं मध्येंच खंड केला होता. आणि बंगाली टोला वगैरे प्रदेशाची माहिती लिहिण्याचें काम तसेंच सोडून दिलें होतें तें आतां लिहितों. त्याला कृपा करून आपल्या सुंदर पत्रीं जागा द्या.

विश्वेश्वराच्या देवालयावरून साक्षीविनायकाच्या रस्त्यानें दक्षिणेस पुढें गेलें म्हणजे दशाश्वमेध महल्ला लागतो. आणि त्याच्या दक्षिणेस बंगाली टोला आहे. ह्या भागास बंगाली टोला म्हणण्याचें कारण असें आहे कीं, येथें बंगाली लोकांचीच वस्ती विशेष आहे. बंगाल्यांतून जे शेट सावकार लोक वार्धक्य दशेंत काशीवासास येत गेले ते बहुधा येथेंच राहिले. त्यांच्या नंतर सरकारी कामाच्या संबंधानें अगर दुसऱ्या कांहीं निमित्तानें जे दुसरे बंगाली लोक आले ते तेथेंच राहूं लागले. आतां ह्या महल्यांत दुसरे कोणी लोक राहात नाहींत अगर काशीच्या दुसऱ्या महल्यांतून बंगाली लोक राहात नाहींत असें जरी सर्वांशीं वाचकांनीं समजूं नये तरी ह्याच प्रदेशांत बंगाली श्रीमान लोकांचा मुख्य भरणा आहे असें समजण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. ह्या लोकांमध्यें इंग्रजी भाषेंत प्रवीण पुष्कळ लोक आहेत. व ह्या क्षेत्रीं सुधारणुकेच्या ज्या गोष्टींचे विचार होतात त्यांच्यामध्यें हे लोक पुढारी असतात. ह्या बंगाली लोकांच्या बायकांस व मुलींस लिहितां वाचतां बरेंच येत असतें. असें येथील सब् अ० सर्जन हे बंगाली आहेत ह्यांच्या भाषणावरून कळलें. गरीब जे बंगाली लोक काशिवासास आले आहेत, ते सर्व कोहींना कांहीं तरी व्यापार

करितात. इतर हिंदूंप्रमाणें भिक्षा मागणारे लोक ह्यांच्यामध्यें आढळत नाहींत. ह्यांच्यामध्यें जे ब्राम्हण आहेत ते सर्व शास्त्राध्ययन करणारे आहेत. वेदाचें अध्ययन करणारे लोक अगदींच नाहींत म्हटलें तरी चालेल. आपल्या तिकडे जसे पारशी लोक तसे इकडे हे बंगाली लोक आहेत.

ह्या महल्यांतही देवालयांची गर्दी जशी विश्वेश्वरगंज महल्यांत आहे तशीच आहे. परंतु येथें मुख्य देव म्हटला म्हणजे केदारेश्वर अथवा केदारनाथ हा आहे. हें स्थान फार जुनाट आहे असें सांगतात. केदारनाथाचें मंदीर गंगेच्या तटाकीं आहे. त्याच्या पूर्वेस गंगाप्रवाहापर्यंत एक पसंत घाट बांधिला आहे. त्याला केदारघाट अशी संज्ञा आहे. हें केदारेश्वराचें मुख्य देवालय असून शिवाय चार कोपऱ्यांस चार देवालयें आहेत. ह्या देवालयाचा दरवाजा पूर्वाभिमुख आहे. ह्या दरवाजाबाहेर दोन पाषाणाचे द्वारपाळ उभे आहेत. त्या प्रत्येकास चार चार हात आहेत. ह्या मूर्ति सुबक आहेत. ह्यांच्या चार हातांपैकीं एकांत त्रिशूळ, दुसऱ्यांत दंड आणि तिसऱ्यांत कमल पुष्प अशीं आयुधें आहेत. चवथा हात अभयसूचक मुद्रेप्रमाणें रिकामा आहे. केदारनाथाचें दर्शन नेमलेल्या वेळीं होतें. मध्यंतरी मंदीर लावलेलें असतें. मध्यें चौकांत वर सांगितलेलीं पांच देवालयें असून चारी बाजूनीं चार सोपे आहेत. त्यांत पुष्कळ देव आहेत.

केदारेश्वराच्या मुख्य देवालयांत दररोज संध्याकाळीं टांगलेले पितळेचे ६७ कंदील लावितात. केदार ही जागा हिमालयांत आहे, आणि तेथील जो स्वामी तो केदारेश्वर. हिमालयांत बद्रिनारायणाचे आलीकडे बद्रिकेदाराचें स्थान आहे. कोणी ब्राम्हण केदार नांवाचा वसिष्ट ऋषीबरोबर हिमालयांत बद्रिकेदारास गेला. आणि तेथें त्यानें मोठें तप केलें. पुढें तो मरण पावला. तेव्हां शंकरानीं आपल्या ज्योतींत मिळवून घेतला. पुढें तो ब्राम्हण वसिष्ट ऋषीच्या स्वप्नांत गेला आणि म्हणाला कीं,

आपण जें सांगाल तें मी करीन. तेव्हां वसिष्टानीं त्यास निरंतर काशीस असावें म्हणून सांगितल्यावरून तो साक्षात शिवच येथें येऊन राहिला. अशी त्या केदारेश्वराची कथा आहे.

येथें लक्ष्मीनारायण, भैरवनाथ, गणपति आणि अन्नपूर्णा ह्यांचींही देवळें आहेत. गंगेवर जाण्याच्या घाटाच्या अंगास जी केदारेश्वराच्या देवळाची भिंत आहे तिच्या बाहेरच्या अंगास हिंदी आणि बंगाली लीपींत केदारचरित्र कोरलेल्या अक्षरांनीं लिहिलें आहे. त्या देवळाच्या बाहेरील अवारांत भिकाऱ्यांची मनस्वी गर्दी असते. घाटावरून खालीं आलें म्हणजे तळाशीं एक चौकोनी विहीर आहे, तिला गौरीकुंड असें नांव आहे. ह्या कुंडाच्या उदकाच्या सेवनानें ज्वराचा परिहार होतो असें सांगितलें आहे.

केदारेश्वराच्या देवळाच्या पश्चिमेस सुमारें पाव मैलावर मानसरोवर नामें कुंड आहे. त्या सभोंवती सुमारें ५० लहान मोठीं देवालयें आहेत. येथें एक रामचंद्राचें देवालय मोठें आहे. हें मानसरोवराचें कुंड राजा मानसिंगानें बांधिलें. येथें एकंदर मूर्तींचा मोजून अंदाज केला तर हजारांपेक्षां कमी भरणार नाहीं. मानसरोवराच्या पूर्वद्वारीं बाळकृष्णाचें मंदीर आहे. मूर्त रागांत असून हातांत लोण्याचा गोळा वगैरे आहे. जशी बायका आपल्या तिकडे पितळेच्या बाळकृष्णाची पूजा करतात त्याप्रमाणें येथील बाळकृष्णाची मूर्त आहे.

येथेंच नैऋत्येस तिळभांडेश्वराचें देऊळ आहे. हें स्थान स्वयंभू आहे असें म्हणतात. तरी पिंडीचा घेर सुमारें १५ फूट असून उंची ४॥ फूट आहे. हा देव रोज एकेक तिळ वाढतो. तिळभांडेश्वराच्या देवळाचा चौत्रा मनस्वी उंच केला आहे. येथें कार्तिकस्वामीचें देऊळ आहे. येथें एक शिवाची पाषाणाची मूर्ति फारच सुरेख केलेली आहे. तिचें ध्यान मोठ्या विचारांत निमग्न असावें

अशा प्रकारचें आहे, आणि जवळ कार्तिकस्वामी पुस्तक वाचीत आहेत.

तिळभांडेश्वराच्या खालच्या अंगास एक मोठा अश्वत्थाचा वृक्ष आहे, तेथें एक वीरभद्राची छिन्न भिन्न झालेली मूर्त आहे. ही मूर्त औरंगजेब पादशहानें फोडिली म्हणून सांगतात. येथून थोड्याच अंतरावर एक लिंबाचें झाड आहे, त्याच्या खालीं अष्टभुजा देवीची मूर्त असून शिवाय नव दुर्गांच्या नऊ मूर्ते आहेत.

केदारनाथाच्या देवळाकडून दशाश्वमेधाकडे येऊं लागलें तर वाटेंत दुलरेश्वराचें देऊळ आहे. हें देऊळ सातु बाबू या बंगाल्यानें सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं बांधिलें.

ह्या मोहोल्यांत पुष्कळ ठिकाणीं ज्या मूर्ति आहेत त्या पुष्कळ जुन्या काळच्या आहेत खऱ्या, परंतु तेणेंकरून ह्या मोहोल्यांत जुन्या काळीं हल्लींप्रमाणें दाट वस्ती नव्हती म्हणून ह्या सर्व मूर्ति दुसऱ्या ठिकाणाहून आणिल्या आणि स्थापिल्या असें अनुमान करण्यास कांहीं बाध येतो असें नाहीं. लोभ असावा ही विनंती.

एडिटराचा मित्र एक
फिरस्ता.

---

## दुर्गा देवी.

मु० श्री वाराणशी
ता० जानेवारी १८७२.

**ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—**

वि० वि०. वाराणशीच्या दक्षिणेस दुर्गा देवीचें मोठें देवालय आहे. हें कोणी साताऱ्च्या राजाची राणी भवानीबाई साहेब ह्यानीं बांधिविलें असें समजतें. ह्या देवीच्या जवळ एक दुर्गाकुंड अथवा दुर्गातीर्थ नामें सरोवर आहे. ह्या तळ्याला चारी अंगानीं घाट आहेत, आणि ह्यांत पाणी विपूळ आहे. ह्या

दुर्गेस नित्य मांसाचा नैवेद्य आहे. असमंतात ५।५० कोशांतील लोक येथें हमेषा येत असतात. यात्रेकरी तर दुर्गादेवीच्या दर्शनास गौबाईच्या दर्शनास जातात तेव्हां जातात. ह्या देवीच्या देवळांत दर मंगळवारीं बरीच गर्दी होते, आणि श्रावण्या मंगळवारीं तर फारच मोठे मेळे जमतात.

ह्या दुर्गेच्या देवळाच्या जवळच्या मोहोल्यांत हजारों माकडें आहेत. ह्यांस यात्रेकरी लोक फुटाणे घालितात. हीं माकडें ह्या मोहोल्यांतील घरांच्या कवलारास मनस्वी उपद्रव करितात तरी त्यांस कोणीं हात लावीत नाहीं. त्या माकडांत कांहीं मोठी माकडें आहेत तीं फार भयंकर आहेत. डोक्यावरील पागोटें अगर टोपी वरच्यावर उचलून नेतात आणि पांतस्थास वेड्यासारखें करितात.

ह्या दुर्गादेवीची कथा अशी आहे कीं, कोणे एका समयीं रुरुचा पुत्र दुर्ग हा तपास बसला. ह्यानें तप इतकें मोठें केलें कीं, त्याला त्यापासून इंद्रपद प्राप्त झालें. नंतर तो देव ब्राम्हण गाई वगैरेंचा फार छळ करूं लागला. त्यानें चोहींकडे अन्याय व जुलूम चालविला. ह्या योगें सर्व देव त्रासून गेले आणि इंद्र, वरुण, वायु प्रभृति सर्व महादेवास शरण गेले आणि दुर्गाच्या त्रासापासून मुक्त करण्याबद्दल त्याची प्रार्थना केली. नंतर शंकर प्रसन्न झाले आणि गौरी जी त्यांची पत्नी तिला दुर्गाचा वध करून यावें ह्मणून आज्ञा केली. तेव्हां गौरीनें आपली जी तमोगुण प्रकृति महाकाली तिला दुर्ग वधार्थ पाठविलें. ती दुर्गाच्या नगरावर गेली. तेव्हां दुर्गानें आपले कांहीं आप्त सैन्य बरोबर देऊन महाकालीशीं युद्धास पाठविलें, आणि त्यांस अशी ताकीद केली कीं, महाकालीस पकडून आणावें. नंतर त्या दुर्ग सेनेनें महाकालीस वेढा घालून पकडलें आणि तिला दुर्गाकडे चालविलें. तेव्हां महाकालीस महाक्रोध आला आणि तिच्या मुखावाटें प्रचंड अग्नी उद्भवला. त्या अग्नीनें ती सर्व राक्षस सेना दग्ध झा-

ली. ही गोष्ट दुर्गास समजली तेव्हां त्यानें नवी फौज पाठविली, परंतु त्याचीही दशा पहिल्या सेनेच्या दशेप्रमाणें झाली. ही बातमी दुर्गास कळली तेव्हां त्यास अत्यंत क्रोध आला आणि त्यानें लाखो फौज महाकालीवर पाठविली. तेव्हां महाकाली आकाश मार्गें पळून गौरी-कडे गेली. इकडे दुर्गसेनाही तिच्या मागें तिचा पाठलाग करीत गेली. नंतर ते सर्व परत विंध्याचल पर्वतावर येऊन राहिले. झालेलें सर्व वृत्त महाकालीच्या मुखें गौरीनें श्रवण केल्यावर तिनें स्वतः विलक्षण रूप धारण केलें. तें असें कीं, स्वरूप अत्यंत लावण्य, परंतु अत्यंत विशाल. हात सहस्त्र पृथ्वीपासून आकाशा पावेतों पोहोंचणारे. अशा प्रकारें गौरी युद्धास गेली. गौरीचें स्वरूप अत्यंत लावण्य पाहून दुर्गानें आपल्या सर्व सेनेस असा हुकूम केला कीं, गौरीस पाहिजे त्यांनीं वरावी आणि आपली बायको करावी. असा हुकूम झाल्यावर मग काय विचारतां एडिटर बाबा, ज्यानें त्यानें आपला जीव अर्पण करण्याचा निश्चय केला. नंतर ते सर्वजण अत्यंत आवेशानें गौरीवर चालून गेले. त्या वेळीं सर्व अवनी थरथर कांपली. गौरीनें इकडे आपल्या संरक्षणार्थ लाखो देवसेना उत्पन्न केली. आणि मग देव आणि दैत्य ह्यांचें तुंबळ युद्ध झालें. युद्ध संग्रामांत कोट्यावधि राक्षस मारले गेले. असा विलक्षण कहरी प्रसंग गुदरला तेव्हां दुर्ग फारच तळमळला आणि मोठ्या क्रोधानें जातीनें युद्धास आला. त्यानें हातांत त्रिशूळ, खड्ग, हीं आयुधें धारण केलीं होतीं. पाठीशीं भाता बाणांनीं भरलेला आणि धनुष्येंही होतीं. इतक्या-सहीत दुर्गानें संग्राम भूमीवर येऊन गौरीस एक जबरदस्त प्रहार केला. तेव्हां तिला मूर्छना आली आणि ती बेशुद्ध पडली. कांहीं काळानें सावध झाल्यावर तिनें सर्व देवांस पुनः युद्ध संग्राम माजविण्यास आज्ञा केली. असा हा युद्ध प्रसंग चालला असतां दुर्गानें गौरीस गांठलें आणि मग उभयतांच्या मध्यें अंतरिक्षीं आणि पृथ्वीवर फारच तुंबळ युद्ध झालें. जेव्हां उभयतां पृथ्वीवर येऊन युद्ध करूं लागलीं तेव्हां दुर्गानें एक पर्वत गौरीचे आंगावर टा-

किला. तो गौरीनें आपल्या शापरूप शब्द वज्रानें चूर केला. नंतर दुसरा पहिल्यापेक्षां मोठा पर्वत टाकिला. त्यालाही गौरीनें आपल्या वज्रानें चुरून टाकिलें, आणि आपल्या हातांतील शस्त्राचा प्रहार राक्षसावर करून त्याला धरणीवर असुर-हित करून पाडिला. ह्याप्रमाणें दुर्गाचा वध झाल्यानंतर गौरीनें त्याचें शीर छेदून घेतलें आणि सर्व शत्रूंचें निर्दळण केलें. अशा प्रकारें गौरीनें विजय संपादिल्यावर सर्व देवांत अत्यानंद झाला. आणि ते सर्वजण तिचा स्तव करूं लागले. गंधर्व, अप्सरादि नृत्य गायन करूं लागलीं. आणि तिन्ही लोकांत एकच आनंद झाला. ही कथा जो कोणीं श्रवण करील अथवा पठण करील त्यास कोणतेंही संकट प्राप्त होणार नाहीं, असा या कथेस गौरीनें वर दिला, आणि त्या दिवसापासून दुर्गा हें नांव आपण धारण केलें. ह्याप्रमाणें कृत्य करून दुर्गा कैलासास अंतर्धान पावली.

ह्या दुर्गेच्या देवालयाचा दरवाजा पश्चिमाभिमुख आहे. त्याच अंगानें थोरली सडक आशी वर गेली आहे. देवालयासमोर सडकेच्या आलीकडे एक नौबतखाना आहे. तेथें दररोज वेळच्या वेळीं चौघडा झडत असतो. देवीच्या देवळापुढें नौबतखान्यासमोर दोन लहान लहान देवळें असून त्यांच्यामध्यें दोन दगडी खांब आहेत. त्यांपैकीं दहा फुटी उंचीच्या खांबाची खुर्ची एक फूट तळाशीं असून माथ्यावर एक दगडी सिंह आहे. दुसरा जो आहे तो २ फूट उंच आहे आणि ह्यावर देवीस जो बळी द्यावयास आणिलेला पशुभाग असतो तो मांडितात. ह्या खांबाजवळ एक लांकडी खांब आहे, त्याला जो पशू अर्पण करावयाचा असतो तो बांधितात.

देवद्वारांतून आंत गेल्यावर मंडपांत प्रथमतः दोन सिंह दगडाचे दृष्टीस पडतात. त्यांचीं तोंडें देवीच्या देवळाच्या आंतील द्वाराकडे परस्परांशीं समोर आहेत. ह्या दोन्ही सिंहाच्या पलीकडे एक गणपतीचें आणि दुसरें महादेवाचें अशीं दोन देवळें आहेत. महादेवाची शाळुंका संगमरवरी दगडाची असून पुढें

नंदीही त्याच पाषाणाचा आहे. देवीचे देवळांत चोहों बाजूंनीं मोठाले सोपे आहेत, त्यांतून बैरागी वगैरे लोक राहतात. ह्यापैकीं मागल्या सोप्यावर बागेश्वरीचें स्थान आहे. ह्या देवीचा मुखवटा सोन्याचा आहे. ह्या बागेश्वरीपासून थोड्याच अंतरावर एक त्रिमित्त पुतळी आहे. ह्या देवळाचा सभामंडप एके पलटणींतील सुभेदाराने थोड्या वर्षांपूर्वीं बांधिला आहे. ह्या देवळांत एक मोठी घांट आहे. ती मिरजापुरास सुमारें ४० वर्षांपूर्वीं एक गोरा माजिस्त्रेट होता त्यानें दिली असें सांगतात.

ह्या देवालयाचें काम फारच नक्षीदार आहे. कमानी आंतील आणि बाहेरील अशा दुहेरी आहेत. बाहेरील कमानीवरून पक्षावर बसलेले आणि हातांत विणा घेतलेले असे दगडी पुतळे बसविलेले आहेत आणि आंतील कमानीवरून दुर्गा देवीच्या मूर्ति बसविल्या आहेत. देवळाच्या पुढील अंगास बाहेरील कमानीवर जे पुतळे आहेत त्यांचीं वाहनें सिंह आहेत.

ह्या देवळाच्या बाहेरच्या अंगास एक मोठा तलाव आहे. हा तलाव फारच मोठा आहे. परंतु ह्याचें विशेष महात्म्य नाहीं. तत्रापि त्या महल्यांतील लोकांस त्यांतील पाण्याचा पुष्कळ उपयोग पडतो.

ह्या दुर्गाकुंडापासून गंगेच्या वाटेवर थोड्याच अंतरावर पूर्वेस कुरुक्षेत्र तलाव आहे. हा तलाव चौंही आंगांनीं बांधून काढिला आहे. हा ज्या राणीनें दुर्गेचें देवालय बांधिलें त्याच भवानी बाईनें बांधिला असें सांगतात. सूर्यग्रहण पर्वणींत ह्या तलावांतील स्नानाचें मोठें फल आहे.

कुरुक्षेत्र तलावाच्या वायव्येस थोड्या अंतरावर लोलारिक कुवा आहे. हा कुवा जोडकुवा आहे. ह्मणजे खालीं पाण्याचा तळ एक असून वर दोन तोंडें दोन विहिरींसारखीं आहेत. ह्या दोन्ही तोंडांपैकीं पूर्वेकडील तोंड वाटोळें आहे. आणि पश्चिमेकडील तोंड समान्तरभुज चौकोनाकार आहे. ह्या चौकोनी तोंडास तीन

बाजूंनीं पायऱ्या आहेत. त्या उतरून खालीं गेलें म्हणजे तळचें पाणी मधील मोठ्या भव्य कमानींतून इकडून तिकडे जातें तें मोठ्या मौजेचें दिसतें. हा कुवा अहिल्याबाई राणी, बहारचा राजा आणि अमृतराव साहेब पेशवे या त्रिवर्गांनीं वेगवेगळ्या काळीं बांधिला. येथे एक सूर्यनारायणाचें दगडी यंत्र आहे. त्याची पूजा करण्यास दर रविवारीं गर्दी जमते. आतां येथून पुढें दुसरा मोहोल्ला लागला त्याचें वर्णन पुढील पत्रीं करूं. लोभ असावा हे विनंती.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

---

## व्यासकाशी व रामनगर.

मुक्काम श्री वाराणशी
ता० जानेवारी १८७२.

**ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—**

वि० वि०. आज रोजीं रामनगराकडील हकीकत थोडीशी लिहितों. रामनगर हें गंगापार आहे. येथील राजाचें संस्थान मोठें टुमदार आहे. रामनगरास यात्रेकरू लोक काशींतून व्यासाच्या दर्शनास जातात. ह्या व्यासकाशीचें वर्णन मागाहून करूं. हल्लीं रामनगरच्या राजानें जें मंदीर बांधिलें आहे त्याचें येथें थोडेंसें वर्णन करितों. रामनगरच्या किल्ल्यापासून सुमारें एक मैलावर रामनगरच्या राजानें बांधिलेलें श्री रामचंद्राचें मंदीर आहे. ह्याच्या पश्चिमेस एक मोठा तलाव आहे. हें राममंदीर हल्लींचे जे राजे साहेब आहेत त्यांचे वडील राजे चेतसिंग होते त्यानीं आरंभिलें. व त्यांच्या मागें त्यांच्या चिरंजिवानीं संपविलें. हें देवालय खालच्या जोत्याच्या बेद्रीपासून शिखरापर्यंत १०० फूट उंच आहे. ह्याच्या चारी बाजू तळापासून सुमारें ३५–४० फूट उंच पावेतों

कोरीव चित्रांनीं आणि वेलानीं भरलेल्या आहेत. कित्येक पुतळे भंगलेले आहेत. परंतु बाकीचे सर्व दुरस्त आहेत. प्रत्येक बाजूस पांच पांच ओळी असून दर दर ओळींत सहा सहा चित्रें आहेत. ह्याप्रमाणें चारी बाजूंत मिळून एकंदर १२० चित्रें आहेत. येथें पैसा मुबलग खर्च करून जितके कुशळ कारागीर हल्लींच्या दिवसांत हिंदुस्थानांत मिळाले तितके येथें कामास लावले असावे असें अनुमान होतें. काशीस आल्यावर हें राममंदीर यात्रेकऱ्यानें पाहिल्या खेरीज राहूं नये. सगळ्याच्या खालच्या ओळींत हत्तीचीं चित्रें आहेत. हत्तीवर सिंह आणि सिंहावर देवाचे दुसरे अवतार ह्याप्रमाणें चित्रें कोरलेलीं आहेत.

येथें गंगा, यमुना आणि सरस्वती ह्या तीन नद्यांच्या वेग वेगळ्या कोनाड्यांतून मूर्ति बसविलेल्या आहेत. त्याप्रमाणेंच दोन गोपींसह श्री कृष्णाची मूर्त आहे. इंद्र, ब्रम्हदेव, विष्णु आणि शंकर ह्यांच्या मूर्तिंही येथें कोनाड्यांतून स्थापिल्या आहेत. त्याप्रमाणेंच कुबेर, भैरवनाथ, रामचंद्र, सीता, गणपती, बलीराम, ह्यांच्या मूर्ति आहेत. त्याप्रमाणेंच वायू, सूर्य, अग्नि, आणि चंद्रमा ह्यांच्याही मूर्तिं आहेत. शिवाय नारद, तुंबर, गजेंद्रमोक्ष, आणि सहस्रार्जून ह्यांच्या मूर्तिं आहेत. दक्षिणेकडील वरल्या ओळींत मध्यभागीं दुर्गादेवीची मूर्ति आहे. पूर्वेस वरल्या ओळींत मध्यभागीं महाकाली आहे. उत्तरेच्या भिंतीस कोनाड्यांत श्री कृष्णानीं गोवर्धन पर्वत उचलून जी क्रीडा केली तो सर्व प्रकार आहे. ह्या देवालयाच्या चारी कोपऱ्यांस वरच्या आंगास एकावर एक अशीं सूर्यांचीं दोन दोन तोंडें करून बसविलेलीं आहेत. त्यांस मुलामा केलेला आहे.

घुमटाच्या चारी कोपऱ्यांस सूर्याचीं तोंडें एकावर एक अशीं दर कोपऱ्यास दोन दोन प्रमाणें असून त्यांच्या सभोंवतीं रश्मि प्रभा दाखविली आहे. ह्या तोंडांस सोन्याचा मुलामा केला आहे. घुमटाच्या शिखरावर एक सोनेरी मुलाम्याचें दुर्गेचें मुख करून बस-

विलें आहे. खालीं सभामंडपाच्या चौथऱ्यावर तिन्ही दरवाज्यांकडे तोंडें करून तीन मूर्ति संगमरवरी दगडाच्या करून बसविल्या आहेत. दक्षिणेकडील दरवाज्यासमोर नंदिकेश्वर, उत्तरेकडील दरवाज्यासमोर गरूड आणि मुख्य जो वागता दरवाजा त्या समोर सिंह असे आहेत. ह्या दरवाज्याच्या झडपा पितळी पत्र्यानें मढविलेल्या आहेत. ह्या देवालयाच्या आंतील देवालयांत दरवाज्या समोर संगमरवरी दगडाची दुर्गेची मूर्त आहे. (ह्या देवालयाच्या आंतील देवालयांत दरवाज्या समोर संगमरवरी दगडाची दुर्गेची मूर्त आहे.) ह्या दुर्गेच्या शेजारच्या डाव्या कोनाड्यांत राधा कृष्णाची मूर्त आहे. आणि उजव्या कोनाड्यांत पंचमुखी शंकराची मूर्त आहे. ह्या देवालयानजीक एक बाग असून आंत तलाव आहे. तो राजा चेतसिंग यांणीं बांधिला म्हणून सांगतात. ह्या तलावास चोहोंकडून घाट बांधिला आहे. जे यात्रेकरी व्यास काशींस येतात ते सर्व बहुत करून येथें स्नानें करितात.

रामनगरास यात्रेस जाण्याबद्दल अशी कथा सांगतात कीं, एका समयीं वेदव्यास वाराणशीस येण्याकरितां निघाले. आणि येतां येतां रामनगरापाशीं आले तेव्हां त्यांस ती जागा फारच आवडली आणि ते तेथेंच राहिले. नंतर त्या जागीं जो कोणीं यात्रेस येईल त्यास मुक्ती प्राप्त होईल असा वर त्यांनीं त्या क्षेत्रास दिला. तेव्हां शंकरास राग आला. आणि जो कोणीं व्यास काशींत मरण पावेल त्यास पुढल्या जन्मीं गर्धभयोनी प्राप्त होईल असा त्यानीं शाप दिला. नंतर वेद व्यासानीं रामनगरांत एक तीर्थ निर्माण केलें. आणि माघ महिन्यांत व विशेषें करून त्या महिन्याच्या शुक्रवारीं आणि सोमवारीं जो कोणीं त्या तीर्थांत स्नान करील त्यास तो व्यासकाशींत मरण्यापासून जी गर्धभयोनी प्राप्त होणार ती व्हावयाची नाहीं. असा उशाप त्यानीं दिला.

रामनगरास जो राजाचा किल्ला आहे त्यांत कोटाच्या भिंतीवर

वेदव्यासाचें देऊळ आहे. किल्ला गंगातटाकींच आहे. त्यामुळें गंगेच्या तटावरून चढून वेदव्यासाच्या देवळांत रस्ता जातो. हा घाट चढूं लागलें म्हणजे डाव्या हातास संगमरवरी दगडाची गंगेची मूर्त कोनाड्यांत बसविलेली आहे तिचें दर्शन होतें. ही मूर्ति चतुर्भुज आहे त्यापैकीं दोन हस्त वरद आणि अभय आहेत. तिसऱ्या हातांत कमलपुष्प व चवथ्या हातांत पानपात्र अशीं आहेत. हा घाट चढून गेलें म्हणजे वर किल्याच्या भिंतीसच वेदव्यासाच्या देवळाचा दरवाजा लागतो. त्यांतून आंत गेल्यावर एक महादेवाचें मंदीर दृष्टीस पडतें. हेंच काय तें वेदव्यासाचें देऊळ.

पंचक्रोशीची यात्रा अवश्य केली पाहिजे. अशी ह्मण आहे कीं, घडे काशी पण न घडे पंचक्रोशी. पंचक्रोशीची यात्रा म्हणजे प्रदक्षिणेची यात्रा आहे. ह्या पंचक्रोशीचा रस्ता राणी भवानी बाई साहेब यानीं सुमारें १०० वर्षांपूर्वी नीट बांधिला. व हल्लींही त्याची दुरुस्ती बरीच आहे. ही प्रदक्षिणा पांच पन्नास यात्रेकरी एकत्र मिळून करितात. वाटेनें रावापासून रंकापावेतों अनवाणी चालवें लागतें. पान सुपारि खातां कामानये. सोवळें असावें. आपल्या डाव्या अंगास थुंकी वगैरे टाकावी, असे अनेक नियम पाळावे लागतात. ही यात्रा क्षेत्रस्थानें संवत्सरांतून दोनदां करावी. व यात्रेकऱ्यानें तर एकदां केलीच पाहिजे असें सांगितलें आहे. जें कांहीं पातक काशी क्षेत्रीं घडतें त्या सगळ्याचें मोचन पंचक्रोशीच्या यात्रेनें होतें.

मणिकर्णिका घाटापासून पंचक्रोशीच्या प्रदक्षिणेस आरंभ होतो. पहिल्यानें यात्रेकरी मणिकर्णिकेचें दर्शन घेऊन निघाला म्हणजे गंगेच्या कांठाकांठानें आशी संगमावर जातो. आणि जवळच्या जगन्नाथाचें दर्शन घेऊन पहिला मुक्काम बहुशा खांडव्यास करितो. हें गांव प्रदक्षिणेच्या वाटेवर मणिकर्णिकेपासून सुमारें सहा मैल आहे. दुसरा मुक्काम तेथून पुढें सहा मैलांवर धूपचंडीस

करतो. तेथें श्राद्धादिक कृत्य करून तिसरे दिवशीं प्रातःकाळीं उठून तेथून पुढें सुमारें १४ मैलांवर रामेश्वर आहे तेथें मुक्कामास येतो. तेथील यात्रा संपल्यावर चवथे दिवशीं शिवापुरास आठ मैल चालून येतो. येथें पांच पांडव आणि द्रौपदी ह्यांच्या मूर्ति आहेत. त्यांचें दर्शन वगैरे घेतल्यावर व दुसरी यात्रा संपल्यावर पांचवे दिवशीं सकाळीं उठून सहा मैलांवर कपिलधारा म्हणून तीर्थ आहे तेथें येतो. आणि तेथें श्राद्धादि सर्व झाल्यावर सहावे दिवशीं वारणा संगमावरून पुनः मणिकर्णिकेपाशीं येतो. कपिलधारेपासून मणिकर्णिका ही ६ मैलच आहे. ह्याप्रमाणें एडिटरराव, यात्रेकऱ्यांस ६ दिवसांत पन्नास मैलांची मजल करावी लागते. ह्या पन्नास मैलांपैकीं वरुणेपासून आशीपावेतों ६ मैल गंगेच्या कांठानें चालावें लागतें.

कपिलधारेपासून मणिकर्णिका घाटापावेतों यात्रेकऱ्यास जव पेरावे लागतात. नंतर मणिकर्णिका घाटीं स्नान वगैरे झाल्यावर तेथून साक्षीविनायकास जव टाकीत जातात. आणि तेथून पुनः मणिकर्णिका घाटाजवळ विनायक आहे तेथपर्यंत जव पेरीत पेरीत येतात. तेथून दर्शन घेऊन घरीं जातात. पहिला जो खांडव्याचा मुक्काम करितात म्हणून लिहिलें आहे तेथें कर्दमेश्वर देव आहे. हें देवालय फार जुनाट असून ह्यावर कारागिरीही चांगली केल्याचें आढळतें.

ह्या पंचक्रोशी रस्त्याच्या दोन्ही आंगास वृक्ष लाविले आहेत. त्यांची गर्द छाया रस्त्यावर पडते. बहुत करून हे वृक्ष आंब्याचेच आहेत. ह्या पैकीं कित्येक वृक्ष फार मोठे आहेत. ते असे कीं, त्यांचीं खोडें १२ पासून १७ फूट घेरांचीं आहेत. आतां दुसरी यात्रा पढल्या खेपेस लिहूं. लोभ करावा हे विनंती.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

# पंचक्रोशी.

मुक्काम श्री वाराणसी
ता० जानेवारी १८७२.

**ज्ञानप्रकाशकर्ते महाराजः—**

वि० वि०. वारणासंगमाकडील प्रदेशाची माहिती लिहितों. गंगा आणि वरुणा ह्या दोन नद्यांचा संगम वाराणशीच्या ईशान्य सीमेवर झाला आहे. ह्या वरुणा संगमीं एकवार स्नान ज्या प्राण्याला घडतें तो सकल पातकापासून मुक्त होतो असें सांगितलें आहे. पंच तीर्थींच्या यात्रेंत भागीरथीच्या तटाकीं ज्या पांच ठिकाणीं श्राद्धें करावीं लागतात त्यांपैकीं वारणासंगम हें एक ठिकाण आहे. म्हणून जेव्हां यात्रेचा मेळा जमतो तेव्हां येथें श्राद्ध व स्नान करणारांची मनस्वी भीड होते. पंचक्रोशीची यात्रा करते वेळींही वरुणासंगम हें स्थल मोठें महत्वाचें आहे.

वाराणसींतून मणिकर्णिका घाटापासून यात्रेकरी प्रथमतः आशी संगमाकडे ह्मणजे काशीच्या दक्षिणेकडे जाऊन मग सगळी प्रदक्षिणा संपली म्हणजे ईशान्येकडून वारणासंगमावरून प्रदक्षिणा संपवितात. वरुणा संगमीं गंगेच्या तटाकीं चार देवालयें आहेत. त्यांत देवदर्शनास जाण्याची सरकार हुकमानें बंदी आहे. सन १८५७ इसवींत ह्या देवळांचें अधिपत्य ज्याकडे होतें तो फितुरी लोकांस सामील झाला, आणि त्यानें ह्या देवालयांतून बंडखोर लोकांच्या टोळ्या जमूं दिल्या. तेव्हांपासून सरकारानें तीं सगळीं देवालयें आपल्या ताब्यांत घेऊन बंद करून ठेविलीं. पुढें कांहीं दिवसांनीं तीं खुलीं करण्यास परवानगी दिली असून पुनः काय कारणानें बंद केलीं हा पुरता शोध लागला नाहीं. हीं सर्व देवालयें शंभर वर्षांमागें शिंद्याच्या

एका दिवाणानें बांधलीं असें म्हणतात. ह्या देवालयांत जें मोठें देवालय आहे तें आदिकेशवाचें आहे. येथें शंख, चक्र, गदा, पद्म किरिटादि धारण केलेली श्री विष्णूची मूर्ति स्थापिली आहे. श्री विष्णूच्या मूर्तिजवळ एक सूर्य नारायणाची मूर्ति आहे. ह्या देवालयाच्या पूर्वेकडील द्वारीं एक मंडप आहे. त्यास दहा खांब आहेत. ह्या मंडपांतून खालीं गंगेवर जाण्यास पायऱ्या आहेत. त्यावरून पुष्कळ मूर्ति स्थापिलेल्या आहेत, त्यांपैकीं संगमेश्वर आणि ब्रम्हेश्वर ह्यांचें विशेष महात्म आहे. आतां ह्यावरून वाचकांच्या लक्षांत सहज येईल कीं, ह्या ठिकाणीं ब्रम्हा, विष्णु आणि शिव ह्या तिन्ही देवतांचें पूजन घडतें.

बाकीच्या देवाळयांतून लोकांस जाण्याचा प्रतिबंध आहे म्हणून वरुणासंगमाजवळ एक दगडी चौत्रा बांधला आहे. आणि त्यावर विष्णुपदाची आणि संगमेश्वराची स्थापना केली आहे. येथें एक मारुतीचें देवालय आहे.

वरुणासंगमाजवळ जो घाट आहे त्याच्या माथ्यावर पूर्वींच्या किल्ल्याचे अवशेष नजरेस पडतात. ह्यावरून असें अनुमान होतें कीं, ह्या किल्ल्यालगतच शहर वसलेलें असावें, परंतु हल्लीं जें शहर आहे तें ह्या जाग्यापासून पुष्कळ लांब आहे.

वरुणा घाटाच्या पश्चिमेस एक मैदान सुमारें एक मैल लांब आणि $\frac{1}{4}$ मैल रुंद असें आहे. ह्या मैदानाच्या पूर्वोत्तर भागीं गंगा आणि वरुणा ह्या नद्या आहेत. शिवाय पश्चिमेच्या आंगास वरुणेस मिळणारा एक भला मोठा पाण्यानें भरलेला ओढा आहे. अशा प्रकारें हें लहानसें मैदान तिन्ही अंगांनीं स्वभावतः पाण्यानें भरलेल्या खंदकानें वेष्टिलेलें आहे. ह्याच मैदानांत प्राचीन काळीं हिंदूंनीं एक किल्ला बांधिला होता. तो अगदीं मोडून गेला आहे. ता० ४ जून सन १८५७ इसवींत येथें बंड उद्भवलें. तेव्हां इंग्रज सरकारची छावणी गंगा किनाऱ्यापासून तीन मैलांवर लांब

असून मध्यें वाराणशी क्षेत्र होतें. ह्यामुळें तिकडून शहरचा बचाव करून बंडवाल्याशीं सरकारास लढतां येईना. तेव्हां जुन्या किल्ल्याची जागा शोधून काढून तिच्या शेजारीं मोर्चे बांधले आणि लहानशी गढी तयार केली. आणि वरुणेच्या कांठचीं चारी देवालयें बंद केलीं. ह्या गढींत कांहीं इमारती आहेत व त्या पाहण्यासारख्या आहेत असें कळतें, परंतु त्याला सरकारी हुकूम लागतो सबब त्या आमच्या दृष्टीस पडल्या नाहींत.

वरुणासंगमापासून दक्षिणेकडे नावेंत बसून आलें म्हणजे राजघाट लागतो. येथें भागीरथी उतरून पैलपार जाण्यास नावांचा पूल आहे. राज घाटाच्या दक्षिणेस प्रल्हादघाट आहे.

राजघाटावरून उत्तरेकडच्या रस्त्यानें सुमारें पाऊण मैल लांब गेलें म्हणजे कपिलमोचन तलाव लागतो. ह्याला भैरव तलावही म्हणतात. हा तलाव चोहींकडून पक्या दगडांनीं बांधिलेला आहे. ह्या तलावाच्या उत्तरेस थोड्या अंतरावर उंचट जमीन आहे. तेथें एक दगडी चउत्रा बांधिला आहे. ह्या चउत्र्यावर सुमारें आठ फूट उंच आणि तीन फूट घेराचा एक दगडी खांब उभा आहे. ह्या खांबास लाटही संज्ञा आहे. ही लाट शिवाची आहे. हल्लीं जी लाट येथें उभी आहे ती मुळची लाट नाहीं. मुळची लाट सुमारें ६० वर्षांपूर्वीं हिंदू आणि मुसलमान ह्यांच्यामध्यें तंटा झाला त्यांत फुटली गेली. तरी ती सगळी मोडली गेली नाहीं, कारण हल्लीं जितकी उभी आहे तितका भाग मुळच्या लाटेचा अवशेष आहे असेंही कांहीं लोक सांगतात. ह्या अवशेषास हल्लीं तांब्याच्या पत्र्यानें मढविलें आहे.

ही लाट पूर्वीं देवळांत होती, परंतु औरंगजेब पादशहानें तें देऊळ मोडून त्या जागीं एक महजीद बांधली आणि लाट उघडीच टाकिली. पुढें ती दुसऱ्या कज्यांत मुसलमानांनीं फोडली. कोणीं असें सांगतात कीं, हिंदु आणि मुसलमानांच्या तंट्याच्या वेळीं ही लाट उपटून गंगेंत नेऊन टाकिली होती.

साठ वर्षांच्या पूर्वीं दंगा झाला, त्याची हकीकत अशी सांगतात कीं, शिमग्याचा सण आणि मोहोरमचा सण असे दोन्ही सण एकदम आले. हिंदू आणि मुसलमान लोकांचे मेळे दिवसा व रात्रीं गांवांतून फिरूं लागले. असे एक दोन दिवस झाल्यावर रस्त्यांत एके ठिकाणीं दोन्ही ज्ञातीच्या मेळ्यांची गांठ पडली. तेव्हां कोणी कोणास बाजू देईना. मग मोठी मारामारी झाली. तींत मुसलमान लोक हटले. हा आपला पराजय झाला ह्याबद्दल सूड उगवावा म्हणून मुसलमानांनीं ह्या लाटेला उपटून टाकिलें, मग हिंदु लोकांस मोठाच क्रोध आला आणि त्यांनीं महजिदी पाडण्यास आरंभ केला. एक तर पाडून जमीनदोस्त केली, आणि दुसरी पाडणार तों सरकारी लष्कर येऊन बंदोबस्त केला. पूर्वीं येथें दरसाल मेळा भरत असे, परंतु हल्लीं ती चाल अगदीं बंद झाली आहे. कपिलमोचन तलावावरून वरुणासंगमाकडे रस्ता जातो, परंतु एडिटर बाबा रस्ता असा खराब आहे कीं, टांग्यास लावलेला घोडा देखील खांद्यावर घेऊन जाण्याचा समय येतो. ही गोष्ट कपिलमोचनापासून वरुणासंगमाकडे जो रस्ता जातो त्या सगळ्याची नव्हे, परंतु वरुणा नदीस एक मातीचा बांध घालून त्यावर लांकडें टाकून एक पूल केला आहे त्याची सांगतों बरें. आतां ह्या पुलावरून जाण्याबद्दल टोल द्यावा लागतो, परंतु गीरकाय लोक त्या वाटेनें बिलकूल येत नाहींत म्हटलें तरी चालेल म्हणून पूल जात्याचा आणि टोल दडपायाचा. असो हे विनंती.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

## गयेची यात्रा आणि तेथून परत.

ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—

वि० वि०. आपणाकडे आज पावेतों श्री वाराणशी क्षेत्राची हकीकत थोडी थोडी लिहून पाठविली, तिला तुह्मी आपल्या सुंदर पत्रीं जागा देत गेलां हे उपकार आपले मजवर मोठे झाले. हल्लीं आह्मी गयेकडील माहिती लिहितों, तिला आपल्या सुंदर पत्रीं जागा द्यावी इतकी आमची प्रार्थना आहे.

वाराणशीहून निघालें म्हणजे सुमारें ७ मैलांवर मोगलसराईचें स्टेशन लागतें. ह्या स्टेशनाजवळ आलें म्हणजे कलकत्याहून दिल्लीस जी आगगाडीची थोरली सडक गेली आहे ती लागते. तेथें गाड्या बदलतात. त्यांतून डाक गाडींत बसलें म्हणजे सुमारें ६ तासांत मनुष्य पाटणा शहरीं पोंचतें, ह्मणजे काशीहून पाटणा शहर सरासरी ६० कोस लांब पडतें. ह्याच्या जवळच कोसा दीड कोसावर वाकीपूरचें स्टेशन आहे तेथें उतारू लोक गयेस जाण्याकरितां उतरतात.

पाटणास हिमालयाच्या पायथ्याशीं जो तेराई प्रांत आहे तिकडील हत्ती पुष्कळ विकावयास येतात. तेराईच्या जंगलांत हत्ती फारच चमत्कारिक रीतीनें धरतात. पानवथ्यावर हत्ती पाणी पिण्यास येतात आणि यथास्थित रीत्या तृषेची शांति झाली ह्मणजे मग बाळ यथाशक्ति क्रीडा करूं लागतें. जंगलांत लहान लहान झाडें असतील तीं उपटून टाकतें. हत्तीण असली तर तिला डोहांत घेऊन जाण्याचा यत्न करतें. असा त्या जनावराचा नित्य संप्रदाय असतो. ही गोष्ट तिकडील सर्व लोकांस जाहिर आहे. ह्या करितां हत्ती धरावयाचा झाला म्हणजे अशा पानवथ्याजवळ माहुद लोक सुमारें २५ पासून ४० फूट लांब आणि १५ फूट रूंद असा लकड कोट करतात. त्यास एक दरवाजा असून भोंवताली सुमारें १० फूट खोलीचा खंदक खोदतात. दरवाजा मात्र एक

आंत आणि दुसरा बाहेर असा बांधलेला असतो; म्हणजे खंदकाच्या आंतल्या अंगास एक दार आणि बाहेरल्या अंगास एक दार अशीं दोन दोन भलीं मोठीं बांधलेलीं असतात. हीं दारें परस्पराशीं समोर नसतात, परंतु त्याच्या मधील रस्त्यास नागमोडी वळण असून आंतील दरवाज्यापासून बाहेरील दरवाज्यापर्यंत येण्यास कांहीं नाहीं तरी ३० फूट जमीन चालावी लागते.

नंतर हत्ती पाण्यावर येण्याची वेळ झाली म्हणजे माहुद लोक ह्या लकड कोटाचीं दारें मोकळीं टाकतात आणि आंत चारा वगैरे पदार्थ ठेवून आपण आसपास टपून बसतात. नंतर गजराज उदकपानानंतर चोहोंकडे फिरूं लागले म्हणजे सहज लकड कोटाजवळ येतात आणि आंत चारा पाहून दार शोधूं लागतात. दार सांपडलें म्हणजे मुकाट्यानें आंत शिरून भोजनास आरंभ करितात. इतकें झाल्यावर माहुद लोक दोन भल्या मोठ्या हत्तिणीवर स्वार होऊन येतात. दरएक हत्तिणीवर दोन मनुष्यें व जाड्या सोलाचा एक तब्बल भारा असतो. त्या हत्तिणीसह ते खंदकाच्या आंतल्या दाराजवळ जाऊन उभे राहतात. हत्तिणी पाहिल्या म्हणजे गजराज लागलीच तिकडे जातात. दाराच्या बाहेर हत्ती आला नाहीं तोच माहुद लोक त्याच्या दोन बाजूस दोन्ही हत्तिणी उभ्या करितात. आणि हत्तीला त्यांच्या कडून इतका चेपून टाकितात कीं. त्याला इकडे तिकडे फिरण्यास बिलकूल सवड होत नाहीं. असें झाल्यावर दुसरे जे दोन मनुष्य हत्तिणीवरून बसलेले असतात, ते सोल मधल्या हत्तीच्या पोटा खालून इकडच्याचा पदर तिकडे असें भराभर करून त्या हत्तीच्या पोटास पाठीवरून भला जबरदस्त विंडा भरितात. ह्या विड्यानें हत्तीचें पोट अगदीं आवळून टाकिल्यावर त्याला दोन्ही हत्तिणी कडून दाबीत दाबीत तसाच लकड कोटाच्या बाहेर काढून एखाद्या भल्या मोठ्या वृक्षाकडे नेतात. आणि मग दुसरे दोन फार हुशार मनुष्य फार जलदीनें त्याच्या पायांस जबरदस्त विंडा भरि-

तात आणि त्यास झाडाला बांधून टाकितात. असा सर्वांगानें जख-डलेला त्याला पांच सहा दिवस जरूर असल्यास ज्यास्त दिवस उपोषित ठेवितात. मग काय विचारतां एडिटर बाबा, स-हजच तो सांगितलें काम ऐकूं लागतो.

असो इकडे बाकेपुराहून गया क्षेत्र ५६ मैल दक्षिणेस आहे. गयेस जाण्याला सडक बरीच आहे.

बाकेपुरास म्याने, एके, गाड्या वगैरे सर्व प्रकारचीं वाहनें मिळतात. ह्या वाहनांतून पैशाच्या मानाप्रमाणें जलद अगर उशि-रानें मनुष्य गयेस पोंहोचतो.

बाकेपुरापासून सुमारें ७ मैलावर पुनःपुनः नदी लागते. तेथें सक्षौर श्राद्ध केलें पाहिजे. ह्या नदीस पुनःपुनः ह्मणण्याचें कारण असें दिसतें कीं, ती गयेस पोंहोचे पावेतों दहा बारा वेळां उतरावी लागते.

गया हें शहर बरेंच मोठें आहे, परंतु उदास आहे. येथें फलगु नदी पालथी वाहात आहे. ह्या नदीस डब्रे खणून पाणी काढावें लागतें. एकंदर गयावर्जन यथाशास्त्र करावयाचें म्हटलें म्हणजे ४५ दिवस लागतात. परंतु आतां तितकें करणारे फार थोडे. दक्षिणी लोक तर तितकें करीत नाहींत म्हटलें तरी चालेल. आतां फार झालें तर अकरा दिवसांत गयावर्जन संपावितात. परंतु पुष्कळ लोक ह्मटलें ह्मणजे एकोतिष्ठीच करितात. एकोतिष्ठि ह्मटली म्हणजे ३ दिवस तीन श्राद्धें एक फलगु श्राद्ध दुसरें वटश्राद्ध आणि तिसरें विष्णुश्राद्ध करितात. त्यास तीन दिवस लागतात. चवथे दिवशीं शुद्धश्राद्ध करून संध्या करितात. संध्या म्हणजे प्रातःसंध्या, माध्यानसंध्या, आणि सायंसंध्या, अशा नांवांचीं तीन कुंडें आहेत त्यांत सकाळीं, दोन प्रहरीं आणि संध्याकाळीं स्नानें करून विशेष संकल्पपूर्वक तिन्ही संध्या करितात. ह्या संध्या करण्याचें तात्पर्य असें आहे कीं, ब्राम्हणाच्या मौंजिबंधनापा-

सून गयेस त्रिकाळ संध्या ब्राम्हण करी पर्यंत जो संध्येचा लोप झाला असेल तन्निमित्त जें पातक त्यापासून तो मुक्त होतो.

गयेस केल्या तर पुष्कळ यात्रा आहेत. परंतु एडिटर बाबा आलीकडे त्या आगगाडीनें सर्व गुंडाळून ठेविल्या आहेत.

गयावळास प्रयागवळ व गंगापुत्र ह्यांच्या पेक्षां बरीच ज्यास्त मिळवत होते. तरी पाहिलें तों त्या मानानें ह्मणजे पुष्कळ गयावळ सुखी आहेत असें आढळत नाहीं.

इकडे पितळेच्या वगैरे मूर्ति ओतण्याचा फारच सपाटा आहे. काळ्या दगडाचे जिन्नसही येथें तऱ्हे तऱ्हेचे करितात.

अहो आह्मास अशास्त्रतेचा एक प्रकार आढळला तो लिहितों. तो खरा किंवा खोटा अशास्त्रतेचा प्रकार आहे ह्याविषयीं सूज्ञ वाचकांनीं विचार करावा.

गयावळ लोक श्राद्धास दक्षणी लोकांच्या येथें देखील जेवतात, तें असो परंतु एके दिवसांत तीन चार वेळां जेवतात. आतां श्राद्धास ब्राम्हण गेला म्हणजे रात्री देखील त्यानें तोंड हलवितां कामा नये, असा परिचार आमच्या तिकडे आहे, परंतु इकडची व्यवस्था पाहिली तर वर लिहिल्याप्रमाणें आहे. आतां अशा प्रकारानें कर्म यथासांग होतें किंवा नाहीं हें मला ठाऊक नाहीं. तुमच्या सारखे शास्त्रीबावांस हें पक्कें ठाऊक असेल.

अहो महाराज इकडे ज्या कांहीं गाड्या बाकेपुरापासून गयेस आणि गयेहून परत बाकेपुरास सुमारें २४ तासांत पोंहोचतात. त्या सर्व बिगारी लोक ओढितात. त्यांस घोडे जुंपलेले नसतात. त्या गाड्यांस दर खेपेस भाडें रुपये २० पडतें. आणि आंत ६ माणसें ओझ्यासुद्धां बसतात. त्यांस १० पासून १२ बिगारी लागतात आणि ते घोड्याप्रमाणें जलद एका टप्याहून दुसऱ्या टप्या पावेतों ओढून नेतात. टप्यामध्यें अंतर ६ अगर ७ मैल असतें. एक्यास दर खेपेस दर माणशीं हशील ५ रुपये पडतें. आंत स्वाऱ्या दोन बसतात. व तितक्या असामींचा बो-

जा आंत घालितात. हे एके सुमारें दीड दिवसांत गयेस पोंहोचतात. परंतु त्यांत बसून जें अंग हदरतें त्याविषयीं बोलण्याची सोय नाहीं. मेण्यास रुपये १० १२ पडतात, परंतु त्यांत स्वारी एक आणि बोजा कांहीं नाहीं. मेणाही २४ तासांत पोंहोचतो.

दुसऱ्या बैली गाड्या तद्देशी तऱ्हेच्या मिळतात. त्यांस भाडें ५ ६ रुपये पडतें व ४ ५ दिवशीं पोंहोचतात.

वर जी हत्ती धरण्याची माहिती लिहिली आहे. ती एका मोठ्या हत्तीच्या सवदागरानें आम्हास सांगितली त्याप्रमाणें लिहिली आहे.

गयेहून परत दक्षिणेंत यावयाचें म्हटलें म्हणजे पाटण्यावरून अलाहाबादेस आगगाडीच्या मार्गे यावें आणि तेथून जबलपुरावरून पुढें मध्यें बऱ्हाणपूर हें एक शहर पाहण्यासारखें आहे. हें पूर्वीं शिंदे सरकारच्या कबजांत होतें, परंतु हल्लीं येथें इंग्रजी अंमल आहे. येथें गंधी सामान, कापड व कलाबतूचें सामान चांगलें बनतें. ही गोष्ट आपल्या तिकडे सर्वांस महशूर आहे. लोभ असावा हे विनंती.

एडिटराचा मित्र एक फिरस्ता.

333

Presented to "THE PRIV TE FREE LIBRARY-Dharmapuri, Wai" by K. V. Pandit. in memory of his uncle the late Mr. Bapusaheb Pandit.

15012
294.53